१९३८
म. ग्रं. सं. ठाणं
वर्ग निबंध
नं. २०५९

...त्याचें मूलधन

REFBK-0005705

- लेखक -
॥
- दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर -
- वामन कृष्ण चोरघडे -

कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई २

साहित्याचें मूलधन

ग्रंथ संग्रहालय पुणे

लेखक

दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर

वामन कृष्ण चोरघडे

४७०

REFBK-0005705

कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई २

साहित्याचें मूलधन

साहित्याचें मूलधन

सरी संत ज्ञानेश्वर ग्रंथ

लेखक

दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर

वामन कृष्ण चोरघडे

ग्रंथ संग्रहालय पुणे
४७०

REFBK-0005705

कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई २

प्रथमावृत्ति १९३८

सर्व हक्क स्वाधीन

एम्. एन्. कुळकर्णी, यांनीं कर्नाटक प्रिंटिंग प्रेस, कर्नाटक हाऊस,
चिराबाजार, मुंबई २ येथें छापून, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस,
कर्नाटक हाऊस, चिराबाजार, मुंबई २ येथें प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना

मला स्वतःला कांहीं गाणीं येत होतीं. कांहीं माझ्या आईनें मला सांगितलीं. वाटलें, एकादें पुस्तक जर निघेल तर बरें होईल. तीं गाणीं एकत्रित केलीं आणि 'संजीवनी', 'प्रतिभा', 'पारिजात', 'विहंगम' इत्यादि मासिकांतून लेख लिहिले. तेव्हां असें वाटे, आपण फार लहान; आपण लिहिलें तर विद्वानांना मान्य व्हावयाचें नाहीं. लेख लिहिले, प्रसिद्ध केले आणि तसेच पडून राहूं दिले!

नंतर नागपूरचे प्रो. दि. का. गर्दे यांची ओळख झाली. त्यांच्या सौजन्यामुळें आपलेपणा वाढला. मी लेखांचा परिचय द्यावयाचा आणि त्यांनीं चर्चात्मक भाग लिहून एक पुस्तक काढावयाचें ठरलें. 'महाराष्ट्रां'तून विनंतिपत्रक छापलें, लिहिलें होतें—'ज्यांच्याकडे लोकगीतें असतील त्यांनीं आमच्या या प्रातिनिधिक लेखसंग्रहाकरितां पाठवावींत.'

उमरखेडचे श्री. द. रा. व्यवहारे, बार्शीटाकळीचे श्री. वा. यो. बुलबुले यांनीं गाणीं पाठविलीं. महादेवाचीं, मातामायची, मरामायची, इत्यादि प्रकारचीं सर्व गाणीं त्यांत होतीं; पण तीं सर्व फाईलमध्यें पडून राहिलीं.

पुढें पोटासाठीं नागपूर सुटलें. इतर भानगडी मागें लागल्या. वर्धेला आलों. पूज्य काकासाहेबांची सुदैवानें ओळख झाली. त्यांचें लिखाण वाचण्याच्या मूळ हेतूनेंच गुजराती वाचायला येऊं लागलें आणि गुजरातींत त्यांनीं लिहिलेलें लोकवाङ्मयावरील साहित्य पाहिलें.

ते लेख म्हणजे प्रस्तावना होत्या. त्यांत स्वतंत्र लेखाच्या कसोटीला उतरेल असें फारच थोडें लिखाण होतें. आवश्यक भाग चिन्हांकित केला. अनावश्यक गाळला. साधें भाषांतर केलें. काकांना तें दाखविलें. माझे लेखही त्यांनीं वाचले, त्यांना आवडले. आणखी काय हवें होतें? त्या साध्या भाषांतराचें मुद्देसूद निबंधन केलें व आज जो दुसरा भाग या पुस्तकांत दिसतो तो केवळ त्यांच्या लेखांमुळें! 'लोकगीत', 'लोकसाहित्यनी मीमांसा', 'आपणुं

लोकसाहित्य', 'रसास्वाद', 'सार्वभौम कथा', 'लोककथानुं भाषाशैली', 'बालवांतोनी खूबी' हे त्यांचे मूळ गुजराती लेख. त्यांत फेरफार केला आणि विभाग २ मधील तीन पासून दहाव्या भागापर्यंत त्यांचें लिखाण निबंधिलें.

जें केलें तें त्यांच्या संमतीनें! त्यांनीं तें पाहिलें, प्रुफेंहि तपासून घेतलीं, 'बालसाहित्य'मधील शिशुकथांचा भाग नवीन लिहून दिला. दुधांत साखर म्हणजे त्यांनीं स्वतःचें नांव देखील पुस्तकावर घालूं दिलें.

चार शब्द पुस्तकाच्या आरंभीं प्रस्तावनेदाखल त्यांनींच लिहावे असें मीं सुचविलें. त्यालाहि त्यांनीं संमती दिली. पण—

दुर्दैवानें ते एकाएकीं आजारी पडले. मराठी वाचकांना आणखी थोडेंसें चांगलें वाचायला मिळालें असतें—नवीन दृष्टी लाभली असती; तथापि आतां येवढेंच म्हणावें लागतें—पुढें कधीं तरी!

मला वाटतें लोकसाहित्यावर लिहिलेला मराठी वाङ्मयांतील अशा प्रकारचा हा ग्रंथ पहिलाच! यापूर्वी प्रयत्न झाले. सुविचार-प्रकाशन-मंडळानें "लोककथा व लोकगीतें" हें पुस्तक प्रकाशिलें. त्याला श्री. चापेकर (ना. गो.) यांनीं प्रस्तावना लिहिली आणि लोकवाङ्मयाकडे पाहाण्याची दृष्टि मराठी वाचकांना अजून आली नाहीं हें त्यांनीं दाखवून दिलें. अजून याबाबतींत कितीतरी प्रयत्न व्हावयाला हवेत. हे प्रयत्न नागपूरप्रांताकडे खात्रीनें यशस्वी होतील. इकडे प्रो. कोलते आहेत, श्री. वा. ना. देशपांडे आहेत, श्री. नेने आहेत. महानुभाव वाङ्मय उकरून काढण्यास त्यांनीं अस्तन्या वर केल्या. घरींदारीं, झोपाळ्यावर, शेतांत उठलेले भावतरंग अजून त्यांनीं ऐकण्याचें मनावर घेतलें नाहीं. स्वतः हें काम करतील किंवा नाहीं देव जाणे! मदत मात्र जरूर करतील. माझे लेख प्रो. कोलते व श्री. ह. ना. नेने यांनीं वाचून ज्या सूचना केल्या होत्या त्यावरून अंदाज करतां येतो.

माझ्याजवळ अजून लोकसाहित्य आहे. संधी लाभली तर असलींच एक-दोन पुस्तकें लिहून या लोपलेल्या जगाचे प्रतिध्वनि मला ऐकवितां येतील;

पण त्याला अडचणी आहेत; त्याला वेळ हवा, प्रोत्साहन हवें, पैसा हवा! पहिली गोष्ट माझ्या हातची आहे, बाकीच्या नाहींत.

मराठी रसिक या माझ्या पुस्तकाचें कसें स्वागत करितात यावर माझ्या पुढच्या प्रयत्नाचें भवितव्य अवलंबून आहे. त्यांना पुस्तक आवडलें, तर दुसरें लिहितां येईल. आवडलें नाहीं, तर तथास्तु! वाईट गोष्टी देखील वाचकांवर लादाव्या आणि त्या त्यांनीं सकौतुक ग्रहण कराव्या हा अट्टाहास आणि मूढाग्रह मी कां धरावा?

इथवर लिहून झालें तें पुरे! आतां थोडेंसेंच शिल्लक राहिलें आहे. हा ग्रंथ प्रकाशांत आणण्याचें बरेंच श्रेय मी श्री. मं. ना. कुळकर्णी यांना देईन. त्यांनीं किती थोड्या अवधींत हें सारें तयार करून दिलें! माझ्यापेक्षांहि त्यांनीं मराठी वाङ्मयावर एका दृष्टीनें उपकार केले आहेत. तेव्हां मी एकट्यानेंच त्यांचे आभार कां व कसे मानावेत?

वाचकांजवळ माझें येवढेंच मागणें आहे कीं त्यांनीं हा ग्रंथ वाचतांना अगदीं शक्य तितकी चोखंदळ वृत्ति धारण करावी. फुकटचें प्रोत्साहन देण्याची आजकाल बऱ्याच लोकांना संवय आहे. त्यामुळें माझें नुकसान नाहीं. नुकसान मराठी वाङ्मयाचें आहे. तें होऊं नये, ही माझी आणि त्यांचीहि मनापासूनची इच्छा असणार!

वर्धा.
१५-८-३८

वामन कृष्ण चोरघडे

अनुक्रमणिका

विभाग १— लोकगंगा

(१) वनगंगा चाले थीर १

(२) लोपलेल्या जगाचे प्रतिध्वनी

– यमुना ५

– सारजा १६

– जाई तुझा वास आला—

मायबाई माझे ॥ . . . ३०

विभाग २— विवेचन

(१) मुलींचीं गाणीं ४५

(२) लोकगीत, निर्मिती आणि स्वरूप . . . ५४

(३) लोकगीत, चर्चा ६७

(४) लोकजीवन ७९

(५) लोकसाहित्याची मीमांसा ८४

(६) लोकसाहित्य ८८

(७) सार्वभौमकथा ९३

(८) लोककथांची भाषाशैली १००

(९) लोककथांवरील आक्षेप, ग्राम्यता. . . . १०४

(१०) बालसाहित्य—

–शिशुकथा १०६

–शिक्षण ११३

आरंभीं थोडेंसें

उन्हाळ्याच्या सुटींत चार दिवस मी माझ्या गांवाला गेलों होतों. तेथें दिवसभर फारसे उद्योग नसल्यानें मला नेहमीं पुस्तकांची व वृत्तपत्रांची कांस धरावी लागे. पण पुढें जांभळें पिकल्यामुळें वेळ मजेंत जाऊं लागला.

एक दिवस–सोमवारीं–आईला उपवास असल्यानें महादेवाचा दिवस म्हणून तिनें मला बेल आणावयास सांगितलें. आईची आज्ञा तंतोतंत पाळावी म्हणून नव्हे, पण जांभळांच्या आशेनें तोंडाला पाणी सुटल्यामुळें मी तडक शेतांत जावयास निघालों. येतांना अर्थातच मी पुष्कळसा बेल आणला व तो स्वच्छ कल्हईच्या ताटांत टाकून 'घ्या आईसाहेब' म्हणून तिच्यासमोर केला. बेल पाहून तिला आनंद झाला व ती सहजच म्हणाली—

आठा दिसा सोमवारी, बेल आला ग कोवळा
माझ्या भक्तीचा सावळा—
कैलासराणा माझा ॥ १ ॥

आईनें ही ओवी म्हटल्यावर मला साहजिकच जिज्ञासा उत्पन्न झाली व म्हणून तिला मीं आणखी म्हणावयास सांगितलें. तिला बऱ्याचशा ओव्या येत होत्या व म्हातारपणामुळें ती बऱ्याच विसरून गेली होती.

'प्रतिभेच्या' २४–४–१९३३ च्या अंकांत श्री. न. बेंडे यांनीं अशाच कांहीं ओव्यांचा परिचय 'प्रतिभे'च्या वाचकांना करून दिला आहे. हीं खेड्यांतलीं भावगीतें कोणत्या एका पुस्तकांत सांपडत नाहींत. एकीच्या तोंडून दुसरीस व दुसरीच्या तोंडून तिसरीस अशी या ओव्यांची ग्रंथी असते.

साहित्याचें मूलधन

खेड्यापाड्यांत ह्या ओव्या म्हणजे नेहमींच्यींच गाणीं होत, असें आईनें मला सांगितलें. हीं गाणीं वाऱ्यावर सुदूर कशीं वाहतात याचें एक मजेदार उदाहरण येथें देतों. आईनें इतर ओव्या सांगतांना नातवाला मांडीवर घेऊन आजी कशी आळविते हें सांगतांना मला तिनें खालील ओव्या सांगितल्या—

शेजारिणी बाई, राख आपुली माथन
आला चेंडू बागेंतून, बाळराजाचा ॥ २ ॥
लोकाच्या लेकराला, कैसी म्हणूं मी कारे
तुझ्यासाठीं वाडा भरे, बाळराजा ॥

आणि ह्याच ओव्या श्री. बेंडे यांनीं दिल्या होत्या. तोंडींतोंडीं ह्या ओव्या गेल्यानें थोडा शाब्दिक बदल होणें अपरिहार्य आहे.

माझें कवितांचें वाचन फार नाहीं; विशेष रसिकता मीं कमाविली आहे असेंहि नाहीं. असें असून माझ्यासारख्या अरसिकाला देखील ह्या ओव्या अत्यंत आवडल्या; म्हणून मला वाटतें, त्या जर प्रसिद्ध झाल्या तर सर्वांचीच सात्विक करमणूक करतील.

संगतवार जुळवून त्यांवर टीका वगैरे देण्यासारख्या ह्या ज्ञानेश्वरीच्या ओव्या नसल्यामुळें त्यांची खुमारी **जीवनक्रमाची व त्यांची जोड घालून दिल्यानेंच होणार आहे.**

वा. कृ. चोरघडे

वनगंगा चाले थीर !

(दोघी बहिणी सासरहून माहेरीं आल्यावर एकमेकींची ओळख जाणतात. प्रेमाचें असेंच आहे. कांहीं काळ दूर झाल्यावरच प्रेमाची किंमत कळते.)

शेजी[1] मायबहिण, म्या लावणीची केली
तुझी सर नाहीं आली । ताईबाई माझे ॥ १ ॥
शेजी मायबहिण, आकाळाचा पूर
वनगंगा चाले थीर[2] । ताईबाई माझी ॥ २ ॥
मायेची लाडकी, सासूनं पाण्या नेली
निंबोळी कोमावली । ताईबाई माझी ॥ ३ ॥
मायेची लाडकी, सासुरीं उटे ताट
कोवळे मनगट । मालनबाईचे ॥ ४ ॥
चाल माझे सखेबाई, गुरूच्या पूजे जाऊं
एक मंत्र दोघी घेऊं । ताईबाई माझे ॥ ५ ॥
काय सांगू सखेबाई, गुरूची पुण्याई
आसनाखालीं जाई । वेला गेली ॥ ६ ॥
मोत्याच्या अक्षता, गुरुरायाच्या आसनीं
सखेबाई तूं शिष्यिणी । पूजा केली ॥ ७ ॥
सोनीयाचं फूल, सखीच्या ओंजोळीं
वाहिली पुष्पांजलि । गुरुच्या चरणीं ॥ ८ ॥

१ शेजारीण. २ स्थिर. ३ ओंजळ.

विभाग १

—o—

लोकगंगा

लोपलेल्या जगाचे
प्रतिध्वनी

१ यमुना

म्हाताऱ्या सासूची एकुलती एक सून यमुना आज तीन वर्षांपासून आपला संसार करीत होती, आणि तिचा संसार सुरळीत चालला होता. सासू बहुतेक कामें सुनेवर सोंपवून देई व तीं करितां करितां तिला सहज संध्याकाळ होत असे. तरी ती रोज कोंबड्यानें बांग दिल्याबरोबर उठत असे.

खेड्यांतली पहांट ती ! कुठें जात्याची घरघर किंवा एखाद्या घरचा सड्याचा आवाज, यापरता सर्वत्र शांतता असते अगदीं ! एवढ्या पहांटेस उठून यमुना झाडझूड करीत असे, आणि तिच्या मंजुळ गीतांचे आवाज निघत असत—

पहांटेच्या प्रहरीं, मला संसाराचा धंदा ।
नांव तुझं रे गोविंदा, विसरली ॥

जाईच्या फुलांचा, वास माझ्या वेटाळांत ।
हार सख्याच्या गळ्यांत, रामरायाच्या ॥

रामटेक गडावर, फुलं सांडलीं जाईचीं ।
गोरीं पाउलें माईचीं-सीताबाई ॥

रामटेक गडावर, फुलं सांडलीं जाईचीं ।
मुलं कौसल्या माईचीं—रामलक्ष्मण ॥

भोळ्याभाबड्या सुनेला वरील ओव्यांतले काव्यगुण जरी कळत नव्हते असें धरून चाललें, तरी ओंजळभर जाईचीं फुलें घेऊन रामचंद्राच्या पायांवर

वहावयाचीं, एवढें तिला चांगलें ठाऊक होतें व रोज ती नमस्कार करून रामासारखा भ्रतार जन्मोजन्मीं लाभूं दे म्हणून सीतामाईला विनवीत होती.

यमुनेचा सडा टाकून होत नाहीं तोंच नेहमींची संवय असलेली म्हातारी सासू जागी होत असे. उठल्याबरोबर ती गाईच्या गोठ्याकडे जाऊं लागे. कारण तिच्या धर्मांत हेंच सांगितलें होतें कीं—

पहांटेच्या प्रहरीं, पाय वंदावे गाईचे ।
दारीं तुळसीमाईचें, वृंदावन ॥

तिच्या घरचीं माणसें देखील अशींच धार्मिक होतीं असें दिसतें; कारण ती म्हणते—

गोतामध्यें गोत, गुरुराया माझं गोत ।
पुराण भागवत, आयकिलें ॥

पूर्वीच्या काळीं पुराण भागवत ऐकणें म्हणजे जन्माचें सार्थक समजलें जात होतें. यमुनेच्या सासूनें गुरुमंत्र घेतला होता. यमुना घरकाम करते आहे तोंपर्यंत ही आंघोळ करून गुरुमाउलीला आळवीत बसेः—

गुरुराया तुझं नांव, साखरेपरीस गोड ।
पाप्याची जिव्हा जड, आठवीतां ॥
गुरुरायाच्या पादुका, माणकाच्या ज्योती ।
मजला दैवगती, प्राप्त झाल्या ॥

आपलीं कामें मराभर संपवून यमुनेला लवकर स्नान करावें लागे; कारण 'रोजदारवेळा' होत नाहीं तोंच स्वयंपाक झाला पाहिजे ना ? अर्थात् तिला सासूसारखी कोठली पूजा नि काय ! ती आपली हातांत हात तुळशीपाशीं जाऊन—

तुळशी माई माझे, राहूं नको तूं रानांत ।
जागा देते अंगणांत–वृंदावनीं माझ्या ॥

असें म्हणत तिला नमस्कार करी व देवघरांत जाऊन विष्णूच्या मूर्तीवर आणलेलें तुळसीदळ वाहत असे.

देवाच्या पूजनाचं, मजला नाहीं बळ ।
वाहिलं तुळसीदळ, देवा बापा ॥

यावरून भोळ्या भक्तीनें वाहिलेल्या एका तुळशीदलानेंही भक्त वैकुंठीं जाऊं शकतो हें तिला माहित होतेंसें दिसतें.

यमुनेचा जीवनक्रम असाच रोज चाले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आनंदानें काम करून रात्रीं संसाराचें संगीत ऐकतच ती झोपीं जाई व दुसरा दिवस उजाडला कीं तिला काम पुरे.

यमुनेच्या संसारांत म्हणण्यासारखी अशी कोणतीच उणीव नव्हती. कुणी रागवायला नव्हतें किंवा कुणी बोट दाखवावयालाहि नव्हतें. म्हाताऱ्या सासूला बिचारीला कौतुकच होतें आणि समजा एखादे वेळ कांहीं झालेंच, तर यमुनेचा प्राणसखा तिची समजूत घालावयास तयारच होता—

भ्रतार आळवे, मुखकंबळ कोमावलं ।
तुला कोण रागावलं—जीवन प्राणसखे ॥

संसाराचा सोबती इतका चांगला दिल्याबद्दल ती वारंवार परमेश्वराला आळवीत असे—

देवा बापा नारायणा, किती हात जोडूं तुला ।
इच्छेजोगं दिलं मला, कपाळाचं कुंकू ॥

अशा सुखाच्या संसारांत दिवस भराभर निघून गेल्यास नवल नाहीं.

पुढें कांहीं दिवस जातांच यमुनेला काम करणें जरा जड जाऊं लागलें. एकटीच करणारी. करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. पुढेंपुढें तिला अन्नदेखील गोड

लागेना. हीं कशाचीं चिन्हें आहेत हें चाणाक्ष सासूनें ओळखून घेतलें होतें. यमुना बिचारी धुण्याचें टोपलें घेऊन नदीवर जाई. अठरापगड बायकांच्या डोळ्यांतून यमुनेची ही स्थिति निसटली नाहीं. त्यांनीं यमुनेची थट्टा सुरूं केली.

पहिल्यानं गर्भार, अन्नाची हुळूक[1] ।
तुझा पानाचा मुळूख—यमुनाबाई ॥

तें संपत नाहीं तोंच दुसरीकडून स्वर येई—

दुसरीये मासीं, अन्न नचि आवडे ।
कंथानं[2] दूधपेढे, पुरविले ॥

नवऱ्यानें दूधपेढे पुरविले किंवा नाहीं हें कळावयास जरी मार्ग नसला, तरी थट्टेनें यमुनेचें तोंड मात्र पेढा खाल्ल्यासारखें होत असे.

पण हें इतक्यावरच थांबत नसे कांहीं ! कित्येकींना यमुनेचें गोरें तोंड गोरेंमोरें झालेलें पहाण्याची इच्छा होई, व त्यांच्यापैकींच एखादी फटाकडी, बोलघेवडी म्हाळसाकाकी हातांतील धुण्याचा पदर फडफड आपटीत स्वतःची बत्तिशी काढून खड्या सुरांत म्हणून देई—

तिसरीया मासीं, चुणी उंच दिसे ।
एकांतीं कंथ पुसे, यमुनाबाईचा ॥

आतां येथें उभें राहाण्यांत शोभा नाहीं असें यमुनेलाही कळून येई व हातचा पिळा हातीं ठेवून ती भरदम घरीं येई.

तीन, चार, पांच, असें होतां होतां एक दिवस यमुना खाटेवर प्रसूतीच्या भयंकर वेदना सहन करीत पडली होती. वेदनेच्या दारुणतेनें तिचे अत्यंत हाल होत होते. चारचौघी आयाबाया जमल्या. त्यांना पण यमुनेची स्थिति पाहवत नव्हती. पण त्या करणार काय ? अनुभवानें त्यांच्याही डोळ्यांत पाणी

१ ओकारी; २ नवऱ्यानें.

येत होतें. त्या समजूत घालीत होत्या 'यमुने, सर्व कांहीं परमेश्वराचे हातीं आहे–

गर्भार नारी किती, करिशी काकूळती ।
किल्ल्याकुलुपं त्याचे हातीं—यमुनाबाई ॥
गर्भार नारी किती, भेसी[1] ग तूं जीवाला ।
चिंता सारी त्या देवाला—यमुनाबाई ॥

व खरोखरच परमेश्वराला अखेर दया येऊन त्यानें यमुनेची सुटका केली; आणि—

सुइण निघाली, गोरीयांच्या[2] वाड्यांतून
काय झालं पुसा तान्हं—यमुनाबाईला ॥
पहिला मुलगा झाला, धरणी उल्हासली
मायबहिण संतोषली—यमुनाबाई ॥

मुलगा झालेला पाहून सासूला कोण आनंद ! आपलें म्हातारपण वगैरे सारें विसरली ती व मारे कामाचा रगाडा अंगावर घेतला. साखरेचें भांडें हातांत घेऊन चार फेरे ओसरींत, दोन फेरे अंगणांत, अशी पांखरासारखी गरगर फिरतांफिरतांच तिनें सुरू केलें—

साखर शिरणी कीं, घ्या बायांनो आणीक ।
झालं हिऱ्याला माणीक–यमुनाबाईला ॥
पहिला लेक झाला, न्हाणी खणली चिऱ्याची ।
खाण निघाली हिऱ्याची, दारीं ग बाई माझ्या ॥

सासऱ्याला देखील आनंद झाल्याशिवाय राहिला नाहीं. कारण तो देखील—

१. भिशी. २. यमुनेच्या (गोऱ्या) नवऱ्याच्या.

याप्रमाणें सासूनें सारजेचें कोडकौतुक पत्करून देखील सख्यासाठीं तळमळणाऱ्या यमुनेच्या जीवाला काढेवाढे लागले होते. 'आई' 'आई' करीत सख्या तिच्याजवळ आला म्हणजे ती वात्सल्यानें उचंबळून त्याच्या केसावरून हात फिरवीत म्हणे—

तुझ्या रे जीवासाठीं, जीव माझा काळापिसा ।
नको जाऊं परदेशा—जीवन प्राणसख्या ॥

पण "माझ्या बाळाला कुठं रानाडोंगरांत धाडतां" असें नवऱ्याचे तोंडावर विचारण्याची यमुनेची प्राज्ञा नव्हती. मनांतल्या मनांत ती वाटेल तें म्हणे. शिवाय सख्यानें जाऊं नये असें एका मनानें कितीही सांगितलें तरी शिकून-सवरून सख्या मोठा होईल ही कल्पना दुसऱ्या मनाला समाधानकारक वाटे. कोट टोपी घालून वडिलांबरोबर सख्या बाजारांत जरी चालला तरी यमुनेचा जीव म्हणे, "माझा सख्या एक दिवस असाच गांवीं जाईल."

सदरा-टोपीच्या या गोऱ्यागोमट्या सख्याला पाहून ती देवाला म्हणे,

देशील रे देवा, संपत थोडी थोडी ।
भीमा अर्जुनाची जोडी, रावबाजी माझे ॥

आणि खरें पाहिलें असतां भीमार्जुनासारखे खंबीर खांब यमुनेच्या घरास आधारी झाले म्हणजे तिच्यासारख्या समाधानी माउलीच्या आकांक्षा तृप्त झाल्यासारख्याच होत्या. असो.

जेवूनखाऊन सख्याच्या बापानें एक दिवस दोन घोडे कसले व सख्या आईला नमस्कार करून घोड्यावर बसला. सारजेला कडेस घेऊन यमुना भरल्या डोळ्यानें सख्या दृष्टीआड होईतों त्याचेकडे पहात होती. तो दृष्टीआड झाल्यावर परतली विचारी—

तुझ्या रे जीवासाठीं, जीव माझा लवलाही ।
परदेशा गेला बाई, सख्या माझा ॥

ती आणखी म्हणे—

आपुलं आयुष्य, तिळतिळ उरवितें ।
सख्या तुला पुरवितें, राजसवाळा माझ्या ॥
आपुल्या आयुष्याची, करीन पलंगडी ।
सख्या बैस पळघडी, राजसवाळा माझ्या ॥

आपल्या चिमण्यासाठीं पंचप्राण ओंवाळून टाकणाऱ्या यमुनेला वाटे, माझा सख्या उन्हांत रस्ता कांपत असेल आणि असा विचार तिच्या मनांत आला म्हणजे तिची स्थिति केविलवाणी होई. मागच्या अंगणांत जाऊन तिनें तापत्या सूर्याची प्रार्थना करावी—

देवा बापा नारायणा, तपूं नको चारी रान ।
गांवा गेले पंचप्राण, दोघे माझे ॥

शिवाय—

अमृत शिंपीन, नागपूरच्या रानोरान ।
तेथ माझा जीवप्राण–राजस सख्या माझा ॥

यापेक्षां आणखी ती काय करूं शकणार होती बरें ?

कांहीं दिवसांनीं यमुनेला बरें वाटावयास लागलें; पण मधून मधून तिला सख्याची आठवण येतच होती; आणि अशी आठवण झाली म्हणजे नागपूरचा सख्या तिच्या मनश्चक्षूंसमोर उभा राही ! तिला वाटे, येथल्यासारखा तेथें देखील सख्याचा बोलबाला असेल—

नागपूरगांवची शाळा, दिसते बहू खोल ।
गजघाटीं तुझा बोल–सखाराम ॥

पुढें, सारजा पांच वर्षांची झाल्यावर यमुनेला सख्याची आठवण जरा कमी येऊं लागली. शिवाय " बारा महिन्या दो वर्सो " सख्याचा बाप त्याला घरीं आणीत होताच व सारजेच्या कडेवरही आतां आणखी एकाची स्थापना झाली होती !

सात वर्षांच्या सारजेला भाऊ कडेवर घेऊन फिरतांना पाहिली म्हणजे आजी तिला शिकवी—

पाठीकडे पाहे, पाठ माझी ग पिवळी ।
माझे पाठीचे गवळी, भाऊराया ॥

शिकविणाऱ्या आजीची गोष्ट जरी सोडून दिली तरी आपल्या पाठीवर सोन्यासारखा भाऊ झाला म्हणून आपली पाठ पिवळी मानून घेणाऱ्या बहिणीचें अंतःकरण पुढें भावासाठीं कसें तिळतिळ तुटत होतें हें आपण पाहूंच !

सासूची सरत्या वयाची आतां एकच आस उरली होती–आपण डोळे मिटायच्या अगोदर सारजी पिवळी पाहावी. यमुनेला असें वाटत नव्हतें असें नाहीं. आपण जे खेळ खेळलों ते खेळ आपल्या मुलीनें देखील खेळावे असें वाटणें स्वाभाविक आहे. पण चार गाईघोडे जवळ असणाऱ्या आजाला किंवा सारजेच्या बापाला तसेंच स्थळ पाहणें क्रमप्राप्त होतें. त्या घरीं वडील म्हणून सासूसासरे तर पाहिजेत, पण त्यांचा सासुरवास नको. असें स्थळ पाह्यला बरेच दिवस लागले. सख्या आतां त्यांच्या मानानें लग्नाला आला होता, पण सारजेच्यामुळें त्याचेंही लांबणीवर पडत होतें.

अखेर, हो नाहीं करतां करतां सारजेला एका घरीं द्यावयाचें ठरलें आणि सारजा बारा-तेराव्या वर्षीं पिवळी झाली. यमुनेनें चार समजुतीच्या गोष्टी सारजेला सांगितल्या—

सासूचा सासुरवास, सोसावा एकीनं
कुळवंताच्या लेकीनं । मालनबाई माझे ॥
सासूचा सासुरवास, सोसल्यानं काय होतं ?
दोन्ही कुळा नांव येतं । मालनबाई माझे ॥

यमुनेला माहित होतें, सारजेला नणंद आहे. तेव्हां—" सारजे, तिच्याशीं जपून वाग," असें सांगावयास ती चुकली नाहीं. "नणंदेनें लावालावी केली तरी ती मनावर घेऊं नकोस;" कारण—

सासूचा सासुरवास, नणदेची लावणी ।
दो दिवसांची पाव्हणी–मालनबाई माझे ॥

वरात गेली. सर्व कांहीं यथास्थित झालें. जांवईबापू सारजेला घेऊन गेले. यमुनेला वाटे कोणत्या रानाडोंगरांत माझी सारजा गेली !

गोरीये[1] जांवयानं, डोंगरीं वस्ती केली ।
मैना कळपाची नेली—मालनबाई माझी ॥

अशी ही शिकवून सवरून पाठविलेली लाडाची मालन सारजाबाळी पुढें कशी वागली ?

१. गोऱ्यागोमट्या.

२ सारजा

पहिल्यानेंच सासरीं गेल्यामुळें सारजेला उदासवाणें वाटे. सासूनें सांगितलेलें काम करितांना मध्येंच आईची आठवण होऊन तिच्या डोळ्यांतून पटकन् एकादा थेंब बाहेर येई. बालवयांत आईच्या मांडीवर डोकें ठेवून निजावयाचे दिवसांत एका अपरिचित बाईचे हुकूम पाळावे लागले म्हणजे जीवाची ओढाताण होऊन कालवाकालव होणें स्वाभाविक आहे.

पण ही अपरिचित बाई किंवा सारजेची सासू सारजेला कधीं त्रास देत नसे. थोरामोठ्या घराण्याची पोरगी म्हणून ती तिचें नेहमीं कौतुक करी. तिच्या प्रेमळ सावलींत सारजा उन्हानें कोमेजून गेली नाहीं; उलट तिला त्या जीवनाची संवय झाल्यावर सासूबद्दल आदर वाटूं लागला.

सासरीं पोरगी कितीहि सुखांत असली तरी तिच्या भावनांचे धागेदोरे माहेरींच गुंतलेले असतात. आपण जरी इथें सुखांत असलों तरी आपल्याकरितां तळमळणारी आपली आई आपल्या निरोपाकडे चातकासारखी डोळे लावून बसली असेल या गोष्टीची सारजेला जाणीव होती; पण निरोप पाठवायचा तो तरी कुणाबरोबर? पोष्टानें पत्र पाठवावयास तिला लिहितां येत नव्हतें; इतरांना म्हणावें तर परस्वाधीन जिणें पदरीं आलेलें! ती बिचारी तळतळून जाई. मागील दारीं आली म्हणजे जाईच्या झाडावर तिला चिवचिव ऐकूं येई. तिचें वेडें मन म्हणे–"तुलसीमाई, या पांखराला उडतां येतें; यालाच माझ्या गावीं जायची बुद्धी दे. माझ्या आईला जर यानें निरोप पोंचविला तर मी तुला एकवीस प्रदक्षिणा घालीन."

भोळी बिचारी सारजा! या झाडावरून त्या झाडावर स्वच्छंदपणें उडणाऱ्या विहंगमाला सारजेची तळमळ थोडीच समजणार होती! पण तें पांखरूं जाईवरून उडून तुलसीवृंदावनावर बसलें म्हणजे तिला वाटे, तुळस पावली. तिला आनंद वाटे व इकडे तिकडे कुणीं नाहींसें पाहून ती त्या पांखराशींच बोलूं लागे:—

"—झुण झुण पांखरा।
जा माझ्या माहेरा।
माझ्या कीं माहेरचा।
कमानी दरवाजा।
त्यावर बसोनि
निरोप सांगावा।—"

सारजेला विचार पडे–"आतां निरोप काय सांगावा?" त्या पांखराच्या ध्यानीं राहील असाच तो असला पाहिजे. थोडा विचार केल्यावर ती म्हणे–"हें पहा पांखरा, माझी आई तुला दिसेल; तिला ओळखायचा तुला मुळींच त्रास पडायचा नाहीं; कारण तूं ज्या कमानीवर बसशील त्या कमानीखालींच ती नेहमीं माझी आठवण करीत उभी असते–

शाल पांघरली, दारवंठा उभी राहे।
कोण्या पंडिताची माय-मायबाई माझी॥

तिचा भाऊराया (सखाराम) शिकून सवरून पंडित होणार अशी सारजेची खात्री असते व म्हणूनच ती आपल्या आईचें येवढें बडेजावाचें वर्णन करिते.

पांखराला घराच्या सर्व खाणाखुणा समजावून झाल्यावर व आईची माहिती करून दिल्यावर ती त्याला निरोप सांगते—"हें पहा पांखरूंदादा, तिला म्हणावें—

आपुल्या ग घरीं, सुखाचं पाखरूं ।
नको माझी चिंता करूं—मायबाई" ॥

आणि हें पण सांग, कीं जरी मी सुखांत आहें तरी तुझं मायेचं पांघरूण विसरलें नाहीं—

आपुलीया घरीं सुखाची नांदतें ।
चुडेचोळी तुझी लेतें—मायबाई ॥

इतकें होतें तोंच तें पांखरूं भुर्रकन् उडून् जाई. सारजादेखील घरांत जात असे.

इकडे यमुनेला सारजेची खुशाली अगदींच समजत नसे असें नाहीं. जावईबुवांचेंहि पत्र कधीं कधीं येई—

गोरीये जवानाचा, कागदीं नमस्कार ।
आलं पत्र डाकेवर–बाईच्या गांवाहून ॥

शिवाय आला गेला यमुनेला निरोप सांगतच असे. सखाराम गांवीं आल्यावर त्यानें जर सारजेची विचारपूस केली तर ती त्याला अभिमानानें सांगे– "अरे! कालच तुझ्या मेव्हण्याचें पत्र आलें. त्याचें अक्षर पण किती सुंदर आहे तें पहा. माझ्या बाळीचें भाग्यच तसें—

गोरीये जवानाचं, अक्षर मोत्यावेळी
दैव तुझं चाफेकळी–मालनबाई माझे" ॥

लेकीचा नवरा म्हणून लाडका झालेल्या जावयाच्या गिचमिड अक्षरांतहि मोती पहाण्याच्या वृत्तीचें सखारामाला हंसूं येई. तो हंसायला लागला कीं ती लागलीच म्हणे, "सख्या! हंसूं नकोस, मी कांहीं खोटें सांगत नाहीं. माझी मालन मोठी गुणाची! परवांच तो 'फलाणा' निरोप घेऊन आला–

सासरचे गुण, सांगती ब्राह्मण
तुझी बहिण सगुण, मालनबाई माझी ॥

गोरीये जवानाचा, राग रुद्र सदा
गंभीर माझी राधा-राजबाळी ॥
सासरीं गुणाची, जन म्हणती कुणाची
बहीण राघवाची-मालन बाई माझी ॥

असें होतां होतां शेकडों वेळां सूर्य उगवला न् मावळला. सारजेची आतां एका व्यक्तीशीं प्रत्यक्ष ओळख झाली होती व त्यामुळें भरदिवसा घरांत चोरून मारून लपंडावाचा खेळ खेळला जात होता. सासूचें जेवण झाल्यावर ती ओसरीवर येऊन बसे. घरांत सारजा मुक्यामुक्या उष्टींखरकटीं काढीत असे. इतक्यांत कुणाचीं तरी पावलें वाजत आणि–

भ्रतार आळवे, काहून कोमेजली
याद माहेराची आली, मालनबाई ॥

या चोरट्या आनंदांत भर घालावयास आणखी एक कारण घडलें. सारजेच्या बापाचें पत्र आलें, कीं सख्याचें लग्न पंधरा दिवसाच्या मुहूर्तावर ठरलें आहे.

सारजेचा सासरा घराचें बांधकाम सुरूं असल्यानें जाण्यास तयार नव्हता व सासरा जात नाहीं म्हणून सासूची तयारी राहिली. पण व्याह्याच्या विनंतीस मान द्यावा म्हणून सुनबाईबरोबर "आणखी एका माणसाची" रवानगी झाली.

एका बैलगाडींत सारजा बसली व बैलाचे कासरे 'दुसऱ्या माणसाच्या हातीं' पडले. शुक्राची चांदणी निघाल्यावर गाडीची घरघर सुरूं झाली. सारजेच्या माहेराची वाट जरा रानाडोंगरांतूनच होती. गांवची नदी ओलांडून चार शेतें अंतर गेल्यावर दिवस निघाला.

सारजेच्या आनंदाला सीमा नव्हती. चालली होती भावाच्या लग्नाला व पोंचविणारा सोबती म्हणजे जिवाचा कलिजा. धुरेकडे तोंड करून पाठमोरा बसलेल्या जीवधन्याला पाहून ती मनांत म्हणे—

माझीया चुडीयाचं, सोनं बहुत चोखट
घाल फांसे बळकट–देवा बापा नारायणा ॥

सारजेचा नवराहि आनंदांत होता. स्वतंत्र वातावरण, डोंगराचा रस्ता, पांखरांची चिल्‌बिल्‌, बैलांच्या घुंगराचे प्रतिसाद, सूर्याचीं कोवळीं किरणें, यामुळें दोघेहि सुखावून गेले होते. घरचा लपंडाव इथें चोरून मारून खेळण्याची कुणालाच आवश्यकता भासली नाहीं.

अशा स्वतंत्र वातावरणांत नेहमींच रहावयास मिळावें अशी तिच्या नवऱ्याची इच्छा होणें स्वाभाविक होतें. त्यानें ती उघड बोलून दाखविली. सारजा राजीच होती. कारण ती म्हणते—

चुडीयाच्या बळं, वस्ती करीन डोंगरीं
सोनं बांधीलं पदरीं–बापुजीरायानं ॥

आणि येवढें सोनें पदरीं बांधल्यावर सारजा त्याच्याकरितां काय करणार नव्हती ? तिला तर त्याचाच सर्वस्वी दम होता; त्याच्याच जीवावर तिच्या आकांक्षा उभारलेल्या होत्या. तिला खात्री वाटे, कीं त्याच्यासाठीं रानींडोंगरीं वस्तीच काय पण—

चुडीयाच्या बळं, हात पुरवीन गगना
मेरू करीन ठेंगणा, देवाबापा नारायणा ॥

असो. याप्रमाणें भराभर रस्ता कापला गेला. 'रोजदारवेळा' होत नाहीं तोंच गाडी गांवच्या शिवेला आली. आतां सारजेला माहेरची ओढ लागली. तिच्या मनांत भावजयीबद्दल विचार येऊं लागले. ती कशी असेल ? तिचा स्वभाव कसा असेल ? ती आपल्यासारखीच मनमिळाऊ असेल कीं दिमाखाची असेल ?...

सख्यालाच जिथें आपल्या जीवाची सोबतीण लग्नाआधीं पहातां आली नाहीं तिथें मग सारजीला तें कसें शक्य होतें ? तिचे आपले कल्पनेचे खेळ सुरू झाले. माझी वैनी अशी असेल न् ती तशी वागेल इत्यादि कल्पना करीत

तिनें तिची एक मूर्ति आपल्यासमोर उभी केली. सख्याला काळी बायको मिळणें शक्य नव्हतें असें तिच्या मनानें घेतलें. निदान ती सख्यासारखी तरी सुंदर असेलच—

गोरीचें गोरेपण, पहातां लागे ध्यान
सखा केवड्याचें पान, भाईया माझा ॥

भावजय जर गोरी असेल तर माझा सखाराम कांहीं असा तसा नाहीं. तोही केतकीच्या पानासारखाच आहे. भावाबद्दल सारजेला किती धन्यता वाटत होती !

सखारामाच्या लग्नाचा थाट वडिलांच्या नांवलौकिकास साजेसाच होता. सारजा लवकरच दंग झाली. नवी सोबतीण व भाऊराया यांच्याशिवाय तिला कांहींच सुचेनासें झालें. होमहवन होऊन सख्याच्या अंगावर सावधानीच्या अक्षता पडल्याबरोबर तिला उचंबळून आलें. आईबद्दलहि तिला धन्यता वाटली.

यमुनेच्या तोंडावर अर्थांतच समाधानी भरली होती. इतक्यांत सख्याची नजर पायरीवर उभी असलेल्या सारजेकडे गेली. तो हंसला व तीहि हंसली.

मायबाई तुझं पोट, सोन्याहून पिवळं
हिरे जन्मीले केवळ-भाऊराया ॥

मायबाई तुझं पोट, आहे सोन्याचं तगट *
हिरे जन्मीले प्रगट-भाऊराया ॥

पांच दिवस सोहळा पुरून जिकडे तिकडे आनंदी आनंद भरला होता. रात्रीं वरातीचा थाट झाला. हत्तीघोड्यावरून वरात मिरविली. वरातीची मिरवणूक सख्याला घेऊन चाललेली पाहून सारजा म्हणते—

दहाचा पालनवाला, बैसला हत्त्यावरी
धनरेषा माथ्यावरीं, मायबाई माझे ॥

* पत्रा.

जरी माझ्या बापूजीनं, नंदीग्रामीं होम केला
वीजयी पुत्र झाला–भाऊराया ॥

सहावे दिवशीं पाहुणे मंडळी जावयास निघाली. सारजेच्या नवऱ्यानेंहि आपली तयारी केली. सारजा मात्र आल्यासारखी चार दिवस रहाणार होती.

सारजाला बोलावयास आतां नवीन मैत्रीण मिळाली. तिच्यासारख्या प्रेमळ नणंदेकडून तिच्या भावजयीला त्रास होणें शक्यच नव्हतें. उलट तीच तिला सांगे—"बैनी, तुला कुणी असं सांगितलं असेल कीं नणंदेशीं जपून वाग, पण तसं कांहींएक करायचं नाहीं. तुझ्या नशीबानं तुला सासूहि चांगली मिळाली आहे. तिच्याबद्दल वेडावांकडा ग्रह करून घेऊं नकोस—

नका निंदू गोरेबाई, आमच्या मायबाई
तिला कडूपणा नाहीं–भावजये ॥

शिवाय, बैनी ! आमच्या घरच्या चार गोष्टी तुला सांगतें. माझा भाऊराया आतां मिळविता झाला तरी कसा सुतासारखा सरळ आहे. तो सर्वांशींच मोकळेपणानें वागतो. उगीच कुणाला अरे कारे म्हणत नाहीं. तुला जर असें तुसडें बोलायची संवय असेल तर ती तोडून टाक, कारण भाऊरायाला तें खपणार नाहीं.

गोरेबाई भावजये, तुसडे बोलाची ।
भीड माझ्या ग लालाची, वहिनीबाई ॥

आणखी घरांत पण जपून वाग. आपले घरीं चार मंडळी हरघडी येणारी.

गोरेबाई भावजये, हळूं बोल तूं घरांत
कचेरी आंगणांत, भाऊराया ॥

तसेंच घरांत आदळआपट देखील करूं नकोस. माझा दादा प्रकृतीचा मोठा नाजुक आहे, म्हणून—

हळूं टाक गोरेबाई, जोडव्याचा पाय
निजला जागा होय–भाऊराया" ॥

सारजेला आपली वैनी म्हणजे एक रत्न वाटे. तिच्या हातून चूक झाली तर ती संभाळून घेई व तिला समजावून सांगे. पण कधीं कधीं तिची भावजय अकारण खिन्न होत असे. कदाचित् तिला माहेरची आठवण झाली असेल असें वाटून सारजा तिला प्रेमानें कुरवाळीत जवळ घेई पण ती नीट बोलतच नसे. सारजेला वाईट वाटे. तथापि ती तें फारसें मनावर घेत नसे. कारण तिला माहित होतें—

भाऊ ग आपला, भावजय पराई
मनधरणी करावी, आपुल्या भावासाठीं ॥

ती आपली तिच्याशीं गोडगोड बोलून तिला आनंदी करण्याचा प्रयत्न करीत असे. तरी देखील हे सारे यत्न जेव्हां निष्फळ होत, तेव्हां ती आपलें अमोघ अस्त्र काढीत असे. तोंड गोरेंमोरें करून ती म्हणे—

"बरं ग वैनी ! मी तुझ्याशीं एवढ्या प्रेमानें बोलतें पण तूं मात्र चकार शब्दहि बोलत नाहींसना ! कशाला बाई तूं बोलशील ? आतां आपल्यालाच दूर रहावं लागेल—

भावजयी तुसडं, कशाला जाऊं घरा
*** बिदि भेटेल सोयरा-भाऊराया ॥**

तूंच जर असें वागायला लागलीस तर मीच बाई इथें कशाला येऊं ? माझा भाऊ माझी कुठेंहि भेट घेईल !"

सारजेचें हें अस्त्र कधींच निष्फळ गेलें नाहीं. भावजय एकदम म्हणे—

"हें काय बरं वन्स ! मी तुमच्याशीं अशी काय बरं वागलें ? मला आपलं थोडं उदास वाटतं इतकंच ना !"

"आतां तुला उदास वाटणार नाहीं तर काय ?" सारजा त्याच आवाजांत पण लटक्या रागानें म्हणे–"आमच्याशीं बोलण्यांत तुला आतां असेंच वाटेल.

* कुठेंहि.

तूं आपल्या नवऱ्याची लाडकी होशील मग कशाला आमची पर्वा करतेस ? गोऱ्यागोमट्या पोरीवर काय, कुणीहि खुष होईल. मग काय वैनीबाईंचा थाट—

काळी चंद्रकळा, नेसतां आंग दिसे
कंथाला मोल पुसे-गोरेबाई ॥"

"हे काय वन्स ! मी अशानं तुमच्याशीं मुळींच बोलायची नाहीं. मी जातेच कशी," असें म्हणून वैनी फणकाऱ्यानें उठून जात असे. पण सारजा कसली वस्ताद ! ती तिला मुद्दाम बसवून घेई, आणि थट्टा करून करून तिला अंतर्यामीं खुष करून देई. मग दोघीहि धुणीं घेऊन नदीवर जात.

काळी चंद्रकळा, धुण्यानं झाली गोळा
रुपये दिले साडे सोळा-गोरेबाई ॥

ज्या काळीं पांच रुपये महिन्यांत एका कुटुंबाचें पालनपोषण होत असे त्या काळीं साडेसोळा रुपयांची चंद्रकळा रोजच्या वापराला काढणारी सारजेची भावजय प्रेमळ लोकांच्या व धनधान्याच्या घरीं पडली होती हें उघड आहे.

एकदां असें झालें कीं, ज्या सुधारलेल्या जगांत सख्याचें शिक्षण झालें त्या गांवची कांहीं मित्रमंडळी सखारामाकडे चार दिवस मौज म्हणून आली. इतर करमणुकीचीं सुधारलेलीं साधनें तिथें नव्हतीं म्हणून मित्रमंडळीच्या आग्रहावरून एका रात्रीं नायकिणीचें गाणें ठरलें. घरच्या मंडळीस हें ठीक वाटलें नाहीं, पण मित्रमंडळीचें मन मोडूं नये म्हणून त्यांनीं कांहीं म्हटलें नाहीं. सारजेला वाटे, असे चाळे सख्या करूं लागला तर घराची माती होईल; पण तसें होणें शक्य नव्हतें. सख्याचें लहानपण सात्विक वातावरणांत गेलें होतें. शिवाय बाहेर ओढ घेण्यालायक घरांत कांहीं पोवाडे नव्हते. पण सारजेची भोळी भीति ! तिचें गाणें चालूं असतांना ती सहजच मनांत नायकिणीला उद्देशून म्हणते—

"अग ! तूं काय आपलें मोहजाल पसरूं शकणार ! माझी गोरेबाई तुझ्या-पेक्षां कितीतरी सुंदर आहे.

सावळी कळवातीण, नको जाऊं वाड्यांतून
तुझ्या चढीं नायकीण-गोरेबाई माझी ॥

शिवाय माझा भाऊरायादेखील तिला जीवाजवळ धरतो.

दारवंठा उभी, चिल्यापाल्याची नागीण
कंथ म्हणे भाग्यवान्-गोरेबाई माझी ॥

इथें सारजेनें 'नागीण' शब्द इतका नेटका वापरला आहे कीं एकाच शब्दानें जणुं त्या कलावंतिणीला सुचविलें "महामाये ! पहा, ही नागीण दारांत उभी आहे. ही दिसायला पिवळी कोवळी आहे पण सुंदर म्हणून तूं जर हिला धरावयास जाशील तर तुझ्या जिव्हारीं चावा घ्यावयास ही कमी करावयाची नाहीं."

पंधरा दिवस तीनवार निघून गेल्यावर सारजेला सासरचें बोलावणें आलें. सारजा जावयास निघाली. आतां माहेरचें सुख भोगावयास मिळणार नाहीं; सासरचा बांध असल्या सुखाच्या समयीं आपल्याला अडवील म्हणून सारजेचें हळुवार मन झुरूं लागलें. जातांना ती आईजवळ आली. आईनें तिच्या तोंडावर हात फिरवून तिला पोटाशीं धरली.

"सारजे ! आल्यागेल्याबरोबर निरोप धाडीत जा. तुला आतां सासरची गोडी लागेल व मग आम्हांला तूं निरोप देखील नियमितपणें धाडण्याचें विसरशील."

सारजा गहिंवरून आईच्या पोटीं दडली व दबल्या आवाजांत म्हणाली— "आई असं कसं म्हणूं ?

* कलावंतीण.

जन्म घेतला पोटीं, कशी म्हणूं मी वंगळ
तूं कां केळी मी कंबळ *—मायबाई ॥

माझं तुझ्यावांचून कसं निभेल ?" पुन्हां ती म्हणते—"आई ! तुझी भेट आतां वर्षसहामहिन्यावर गेली. दिवाळीला मात्र मला न्यायला पाठवावयास विसरूं नकोस—

बिजेच्या अक्षदेंत, मी कीं घेईन मोहरा
ओवाळीन तुझा हीरा—मायबाई ॥
बिजेच्या अक्षदेंत, मी घेईन ग सोनं
ओवाळीन तुझं तान्हं—मायबाई माझे ॥

शेवटीं मोठ्या कष्टानें तिनें आईचा निरोप घेतला व ती घरांत गेली. भावजयीचे डोळे पाण्यानें भरून आलेले पाहून तिला पुन्हां भडभडून आलें. भावजयीला मिठी मारून ती म्हणते—"वैनी ! दिवाळीला भाऊरायाला मला आणावयास सांग.

दिवाळी दसरा, वर्षाचे येती दोन
नको करूं माझेवीण-गोरेबाई ॥
बिजेच्या अक्षदेंत, मी घेईन ग मोती
ओवाळीन तुझा पती-गोरेबाई माझे ॥

किंवा, वैनी ! तूं जर बिजेला माहेरीं गेलीस तर इतकें तरी करावयास विसरूं नकोस.

दिवाळी दसरा, आला कार्तिक महिना
कंथ धाडीजो पाहुणा-गोरेबाई ॥

निदान दादाला तरी माझ्या घरीं पाठव."

* केळफूल.

भावजयीला आपल्या नणंदेबद्दल अत्यंत प्रेम व आदर वाटत होता. तिला निरोप देतांना तिची मिठी सोडवून ती तिला नमस्कार करावयास लागली पण सारजेनें तिला अगिकच घट्ट धरून सांगितलें—"वैनी! माझा दादा माझ्यापेक्षां वडील आहे, तेव्हां तूं मानानें मोठी झालीसच.

गोरेबाई भावजये, नको पडूं माझे पाया
वडील रामराया—सखा माझा !॥

सर्वांचा प्रेमानें निरोप घेऊन सारजा गाडींत बसली. बसल्यानंतरहि तिनें दाटून आलेल्या उमाळ्यानें आईला पुन्हां दिवाळीची आठवण करून दिली.

माझे दोन्ही डोळे, आहे तुझ्या गांवाकडे
कधीं पाहीन डोळ्यापुढें–फिरून मायबाई॥"

गाडी चालूं लागली व सारजा सासरच्या वाटेला लागली.

अंतःकरणाची प्रेमळ, भावनेची कोमळ; दृष्टीची स्नेहाळ अशी ही वेल्हाळी सारजा सर्वांना चुटपुट लावून आपल्या सासरीं निघून गेली.

स्वतःच्या भावजयीला कळवळ्यानें साऱ्या गोष्टी समजावून देणारी, जातांना डोळे भरून आले म्हणून आईच्या पदरानें डोळे कोरडे करणारी किंवा दादा हंसला म्हणून उगीचच गोडसें हंसून देणारी सारजा सुशिक्षित नव्हती; लांब लांब पत्रें तिला लिहितां येत नव्हतीं किंवा सुंदरशा पुस्तकांत तिला डोकें घालतां येत नव्हतें; तरी तिच्या आयुष्यांत एखादी उणीव होती असें नाहीं. उलट, ज्या उमाळ्यानें ती स्वतःच्या वहिनीकडे, भावाकडे किंवा आईकडे पहात असे तो उमाळा किंवा तेवढी ओढ आजच्या सारजेंत दिसणार देखील नाहीं. तिचें आयुष्य सुखानें गेलें, तिचें बालपण व तारुण्य, दोन्ही अवस्था सुखानें गेल्या. हंसतां हंसतां गेल्या म्हटल्यास शोभेल. सारजेचें एकंदर आयुष्य पाहतांना सहजच मनांत येतें कीं नव्या जुन्याची सांगड घालतांना ज्या गोष्टी आम्ही विसरलों त्या ह्याच. आज कोणत्या भावजयीला नणंद प्यारी वाटते? कोणती नणंद भावजयीला पोटाशीं धरते? हे प्रश्न विचारण्यासारखे आहेत. त्यावेळचें जीवन आणि आतांची राहणी यांत अंतर पडलें आहे; किंबहुना मोठी खिंड

पडली आहे. आमच्या सुखाच्या कल्पना बदलल्या आहेत; आमचे मनोभाव बदलले आहेत. सारजेचें आयुष्य कदाचित् माझ्या भगिनींना नीरस वाटेल पण तें तिला वाटत नव्हतें. सारजेपासून आपल्याला शिकण्यासारखी म्हणा किंवा आश्चर्य करण्यासारखी म्हणा–गोष्ट म्हणजे तिच्या हृदयाची खोली! त्यांत सर्वांना जागा आहे, जीवधनी तर सिंहासनीं बसला आहे; सासूसासरे आहेत; जन्मदात्री माऊली आहे, सोन्यासारखा भाऊ आहे; गोरीगोमटी भावजय आहे; सर्वांना तिच्या हृदयांत ठाव मिळाला आहे. तिला कदाचित् काव्यगुण समजत नसतील, किंवा सुबद्ध कवितारचना येत नसेल पण तिला येवढें माहित आहे कीं ज्या वस्तू व्यवहारांत दिसतात त्याच वस्तू खऱ्या; कल्पनेच्या कसरतीपेक्षां भावनेचा उमाळा केव्हांही श्रेष्ठच!

पण काव्यगुणाची, सुबद्ध रचनेची किंवा कल्पनामधुर रम्य भावगीतांची अपेक्षा तरी कुठून करायची? गांवाजवळ विशाल नदी वहात असली म्हणजे तिच्या कांठीं फार झालें तर घांट, देवळें असण्याचा संभव. तिच्याभोवतीं सुंदरसे बागबगीचे असतील, फुलवाड्या दिसतील; तयार केलेले लताकुंज आढळतील, देवळांतील घांटेचा कर्णमधुर निनाद कानावर येईल, टाळमृदंगाचें तालबद्ध संगीत असेल किंवा घांटावर बसून ध्यानमग्न बसलेल्या सज्जनांचे सन्मंत्र ऐकूं येतील; म्हणून सर्वच ठिकाणीं असें असावें अशी इच्छा धरणें वेडेपणाचें नाहीं का व्हायचें? रानीं डोंगरीं चिंचोळ्या चिरींतून वहाणारी झरी कधींतरी रेखीव असते का? अविरत वाहणाऱ्या पाण्याची खळखळ, कर्णमधुर कलरव; वाऱ्याचीं गोड गाणीं; सृष्टीचे प्रतिसाद; फुलांची बरसात; यापरता अन्य देखावा तिथें दिसत नाहीं. पण तिथेंहि आपलें मन लोभावून जातें ना?

रामटेक गडावरी, फुलं सांडिलीं जाईचीं
गोरी पाऊलें माईचीं—सीताबाई ॥
शेजारिणी बाई, आंगण झाडूं लाग
तुझी मैना माझा राघो—खेळतील दोघं ॥
देवाबापा नारायणा, तपूं नको चारी रान
गांवा गेले पंचप्राण—माझे दोघे ॥

ह्या ओव्या किंवा—

आपल्या ग घरीं, सुखाचं पाखरूं
नको माझी चिंता करूं-मायबाई ॥
चुडीयाच्या बळं, हात पुरवीन गगना
मेरू करीन ठेंगणा—देवाबापा नारायणा ॥
गोरीचें गोरेपण, पाहतां लागे ध्यान
सखा केवडयाचें पान--भाईया माझा ॥
दारवंठा उभी राहे, चिल्यापिल्याची नागीण
कंथ म्हणे भाग्यवान—गोरेबाई माझी ॥
जन्म घेतला पोटीं, कशी म्हणूं मी वंगळ
तूं कां केळी मी कंवळ—मायबाई ॥
दिवाळी दसरा, वर्षाचे येती दोन
नको करूं माझेवीण—गोरेबाई ॥

अशा ओव्या वाचतांना आपण असें समजायचें कीं आपण गांवाजवळच्या नदीवर नसून रानवटींतील झरीवर बसलों आहोंत व "शकुंताचे मधुरतर स्वर" आपले कानीं पडताहेत. या ठिकाणीं शहरच्या सरोवरांतील संगमरवरी सिंहासनावर बसून चंद्राच्या प्रशान्त प्रकाशांत राजाराणी विश्रंभालाप करीत बसले नसून, झाडाच्या हिरव्या डहाळीवर स्वच्छंद विहंगमाचें जोडपें एकमेकांस बिलगून चिलबिलत आहे.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इथें कुशल कल्पनाविलास पहावयाचा नाहीं. अभ्यास करून डोकें खाजवून उमटलेला अर्थगौरव पहायचा नाहीं. किंवा पंधरा पंधरा मिनिटें विचार करून करून लिहिलेल्या प्रत्येक शब्दांमधून पदलालित्याचा खोज घ्यावयाचा नाहीं. इथें फक्त एकच गोष्ट पहावयाची आहे व ती म्हणजे—" दाटून आलेल्या असीम भावनांची उसळी "

--अस्तु--

३. जाई तुझा वास आला—मायबाई माझे ॥

कांहीं दिवसांपूर्वी यमुनेच्या सासूनें जी भूमिका घेतली होती तीच भूमिका यमुनेनें धारण केली. घराचा सर्व भार तिनें जाणत्या सुनेवर सोंपवून दिला व काम पडल्यास चार गोष्टी सांगेन येवढेंच सांगितलें. ती बरी कीं तिची नात—सखारामाची पहिली चारपांच वर्षांची मुलगी चिमणी—बरी! जानकीला म्हणजे सुनबाईला दिवसभर घरकाम पहावें लागल्यामुळें चिमणीला आजीचीच जास्त ओढ लागली.

इतक्या लवकर सुनेच्या हवालीं कारभार देऊन स्वतःचा सासूपणाचा बडेजाव मिरविण्याची हौस नसल्यामुळें मोकळ्या झालेल्या यमुनेला शेजारच्या बायाबापुड्या दोष देत असत आणि वेळ पडल्यास नांवबोटेंहि मोडण्यास कमी करीत नसत. पण त्या माऊलीनें तें कधींच मनावर घेतलें नाहीं. कुणी आपल्याला चांगलें म्हटलें काय किंवा दोष दिला काय या गोष्टीची तिला पर्वा नसे; किंबहुना अशा गोष्टींबद्दल एक प्रकारची उदासीनता तिच्या अंगीं बाणली होती. अनुभवानें विकास पावलेल्या विवेकशक्तीचा पगडा तिच्यावर उत्तरोत्तर बसत गेला व म्हणून जगाकडे पहातांना ती स्वतःला वगळून पहात असे. तिची परमेश्वरावर श्रद्धा होती व स्वतःच्या गुरुमाऊलीवर भरंवसा होता. पूर्वपरंपरेनें तिच्यापर्यंत आणून टेकविलेल्या संस्कारांची तिच्यावर छाप पडली होती. तिचे व्यावहारिक किंवा जीवनविषयक विचार तिच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे :—

नाशीवंत देह, नचि येई कवण्या कामा
कारणीं लाव रामा, – प्रपंचातुनीं ॥

नाशीवंत देह, अग्नीची शिदोरी
तुम्ही घेतलं पदरीं, – गुरुराया ॥
प्रपंचा येऊनि, पडली भोंवरजाळीं*
विसरली नामावलि, – गुरुराया ॥
जन करिती निंदा, सुखें त्याला निंदूं द्यावें
तुझे चरण वंदावे, – गुरुराया ॥
जगाचीये तोंडीं, सावणाची वडी
माझ्या देहाची पासोडी, शुद्ध झाली ॥
जात्यावर बसूं, दळणाच्या भावं
हृदयीं तुझं नांव, – गुरुराया ॥

लोकनिंदेला साबूची उपमा देऊन त्यायोगें आपल्या देहाची पासोडी स्वच्छ होते असें समजणाऱ्या यमुनेच्या कानीं 'निंदकाचें घर असावें शेजारीं' चा गजर पडत होता असें दिसतें.

अशा प्रकारच्या दृष्टिकोनामुळें तिनें स्वतःचें स्तोम कधींच माजविलें नाहीं. तिला तसें करणें अगदींच अशक्य नव्हतें. आतां सखाराम म्हणजे एक बडें प्रस्थ होऊन बसलें होतें :—

राजाच्या कचेरींत, लंवगेचा झाला सडा
मानाचा घेतो विडा, जीवनप्राण सखा ॥

तेव्हां या 'पंडिताच्या मायबाईनें' मनांत आणलें असतें तर भरजरी शाल अंगावर घेऊन देवळांत कथाकीर्तनास जाणें व तेथें चार बायकांचें लक्ष पुराणिकबोवांवरून आपलेकडे ओढणें तिला सहज शक्य होतें. पण तें व्हावें कसें ? तिला स्वतःचें असें अस्तित्वच नव्हतें. प्रेमांत सर्व कांहीं विलीन झालें. सखाराम येवढा पंडित झाला पण त्याबद्दल तिला कांहीं मोठेंसें वाटलें नाहीं. उलट त्याला कुठें कामाच्या गडबडींत घरीं यावयास वेळ झाला कीं तिचा

* संसाराच्या भोवऱ्यांत.

जीव खालींवर होत असे व एकाद्या अजाण बालकाबद्दल आईला जशी चिंता वाटावी, तशी तिला चार लोकांना शहाणपण शिकविणाऱ्या सखारामाबद्दल वाटे, कीं—'कुठें रानीं डोंगरीं गेला माझा सखाराम !'

बहिणीचा एकला, मायेचा मोत्यासर
कोठें लागला उशीर, जीवनप्राणसख्या ॥
मायेचा एकला, बहिणीचा लहू *
किती खालवर पाहूं, जीवनप्राणसख्या
झणी कांटा मोडे, प्राणसख्याच्या पाऊलीं
माझ्या नेत्राची बाहुली, दुखावली ॥

अशा प्रकारें तिचे दिवस निघून जात. चिमणीला आजीचा फारच लळा असल्यामुळें तिचें सारें तिलाच करावें लागे व तिच्यापायीं तिचा बराच वेळ निघून जाई. दररोज संध्याकाळीं चिमणी आजीच्या पोटीं दडली म्हणजे तिला कहाणी सांगण्याचा आग्रह करीत असे. नंतर आजीनातींच्या गोष्टी सुरू होत. या स्निग्ध गोष्टींत कुणालाहि एक प्रकारचा अननुभूत आनंद वाटल्याखेरीज रहायचा नाहीं–!

गाईवासरें परत येण्याची वेळ चांगली काळी झाल्यावर चिमणी आपल्या घरट्याकडे धांवत येई व आजीच्या पदरांत दडत असे. आजीनें पोटाशीं धरल्यावर मग गुलगुल गोष्टी सुरू होत :—

"चिमणे ! किती खेळतेस सारा दिवस ! लहान पोरीनं सांजवाती लावल्यावर निजून जावं. आज देवाला जातांना मी तुला किती हांका मारल्या; पण तूं कांहीं परतली नाहींस. बरें, तिसांजीला सूर्याला नमस्कार केला होता ?"

या यमुनेच्या प्रश्नास चिमणी होकारार्थी मान हालवीत असे.

* डोळ्यांतील बाहुलीइतका लाडका. या शब्दाविषयीं मला शंका आहे. लहू म्हणजे रक्त. तेव्हां इथें रक्त किंवा काळीज घेतलें तरी चालेल. इत्यर्थ हाच कीं सखाराम बहिणीचा लाडका होता.

"केव्हां केलास–? अन् नमस्कार करितांना गाणं म्हटलंस ?"

"नाहीं, आजी!" चिमणीचें बोबडे बोल निघूं लागत. "मी विसरलें, नमस्कार केल्यावर मी फक्त इतकंच म्हटलं—

देवाबापा नारायणा, तुम्ही अस्तमाना जाजा
याद माझी राहूं देजा, हृदयांत ॥

बरं ! आजी, उद्यां मी तुझ्याबरोबर येईन; पण मला एक कहाणी सांग ना !"

"चल, मी नाहीं सांगत जा; रोज उठून तेवढी मात्र आठवण राहाते नाहीं का ?"

प्रेमळ आजीचा हा लाडका राग कसा घालवावा हें त्या चिमुरड्या पोरीला चांगलें गवसलें होतें. त्यामुळें—

तोंडामध्यें तोंड, घाले पांखरावाणी
रागाचं केलं पाणी, जीवनप्राण सई ॥

हा उपाय कधींच विफल झाला नाहीं. नंतर यमुना म्हणे—

"मला अगोदर काल सांगितलेली गोष्ट सांग. काल तुझ्याकडून मी ती चांगली म्हणवून घेतली होती."

नवीन गोष्टीच्या आशेनें बिचारी चिमणी आपली चोंच हालवीत असे. एकएक शब्द लावून ती कशीबशी म्हणे. शिवाय मधूनमधून तिला यमुना सांगतच असे :—

कृष्णाचा जन्म झाला, स्वरगीं वाजे घंटा
आनंद झाला मोठा, गोकुळांत ॥
कृष्णाचा जन्म झाला, आनंदल्या नरनारी
पाहूं गेल्या नंदाघरीं, बाळ तान्हा ॥
केवढें पुण्य केलें, यशोदा सुंदरी
परब्रह्म पायावरी, न्हाणीयेलं ॥

कृष्णाचं तान्हेपण, यशोदेच्या घरीं
नंदाहातीं दोरी, पाळण्याची ॥
यशोदाबाई म्हणे, हरि माझा वरसाचा
नाश केला गोरसाचा, गवळणीच्या ॥
यशोदाबाई म्हणे, हरि माझा ग लहान
नका घेऊं ग तुफान, तुम्ही गवळ्यांच्या नारी ॥
कृष्णाजीच्या खांद्यावरी, घोंगडीची घडी
पेंद्या सुदाम तुझे गडी, सावळ्या कृष्णनाथा ॥
यशोदाबाई म्हणे, हरि माझा ग घरीं
नित्य गोरसाची चोरी, कृष्णाजीची ॥
तुळशीच्या वृंदावनीं, राधिका पाडे जुडा
नेला वेणीचा केवडा, सावळ्या कृष्णाजीनं ॥
पहांटेच्या प्रहरीं, धेनु झोपीं गेल्या
मुरलीनें जाग्या केल्या, सावळ्या कृष्णाजीनं ॥
धेनु हंबरती, वासरं कुठे गेले
गंगेच्या पाण्या नेले, सावळ्या कृष्णाजीनं ॥
पहांटेच्या प्रहरीं, नको जाऊं दूरी
जवळ धेनु चारी, सांवळ्या कृष्णनाथा ॥
पारिजातकाचं झाड, सत्यभामेच्या मंदिरीं
नित्य पुष्प शेजेवरी, कृष्णाजीच्या ॥
सोळा सहस्र सुंदरी, सोळा सहस्र महाल
कोण्या मंदिरीं रहाल, सांवळ्या कृष्णनाथा ॥
रुसली रूखमाबाई, बैसली तळ्याकांठीं
धरिली हनुवटी, सांवळ्या कृष्णाजीनं ॥

मारिला कंस मामा, देवी[1] करे विरजना[2]
कैसी विरजली[3] सजणा, माझी दिवाळीची चोळी ॥
गाई हंबरती, वासराच्या माया
सोडी बिरडे[4] देवराया, प्रपंचाचें ॥

याप्रमाणें धरसोड करून बळजबरीचा सवाल म्हणून चिमणीनें आपली गोष्ट संपविली म्हणजे यमुना तिला नवीन गोष्ट सांगे—

" हें पहा चिमणे ! अगोदर देवाला नमस्कार कर व म्हण—

रामाच्या नावानं, कोण वाया गेलें
पाषाण तारिले, समुद्रांत ॥

पूर्वी दशरथ नांवाचा एक राजा होता. त्याला राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न असे चार मुलगे होते. राम सुंदर होता व सर्वांचा लाडका होता. आईबापांनीं त्यांचा खूप लोभ केला व ते गुरूकडे विद्या शिकूं लागले. पुढें कांहीं दिवसांनीं रामाचं लग्न झालं. "

मधून मधून यमुना सुंदरशा ओव्या म्हणत असे :—

सीता स्वयंवर, जनकाचे घरीं
सीताबाई ग नवरी, रामरायाची ॥
दूरून दिसते, लाल पालखी कोणाची
सीता जानकी रामाची, घरीं आली ॥

नंतर कैकेयीचा गोंधळ, रामाचा राज्याभिषेक राहिल्याची हकीगत, दशरथराजाचा मृत्यु, रामाच्या वनवासाची हकीगत वगैरेपर्यंतचा धागा नीट जोडून ती म्हणे :—

१ देवकी; २ शोक; ३ नाहींशी केली; ४ बेड्या (दावें).

लंकेच्या रावणानं, विरोधभक्ति केली
सीता चोरूनीया नेली, रामरायाची ॥
मंदोदरी म्हणे, रावणा काय केलं
नसतं विघ्न आणिलं, लंकेवरी ॥

पुढें सुग्रीवसख्य झाल्यावर रामरावण युद्धाची हकीगत, नंतर लक्ष्मणाला लागलेली शक्ति व इंद्रजिताचा वध इत्यादि सांगून झाल्यावर ती पुढें जाई. येवढें घनघोर युद्ध झालें पण या प्रचंड रणधुमाळींतून यमुनेच्या ध्यानीं एकच गोष्ट राहिली होती व चिमणीलाहि तीच पटवून देणें तिला योग्य वाटत होतें :—

मारिला इंद्रजीत, सुलोचना सती
तिनं हांसविला पती, भक्तिभावानें ॥

पुढें रामानें बिभीषणाला राज्य दिलें व अयोध्येला परत आल्यावर समारंभानें राज्याभिषेक करून सुखानें राज्य केलें. इथपर्यंतचा वृत्तांत झाल्यावर पुढें तिनें एकदम सीतेची गोष्ट सांगितली. सीतेचा त्याग तिला आठवणें स्वाभाविक होतें. ती अगदीं निरपराधी असतांना तिच्यावर ओढवलेल्या आपत्तीमुळें तिच्याबद्दल कुणालाही सहानुभूति वाटते; मग यमुनेसारख्या हळुवार अंतःकरणाच्या माउलीस तसें वाटलें यांत काय नवल ! सीतेची प्रतिमा तिच्या म्हणजे चिमणीच्या मनावर उमटवून देणें तिला अगत्याचें वाटलें. सीतेला लक्ष्मणानें नदी ओलांडून टाकून दिलें व त्या बिचारीनें हंबरडा फोडला. त्या वेळीं सतीच्या हंबरड्याला पतीनें जरी कान दिला नाहीं तरी परमेश्वराला तसें करावेंसें वाटलें. आदिकवींनीं तिचा टाहो ऐकला व तिला आश्रमांत नेलें. वाल्मीकीची ही मानलेली दुहिता त्या वेळीं गरोदर होती; तिला प्रेमाचा आसरा नव्हता आणि परमेश्वरनामस्मरणांतूनहि मधून मधून आठवत असलेलीं स्मृतिचित्रें आगामी भवितव्यतेच्या बेबंद घटनेनें पुसटून जात होतीं. पूर्वी चवदा वर्षें वनवास भोगला, पर्वतदऱ्या पायाखालून घातल्या, खडकावर रात्र गुजारली, पण त्या वेळेला सुखाचें

स्थान नेहमींच उजव्या हातावर रहात असे. पण—! आतां तिला कांहींच दिसत नव्हतें. अशा हवालदिल स्थितीची कल्पना करण्याइतकी यमुना सहृदय होती. ही हकिगत सांगतांना ती गहिंवरून गेली व म्हणूनच दाटून आलेल्या उमाळ्यानें तिला म्हणणें भाग होतें :—

*** धरतरीची गादी, पाषाणाची उशी**
तुला झोंप आली कैसी–मायबाई सीते ॥

पण निरपराधी माणसाबद्दल सहानुभूति वाटूं लागली म्हणजे अपराधी माणसाबद्दल चीड येते. रामासारख्या पूजनीय पुरुषानें ही घोडचूक केली पण त्याला दोष देण्याइतकी अश्रद्धा—हो, इथें असेंच म्हटलें पाहिजे—तिच्या ठायीं असणें शक्य नव्हतें. सीतेच्या नशीबाला बोल देऊन ती स्वस्थ बसली व तिनें पुढें गोष्ट सांगण्यास सुरुवात केली.

सीतेच्या नशीबानें असा दावा साधला पण पातिव्रत्याची पुण्याई कांहीं निस्तेज झाली नाहीं. राजकन्या व राजपत्नी सीता मृगाजिनावर शयन करती झाली व दिवस पूर्ण भरल्यावर लव आणि कुश त्याच आसनावर जन्मास आले. त्यांच्या जन्मदिवशीं कदाचित् राजवाड्यांतील दिवाळसण साजरा होऊं देण्याचें चित्रगुप्ताच्या रोजनिशींत नोंदलें नसेल पण पातिव्रत्याची ज्योत तिथें होती—

मेरूची समई, चंद्राची काडवात †
सिताबाई अरण्यांत, बाळंतीण ॥

सीतेची करुणरम्य कथा सांगून झाल्यावर झोंपेनें लवलवलेल्या चिमणीस यमुना थापटून थोपटून निजवीत असे. चिमणीसारखी गोड पोरगी नात लाभली म्हणून तिला आनंद वाटे. लहानपणापासून रामायणमहाभारतांतील हृदयस्पर्शी व परिणामकारक कथानकें सांगणारी यमुनेसारखी गुरुमाऊली चिमणीच्या नशीबानेंच मिळाली होती, नाहीं का ?

* धरणीची. † ज्योत.

सुखाच्या सरींनीं यमुना लवून गेली होती. तिनें कुणाचें अहित केलें नव्हतें किंवा कुणाचें अनिष्ट चिंतिलें नव्हतें. परमेश्वरी संकेतानें तिला सुख भोगावयाचा हक्कच होता; व ह्या सुखाच्या सरी अविरत येत होत्या.

यमुनेनें आपल्या काळजाचा एक भाग देवाब्राह्मणांसमोर एका जबाबदार माणसाच्या हवालीं केला होता. सारजेचा जीवधनी असा तसा नव्हता—

गोरीये जावायानं, तप केलं गंगेकांठीं
चांदणीच्या रूपासाठीं, मालनवाईच्या ॥

तेव्हां दैवानें खैर करून चांदणी पदरीं घातल्यावर आयुष्याच्या चांदरातींत त्याचा तोंडवळा उजळून दिसल्यास नवल नाहीं. शिवाय सारजा जी त्याच्या स्वाधीन केली होती ती कांहीं उगीच नाहीं, तर :—

गोरीये जावाई, विष्णूचं रूप साजे
तुळस दिली पूजे, मालनबाई माझी ॥

तुळसीचा पाला ओरबाडून टाकण्यास कांहीं तुळस दिली नव्हती तर तिची पूजा करण्यास त्याच्या स्वाधीन केली होती.

एकदां सारजेकडचें पत्र आलें व त्यामुळें सर्वांना आनंद होऊन दुसऱ्याच दिवशीं यमुनेच्या ओसरीवर शिंपिण आली—

चोळी शिवशी शिंपिणी, मोती लाव पसापसा
चोळी जाते दूर देशा, मालनबाईच्या ॥

आणि पसाभर मोत्यांची चोळी शिवून होतांच कासाराला बोलावणें गेलें.

कासारा दादा तुझी, बांगडी कांचाची
सखी वाटोळ्या हातांची, मालनबाई माझी ॥

चोळीवर चुड्याचें वाण ठेवून यमुनेनें लागलीच तयारी केली. सारजेच्या सासरीं आनंदच भरला होता. यमुनेनेंहि या आनंदांत पूर्णपणें भाग घेतला. दोन महिन्यांनीं सारजेचें शिंगरूं तिच्या मांडीवर मुठी चोखूं लागलें.

त्याच्याकडे पहातांच यमुनेच्या प्रेमाला भरती येई व तिच्या गोड गळ्यांतून सूर निघत :—

अतीशे साजीरपण, माझ्या जीवाला जंजाळ
डोळा घालूं दे काजळ, राजस बाळ माझा ।
मोठमोठे डोळे, भुवया चंद्रज्योती
साजीरा म्हणूं किती, बाळराजा ॥
मोठमोठे डोळे, हरिणीच्या पाडसाचे
तैसे माझ्या राजसाचे, मालनबाई माझी ॥

सारजा देवाला जाऊन आल्यावर तिला घरापर्यंत पाठविण्याची यमुनेनें सारजेच्या सासूला विनंति केली. तिची परवानगी घेऊन ती सारजेला घेऊन घरीं आली. चिमणीला तर स्वर्ग आतां दोनच बोटें उरला होता. वाटेल तो हट्ट पुरवावयास आत्या आली, मग काय ! सारजेजवळ चिमणी आली म्हणजे तिचा वाटेल तो हट्ट पुरविला जात असे. सारजा देखील तिला कांहीं म्हणत नसे—

आत्या ग म्हणूनि, धरिली माझी चुणी
माझ्या भाईयाची तान्ही, राजस बाळी माझी ॥
पाठी ग पोटाचं, अंतर बहू थोडं*
प्राणापरिस वाटे गोड, राजस बाळी माझी ॥

सखाराम आणि सारजा दोघेंहि मोकळ्या मनानें बोलत बसलीं म्हणजे चार दिवस सारजा माहेरीं आल्याचें सार्थक झालें असें त्या माऊलीस वाटल्यास नवल नाहीं ! म्हणून ती कौतुकानें म्हणे :–

माझे घरीं ग पाव्हणी, कोण्या गावची राधा
तिनं पाळण्याची जागा, आटोपिली ॥

* भावाची मुलगी आणि पोटची मुलगी यांत अंतर थोडें असतें असा अर्थ.

घागऱ्या पैजणानं, दणाणली माझी आळी
आली ग लेंकुरवाळी, राजस सारजा ॥
वाटींत गुळ तूप, वाया गेलं माझं
समजाविलं बाळ तुझं, मालनबाई माझी ॥
सरीसाखळीचं, बाळ घे ग कुणवीणी
वेल्हाळी भरे पाणी, मालनबाई माझी ॥

भरल्या घरांत घागऱ्यापैंजणांची रुमझुम ऐकूं येऊं लागली. बरोबरीच्या लेकाचा संसार थाटून झाल्यावर आपलें या जगांत पूर्ण होण्यासारखें कांहींच राहिलें नाहीं असें यमुनेनें समजून घेणें अस्वाभाविक नाहीं. बाळगोपाळांचा खेळ पहाण्यांतच तिला मौज वाटे !

सुखाचा संसार संपल्यावर उरलेलें जीवन सार्थकीं लागावें म्हणून देवापाशीं धरणें धरून स्वतःच्या भक्तिभावाचा तिनें कधीं डांगोरा पिटला नाहीं; किंवा संतति, संपत्ति, समाधान जन्मभर लाभलें तरी हायहाय करून स्वतःच्या व्यक्तित्वाचा तिनें कधीं दिमाख मिरविला नाहीं. गाईसारखी गरीब सून मिळाली म्हणून तिनें स्वतःचा हक्क गाजविला नाहीं, किंवा सुनेशीं उगीच सलगीनें वागून आपला पाणउतारा होईल असें बेजबाबदार वर्तनहि ठेवलें नाहीं. नक्षत्रासारखा लेक पोटीं आला म्हणून कुणाजवळ गोडवे गात बसली नाहीं किंवा उगीच बडेजाव अंगीं आणून कुणाला अधिकउणें बोलली नाहीं. उलट, शहाणपणानें, विचारानें वागून वेळ निभावून नेली. लेकीकडे जाऊन तिच्या सुखाची वांटेकरीण झाली. सर्वांना प्रेमानें जवळ ओढलें व जीवन सारमय आहे असें त्यांच्या प्रत्ययास आणून दिलें, आणि म्हणूनच स्वतःच्या आईचा उल्लेख करितांना सारजा धन्यतेनें म्हणते—

"आई ! इतर आपले जीवलग असून देखील त्या सर्वांपेक्षां तुझी वेगळी आठवण येते याचें कारण तूं आमची आई आहेस हें तर खरेंच पण त्याशिवाय—

शंभर माझं गोत, रानीचं गवत
आली धेनू हंबरत, मायबाई ॥
शंभर माझं गोत, झाडीचा झाडपाला
जाई तुझा वास आला, मायबाई ॥"

प्रेमाच्या माणसांकरितां ती रडली, हंसली, वेळप्रसंगीं जिवास काढेवाढे लावून घेतले व आपलें व्यक्तित्व त्या प्रेमांत मिळवून दिलें. पण आश्चर्य करण्यासारखी एक गोष्ट म्हणजे ती संसारांत गुरफटून गेली नाहीं. सर्व कांहीं नाशीवंत आहे; मरणकाळीं कुणीच कुणाबरोबर येत नाहीं; तेव्हां उगीच जगाच्या मायाबंधाची गांठ गळफांस लागेपर्यंत ओढावयाची नाहीं हें तिला पूर्णपणें माहित होतें आणि म्हणूनच ती अनन्यभावानें परमेश्वराला नमस्कार करीत म्हणे—

जन येतील स्मशानीं, देह आहे चितेवरी
तुझा संग बहू दूरी, रामराया ॥

विभाग २

—:०:—

विवेचन

१ मुलींचीं गाणीं *

पावसाळा सुरूं झाला. भरपूर पाऊस पडला. जमिनीनें पाणी पिऊन घेतलें. निरनिराळ्या रंगांचीं फुलें सृष्टीच्या हर्षच्छटा दर्शवूं लागलीं. पर्वतावर हिरवें हिरवें गार झालें. इंद्रधनुष्य आकाशांत दिसूं लागलें; झाडांच्या शेंड्यांवर कोवळी तिरीप पडली.

हीं पहा पांखरें, चिवचिवत बाहेर पडलेलीं आहेत! ह्या पहा मुली, फुलें वेंचण्यासाठीं कशा धांवत आहेत. जणुं फुलपांखरेंच! स्वतःच्या आनंदांत इतरांना भागीदार करून घेतल्याविना त्यांना जणुं गमतच नाहीं. आकाशांत ढगाआडून एकेक चांदणी बाहेर यावी, त्याप्रमाणें घराघरांतून एकेक पोरगी बाहेर येते आणि मुलींच्या घोळक्यांत मिसळून जाते.

त्यांचीं वयें काय असतील? फुलांचें सौंदर्य त्यांच्या वयावर नसतें. फूल म्हटलें कीं तें जसें सुंदर, तसेंच मूल म्हटलें कीं तें निष्पाप म्हणून सुंदरच! फुलांची एकच क्रिया–ती म्हणजे फुलण्याची! या मुली देखील अशाच हंसत आहेत. दहा ते चौदा वर्षांच्या आंतल्या साऱ्या पोरी जमा झालेल्या आहेत.

त्या कशासाठीं फुलें वेंचतात? आपल्या गौरीसाठीं! गौर म्हणजे काय? त्यांची देवता! या देवतेला काय हवें असतें? सुंदर सुंदर फुलांपाकळ्यांनीं शोभिवंत केलेल्या व कलाकौशल्यानें नटविलेल्या परड्या!

* मुलींच्या गाण्यांत काव्य किती आणि इतर मौज किती असते, यासंबंधीं चर्चा.

लहान मुली आणि हौशी स्त्रिया, बांबूच्या परडीवर निरनिराळ्या फुलांच्या रांगोळ्या काढतात. कुठें मोर, कुठें चंद्र, कुठें हत्ती, कुठें पांखरूं अशीं निरनिराळीं चित्रें फुलांनीं काढून आपल्या देवतेला देतात व तिचा आशीर्वाद मिळवितात. हें करतांना त्यांना किती तरी श्रम करावे लागतात.

एका मुलीला मोर काढावयाचा होता. त्यासाठीं निळीं जांभळीं फुलें कोठून आणावयाचीं? शेतांत कांट्यांच्या कुंपणांवर सुपलीचीं रानफुलें उगवतात. ती गेली, दोनचार कांटे बोचून घेतले, चिखलानें कपडे खराब केले आणि स्वतःच्या कल्पनेला गरुडाचे पंख लावून जंगलांतला मोर तिनें परडीवर रंगविला व गौरीला अर्पण केला. मग ती कां म्हणून प्रसन्न होणार नाहीं? पांखराला आपलें घरटें बांधतांना जेवढी मेहनत व कलाकुसर खर्चावी लागते तेवढे किंवा त्यापेक्षां जास्त श्रम एका मुलीला एका परडीसाठीं करावे लागतात. फुलांकरितां मुली भांडतील, झगडतील, चोऱ्या करतील. पण हे सर्व प्रकार इतक्या तन्मयतेनें होतात कीं, त्यांना पापाचा गंधसुद्धां नसतो. त्या निष्पाप पोरींना हें काय माहीत कीं कृत्रिम कुंपणांनीं परमेश्वराच्या सर्वोपयोगी सृष्टीवर मनुष्य आपला हक्क सांगतो म्हणून? ज्या परमेश्वराच्या आज्ञेनें त्या जगांत येतात, त्याच्याच आज्ञेनें त्या फुलें वेंचावयास जातात. लोकांना त्यांत चोरी दिसली तर तो लोकांचा दोष कीं त्या लहानग्या मुलींचा?

मुलींची आणि फुलांची अशा रीतीनें गांठ घालून देणाऱ्या अशाच एका प्रसंगाला "**भराडी गौर**" म्हणतात. पावसाळ्यांत पंधरा दिवस हा भराडी गौरीचा धूमधडाका सुरूं होतो. शेवटल्या दिवशीं मुली गौर [म्हणजे त्या फुलांच्या परड्या] शिरवायला जमावानें गात गात नदीवर जातात. तीं गाणीं आणि समयस्फूर्त ओळी यांत फारसा अर्थ असतो असें नाहीं. पण त्यांत कल्पनेच्या भराऱ्या मात्र खूप असतात. शब्द-संगतीसाठीं कल्पनांची वाटेल तशी ओढाताण झाली तरी त्याची मुलींना पर्वा नसते. तान्हुल्या मुलांच्या हंसण्याला जसें कारण नसतें, तसाच या कवित्वाला अर्थ नसतो. हंसणें हा एक मनोविलास! तशींच हीं गाणीं म्हणजे 'सुसंगीत' मनोरंजन. अनेक भावांत एकता, असें

ज्याला आपण म्हणतों त्या दृष्टीनें मुलींच्या ह्या गाण्यांतही एक प्रकारची एकता असते. लहान मूल चांदण्याकडे पहात असतां त्याची बहीण म्हणते,

चांदोमामा, चांदोमामा, भागलास कां ?
चिंचेच्या [लिंबोणीच्या] झाडाखालीं लपलास कां ?
चिंचेचं [लिंबोणिचं] झाड करवंदी
मामाचा वाडा चिरेबंदी
मामाच्या वाड्यांत जाऊं या
तूप रोटी खाऊं या

ह्या गाण्यांत कांहींहि अर्थ नाहीं. त्यांत असलेला अर्थ फक्त त्या अर्भकाला समजतो व तें आनंदानें टाळ्या वाजवितें.

लहान मुलांना घांस भरवितांना म्हटलेल्या--

आळे गोळे चिमणाईचे फुटके डोळे
घांस घेऊन कोण पळे ? कोण पळे ? ...

किंवा

काऊ ये, चिऊ ये
दाणा खा, पाणी पी
वाळाच्या डोक्यावरून भुर्रऽऽऽदिशीं उडूऽऽन जा.

या गाण्यांतून शोधलाच तर तिर्यक्‌योनीशीं समभाव व सहानुभूति दिसेल. पण असेंच समजूं या कीं त्याला अर्थ नाहीं.

अर्थ नसेल तर मूल आळे गोळे म्हटल्यानंतर घांस कां गिळतें ? आणि काऊ चिऊ म्हटल्यानंतर कुणाला तरी आपल्या चिमुकल्या हातांनीं कां बोलावतें ? सर्वांत मोठा अर्थ तर त्यालाच कळतो. आपण आपली औपचारिकता टाकली व लहान मूल झालों, तर आपल्यालाहि त्यांतला अर्थ कळेल.

निरर्थक शब्दपंक्तींतून हास्य, आनंद उत्पन्न करणें हाच त्यांतला महान् अर्थ होय !

याच अर्थानें मुली गात असतात. तसलीं कांहीं गाणीं उदाहरणादाखल देत आहें.

भुलाबाई लेकी सोनीयाच्या वाकी ।
बाजू बंद टेकी जडावाच्या, जडावाच्या
भाऊ भाऊ टेकती माथापूर झळकती ।
माथापूरचें एकच पान, दुरून भुलाबाईस नमस्कार ।

\+ + +

पहिलिया पुजूं बाई, देव देव साजे
घातीलं मंडपा खेळे खेळे खंडोबा
खंडोबाच्या नारी बाई, वरसा वरसा आवसणी
आवसणीचं पाणी जसं गंगेचं पाणी
गंगेच्या पाण्यानें वेळिला भात
जेवीला कंथ राणा भुलाबाईचा,—भुलाबाईचा !

\+ + +

येवढीशी गंगा झुळुझुळु वाहे
पितळेचा तांब्या झळकत जाये
त्यांत होती नायको हिरवी टोपी बायको
हिरवी टोपी हरपली गंगेंत जाऊन बुडाली
सर्पा मागें लपली सर्पा मागें लपली
सर्प दादा एकला जाई आंबा पिकला

जाई नाहीं जुई नाहीं, चिंचेखालची राणू बाई
चिंचेखालची राणू बाई चिंचा तोडित जाय ग
पालखींतला भुलोजी शंभर पान खाय ग

खातां खातां रंगली तळिया घागर बुडाली
तळिया तळिया ठाकुरा भुलाबाई जाते माहेरा
जाते तशी जाऊं द्या तूप रोटी खाऊं द्या
जांभळ्या घोड्यावर बसूं द्या. जांभळा घोडा दिसत नाहीं
दुरून भुलाबाई दिसते–दुरून भुलाबाई दिसते !

\+ + +

काळा कोळसा जिग्‌जिग्‌वाणा
पालखींत बसला भुलोजी राणा
घाल ग माय अंजीर वाळा
घालतां घालतां लागला वेळ
घरांत रडतें तान्हें बाळ
तान्ह्या बाळाचा दिवा जळो
लेकराची हंसळी घडली जावो

\+ + +

मी जाते भुलाबाईंच्या माहेरीं
भुलाबाईंच्या माहेरी तांब्याची चूल
मखर लावलं जाईचं फूल
लग्न लावलं सूर्यापाशीं
साडी चोळी तुळशीपाशीं
तुळशी आई नमस्कार

\+ + +

हळदीच्या गोण्या बाई लुटविल्या अंगणीं
भुलाबाई बाळंतिण पहिला दिवस
कुंकवाच्या गोण्या बाई लुटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतिण दुसरा दिवस

खारकांच्या गोण्या बाई लुटविल्या अंगणीं
भुलाबाई बाळंतीण तिसरा दिवस
लवंगाच्या गोण्या बाई लुटविल्या अंगणीं
भुलाबाई बाळंतीण चवथा दिवस

याप्रमाणें वेलदोड्यांच्या, बदामांच्या, केशराच्या, सुपाऱ्यांच्या, केळ्यांच्या, अक्षतांच्या आणि पानांच्या गोण्या अकरा दिवस लुटविल्या. नंतर बाराव्या दिवशीं बारसें होतें. आतां नांव काय ठेवायचें ?

अडकींत जाऊं खिडकींत जाऊं, खिडकींत पाय घसरला,
भुलाबाईला लेक झाला, साखरशेला उसरला.
अडकींत जाऊं खिडकींत जाऊं, खिडकींत होतं ताम्हन,
भुलाबाईला लेक झाला, नांव ठेवा वामन.

अशा रीतीनें खिडकींत झोंपाळा, साबू वगैरे असतात व अनुक्रमानें मुलाचें नांव गोपाळा, बाबू वगैरे ठेवण्यांत येतें. पुष्कळांच्या प्रेमाचा विषय झालेल्या मुलाला अनेक नांवें असतात हें आपल्याला माहीतच आहे.

\+ + +

आमचं आमचं बऱ्हाणपूर उंच उंच दिसे
चावडीचा चांदोबा वाटोळा दिसे
भाग्याची भुलाबाई पाटावर बसे

पाटावर येऊन बसून जाऊं
तूप रोटी खाऊन जाऊं
घाल ग माय तुपाची धार
धार गेली वाऱ्यानें
बाबा आला घोड्यानें
बाई आली जोड्यानें

\+ + +

आम्ही पोरी गोमट्या
सर्व जाऊं पाण्याला
वाटेंत भेटला वाणीदादा,
वाणीदादा, शोभा दे
शोभा देऊं नदीला
नदी नदी, पाणी दे
पाणी देऊं शेताला
शेता शेता, चारा दे
चारा देऊं गाईला
गाई गाई दूध दे
दूध देऊं बगळ्याला
बगळ्या बगळ्या, पंख दे
पंख देऊं राजाला
राजा राजा, घोडा दे
घोडा देऊं बापाला
बापा बापा, साड्या दे
साड्या देऊं बहिणीला
बहिणी बहिणी, भातकूल दे
भातकूल देऊं भावाला
भावा भावा गोंडे दे
[घाईनें] तेच गोंडे लेवूं
सासरीं जाऊं
सासरच्या वाटे
कुचुकुचु काटे
हळदकुंकू दाटे

दा. क्र. .....

नारळ फुटे
माहेरच्या वाटे
आनंद दाटे.

याप्रमाणें ज्याच्या त्याच्या आवडीची वस्तु, ज्याला त्याला देऊन आपणही आपल्या आवडीची वस्तु मिळविण्याची मुलींची वरील प्रकारची देवघेव मोठी हृद्य आहे. मी लहान होतों. खेड्यांत रहात असें. बागेंत गेलों. जास्वंदीचीं फुलें फुललीं होतीं. मला तीं आवडलीं. मी एक फूल तोडलें व घरीं आलों. फूल आईला दिलें. आईनें विचारलें "तूं जास्वंदीला काय दिलेंस?" मी म्हणालों "कांहीं नाहीं." यावर आई म्हणाली, "माळी पाणी घालतो–तो फुलें घेतो. तूं ऐतखाऊ आहेस. जा, जास्वंदीला नमस्कार तरी करून ये." गेलों, नमस्कार केला. तेव्हांपासून कोणाजवळून फुकट कांहींही घ्यायचें नाहीं हें उगीचच मनांत ठसून गेलें. याच संस्कृतींत वाढलेल्या माझ्या बहिणी वरीलप्रमाणें देवघेव करणार नाहींत तर काय करतील?

उदाहरणादाखल घेतलेलीं मुलींचीं गाणीं संपलीं. प्रकरण संपविण्यापूर्वी आणखी एक प्रसंग आठवला तो सांगतों.

नागपूरला महालच्या रस्त्यानें माझ्या एका मित्राबरोबर मी घाललों होतों. माझ्या डोक्यावर खादीची टोपी होती व मित्रानें काळी टोपी घातली होती. मुलींचा एक तांडाही गौर शिरविण्यासाठीं शुक्रवार तलावाकडे चालला होता. माझ्या मित्राकडे पाहून एक चिचुंद्री पोर म्हणाली—

ज्याच्या डोक्यावर काळी टोपी
त्याची बायको ××× मोठी

बरें झालें, माझ्या मित्राचें लग्न झालें नव्हतें. एरवीं त्याला बिचाऱ्याला लांब दाढीच्या काजीसारखें एखादें दिव्य करावें लागलें असतें!

ग्राम्यतेचा दोष पत्करूनही वरील गोष्ट संगीत रीतीनें देत आहें. उद्देश एवढाच कीं, सत्यकथन व्हावें. हीं गाणीं टला ट जुळविलेलीं असतात, कीं

त्याला कांहीं अर्थ असतो हें मला आज सांगतां येणार नाहीं. याकरितां अनेक कारणें आहेत. एकतर माझ्यापुढें मुलींचीं सर्व गाणीं आलेलीं नाहींत कीं जीं विचारांत घेऊन मी ठोक सिद्धांत आपणांपुढें मांडावे. दुसरें, मी मोठा झालों. त्यामुळें मुली मला खेळांत 'भटजी' म्हणून आतां बोलावीत नाहींत. माझ्या वयाच्या तरुणी आपला प्रवेश त्यामध्यें कसातरी करून घेतात. मला कांहीं तरी कसब शोधून काढावें लागेल. त्याविना मूळच्या त्या सुगंधी जगांत मला प्रवेश मिळणें शक्य नाहीं.

मग आतांपर्यंत मी स्वस्थ कां बसलों? कारण ज्यावेळीं मी मिसळूं शकत होतों, त्यावेळीं मला माझें मुलांचें विटीदांडूचें जग होतें. आतां या चारच वर्षांत मला हीं गाणीं दूर गेल्यामुळें जवळचीं वाटूं लागलीं. मागच्या पावसाळ्यांत मीं प्रयत्न करून पाहिला व मुलींत मिसळावयास गेलों. आठ दहा मुली फुलें गुंफीत गाणीं म्हणत बसल्या होत्या. माझी चाहूल लागतांच आमच्या उषेनें फणकाऱ्यानें माझ्याकडे पाहिलें व म्हणाली "इश्श !

पोरींत पोरगा लांबोडा
भाजून खातो कोंबडा"

आणि यावर सर्व जणी हंसल्या ! माझ्यासारख्या अहिंसावादी माणसाला केवढी जबर ही शिवी !

२ लोकगीत–चर्चा

[(अ) **निर्मिती;** (ब) **स्वरूप**]

(अ) **निर्मिती—**

काव्य म्हटलें कीं त्याचे अंतःस्वरूपांत इथून तिथून सारखेपणा आढळून येतो. परिस्थितिभेदामुळें दृश्य प्रसंगाचा अर्थ मनाला भिन्नभिन्न स्वरूपानें आकलन होईल; पण काव्यनिर्मितीस जी भूमिका लागते ती सारखीच–हृदय भरून आलें कीं झालें! पण शब्दाचा वापर व्यासंगानुसार सौंदर्यदृष्टी पुढें ठेवून भावनेच्या भरारीची साद घेत केला जातो. काव्याचें बाह्य स्वरूप निराळें भासतें तें यामुळेंच !

लोकगीतांसंबंधी विचार करितांना हीच गोष्ट स्पष्ट रीतीनें आपल्या प्रत्ययास येते. त्यांच्या निर्मितीसंबंधीं जीं विधानें अनुमानानें बांधतां येतात तीं सर्वस्वीं बरोबरच असें धरून चालतां येत नाहीं. हातानें काम करीत असतांना मनानें कांहींतरी आरंभावयाचें आणि लोकगीतें निर्माण व्हावयाचीं ही उपपत्ती मला सर्वस्वीं ग्राह्य वाटत नाहीं. देवादिकांचीं कथानकें फारतर अशा वेळीं निर्माण होतील; कारण "अजित नाम वदो भलत्या मिषें" ची परंपरा वर्षानुवर्षें चालत आलेली आहे.

रामाच्या नावानं कोण वाया गेलें
पाषाण तारिले—समुद्रांत—॥

अशासारखीं लोकगीतें धावतां पळतां सुचतीलहि, नाहीं असें नाहीं. पण इतरांची वाट काय? निर्मितीकरितां अवसराची आवश्यकता असते. भावनेच्या

ग्रंथालय

भरारीसरसें काव्य निर्माण होतें, पण त्याकरितां अनुकूल परिस्थितीची जरूरी असावी लागतेच ना ? आदिकवीला जें वाटलें तें काव्याच्या द्वारें एकदम प्रकट झालें; पण त्या प्रकटीकरणास भोंवतालच्या परिस्थितीनें कांहींच मदत केली नाहीं का ? त्यावेळीं मन ओढून घेण्यासारखी दुसरी घटना अस्तित्वांत नव्हती; सारें वातावरण प्रशांत, गंभीर आणि पोषक असें होतें !

शिवाय लोकगीतें ही स्त्रियांची बाब ! आणि तीहि आपल्या दृष्टीनें अशिक्षित स्त्रियांची, ज्यांच्या मनाला पद्धतशीर वळण नाहीं त्यांची ! भावना लिहून ठेवणें शक्य नाहीं. मग ती वारंवार मनांत घोळवून तोंडीं बसवावयासही अवसर लागत नसेल का ? वरील गोष्टींचा लोकगीतांच्या बाबतींत विचार केल्यावर त्यासंबंधीं केलेलीं कांहीं अनुमानें चुकीचीं असावीं असें मला वाटतें. चार बायका एकादें काम करावयास जमतात आणि मन रमावें म्हणून कांहीं तरी म्हणत असतात हें मला शक्य वाटत नाहीं. एकदां निर्माण झाल्यावर सहज शीळ घालावी त्याप्रमाणें तें म्हणणें निराळें आणि निर्मिती निराळी. यशवंतांचें "न्याहारीचें गाणें" स्नान करतेवेळीं, अंगाला साबू लावतांना आपण म्हणतोंच कीं ? तसेंच त्या देखील कांहीं म्हणत असतील.

उलट, मी ज्या परिस्थितीचें लोकगीत-निर्मितीच्या दृष्टीनें परीक्षण केलें त्यांत मला असें आढळून आलें कीं, अशावेळीं बायका गाणीं म्हणत नसतात. एके ठिकाणीं जमल्यावर तर आणखी त्यांच्या गोष्टीला पूर येतो. बरोबर काम करणाऱ्या मजुरांशीं थट्टा मस्करी; एकाद्या तरण्याताठ्या पोरीची पाचकळ कुचाळकी, रोजच्या संसारांतील रोजच्या गोष्टी, रस्त्याच्या वाटसरूला उद्देशून कांहींतरी उपहासानें म्हटलेलें एकादें वाक्य आणि साऱ्याजणींचा हंशा यांतच त्यांचा वेळ निघून जातो. अशा वेळीं चांगलीं लोकगीतें निर्माण व्हावीं कशीं ? काव्याच्या उत्पत्तीला शरीरांतील देव जागा व्हावा लागतो.

पण इथें एक सुचवून देणें इष्ट ठरेल. वेळ घालविण्याच्या ह्या तऱ्हा शाळेंतील अभ्यासक्रमाप्रमाणें ठरलेल्या नसतात. कधींकधीं दुसऱ्या जिव्हाळ्याच्या

गोष्टींतही वेळ जातो. अमुक बाई सासरीं कशी नांदते ?—नवरा तिला कसा वागवितो ?—पाटलाच्या घरीं काय घडतें ? वगैरेपासून सुरुवात होतहोत त्या गोष्टींचा शेवट—"हो बाई, ऋणानुबंधाच्या गोष्टी" या वाक्यांत होतो. लोकगीतांतहि याच भावनांचे तरंग उठत असतात !

लोकगीतें निर्माण व्हावयास ज्या जागा अवश्य असतात असें आढळून येतें त्या म्हणजे बागेंतील मोट असलेली विहीर, अंगणांतील झाडाला बांधलेला झोपाळा, पहाटेच्या शांत वातावरणांत संगीताशीं साद देत घरघरणारें जातें, शेताच्या शेजारून खळखळ करीत वहाणारा इवलासा झरा किंवा फळाफुलांच्या रांगेंतून सळसळणारा आणि झाडांना जीवन पुरवीत वाकडा तिकडा जाणारा बागेंतील पाट—ह्या होत !

१—शुक्राची चांदणी उगविल्यावर एकादी सारजी टोपल्याखालून कोंबडा बाहेर काढते आणि दिव्याची ज्योत वाऱ्याआड करून जात्यावर बसते. तिचा हात फिरत असतो, भावनाहि गरगरत असतात. सारें मन एक होतें आणि कुणी बोलावयास नसल्यामुळें त्यानेंच सांगितलेल्या गोष्टींची उजळणी करून मन रिझवावें लागतें. तिचे कान त्यावेळीं बधिर होतात; डोळे मिटलेले असतात आणि जिवाचे भाव एकवटून बोलूं लागतात.

कामाच्या धसक्यानें जीवाच्या उर्वीत दबलेली चिमणी कुणाचे तरी हात युक्तीनें सोडवून घेऊन जात्यावर बसते, पण मन तिथेंच असतें–त्याला तेंच हवें असतें आणि तें उगीचच म्हणत असतें—

आपुल्या आयुष्याची करीन पलंगडी
सख्या बैस पलघडी—

लोकगीतांच्या निर्मितीचें हें सिंहासन मयूरपिच्छांनीं जरी सुशोभित केलेलें नसलें तरी निष्पाप, प्रामाणिक, शुद्ध जीवनरसानें तें धुतलेलें असतें; त्यावर जीवाची चादर अंथरलेली असते; तिथें "सखीचे" "वाटोळे" हात किणकिणत असतात !

२—आकाश चांदीनें भरगच्च भरलेलें असतें; झाडें-झुडुपें निजून जातात; खळ्यांतील गव्हाणींत उघड्यावर बांधलेली कपिला स्वतःच्या वासराकडे पहात संथ रवंथ करीत असते; बाजूस असलेल्या आंब्याच्या डांगेवरून पिंगळा चिलबिलत असतो; आणि अशा वेळीं घरून आणलेली पथारी खळ्यावर टाकून एकादा पांडू आपली लाल जोडी विहिरीवर नेतो. भोंवतालच्या निजलेल्या रानवटींत त्याचीच मोट किरकिरत असते. ओलवून ओलवून हिरव्या पडलेल्या नागवेलीवरून आलेली वाऱ्याची मंद झुळूक अंगास लागते आणि दोर दाबून मोट भरल्यावर पांडू सुरू करतो—

मोऽटीऽच्या बैऽलाऽऽ—॥

त्याचें मन त्याच्याशीं बोलूं लागतें—"पाण्डू, आज केळबनांत खुरपण करावयास आलेली ती हिरव्या लुगड्याची पोरगी आठवते का तुला? आणि ती दुसरी—बरं, तुझी घरधनीण काय करीत असेल रे? परवां ती तुझ्याबरोबर इथें आली होती आणि गोंद्या रडेल म्हणून परत गेली–आठवतें ना? कसा नशीबवान आहेस तूं?"—पुनः त्याची मोट भरते व त्याचें गाणें सुरू होतें—

मोऽटीऽच्या बैऽलाऽऽ—॥

—इतक्यांत त्याची नजर केतकीकडे जाते. पुनः मन म्हणतें—"परवां पाटलाची यशोदी आली होती. तिची आंगठी इथेंच पडली होती. तिला परत दिल्यावर किती तोंड भरून हंसली ती! गोंद्याला खीरपोळी घातलीन् तिनं! तुझी पोरगी यशोदीसारखीच सुंदर आहे का? आतां ती निजली असेल! तुझी—!" पुनः त्याची मोट भरते आणि तो म्हणतो—

—मोऽटीऽच्या बैऽलाऽऽ—

या ओबडधोबड पालुपदानें सुरू होणाऱ्या पांडूच्या कविता जरा शिथिल आणि क्वचित् प्रसंगीं मर्यादेचें अतिक्रमण करणाऱ्या व ओबडधोबडहि असतात—! पण ज्वारीच्या शेतांतून चालतांना पानोळ्या सळसळतात–अंगाला घासतात देखील–तरी त्यांतच एकप्रकारचा आनंद वाटतो ना आपल्याला?

—३. —भाजीच्या आळ्यांत सावकाशीनें पाणी सोडीत उभी असलेली एकादी मैना दांड भरेपर्यंत फुलझाडांकडे पहात असते. दुपारचा वारा भण-भणत असतो आणि त्यांतच भोंवरीचा घुर्रर्र आवाज मिसळून जातो. तिला आठवते—"आज सकाळीं घोड्यावर गेला तो? त्याचे डोळे किती सुंदर होते! किती ऐटींत बसला होता तो! पण मैने हें काय? हें पाप आहे. चांगल्या घरांतून आलेली पोरगी तूं–कशाला कुरकुरतेस? तुझा घरधनी इतका त्रास देतो का तुला? नाहीं ना? परवा केळीच्या बागेंत किती आवडीनें त्यानें एक फणी तुला तोडून दिली होती; आज तो निघून गेला म्हणून त्याची आठवण थोडीच नाहींशी होणार आहे?" तिचा जीव उडतो. तिचे ओंठ हालतात. ती हळूच म्हणते :—

माळीणीचा माळी, माळी गेला पुण्या—
केळीला आल्या फण्या—॥

पुनः तिचे ओंठ मिटतात. ती विचार करते–"जाऊं दे, देवानं भोगूं दिलं नाहीं तें दैवांत नव्हतं म्हणून! असा प्रसंग कुणावरहि न येवो. ह्या गोष्टी माहेरी कशा सांगायच्या? शेजारच्या बायका उगीच हळहळतात. परवां दादा आला होता. मी जीव तोडून त्यांना–सर्वांना सांगितलें—

माझं सुखदुःख नका सांगूं बाजारी
जाऊं देजा घरवरी—भाऊ माझा—॥

पण मलाच काय झालं होतं कळत नाहीं—

माझं सुखदुःख सांगूं गेली भोळेपणं
उदक संभाळेना–डोळीयाचं ॥"

तिच्या डोळ्यांतून एकदोन थेंब पटकन् टपकतात. बेबंद कल्पनाशक्ति तिच्यासमोर आणखी एक चित्र उभें करिते. ती म्हणते—

माळ्याचे वाडीमध्यें, माळीण दांडापाशीं
सखा केळीपाशीं, कंबळ मोडे ॥

ती दुःखाचा एक सुस्कारा टाकते. तिचें पालुपद सुरू होतें :—

"नको तोडूं माऽलणी गेंदऽ गुलाबाऽऽचा—" ॥

कोकिळेचा स्वर ऐकावयाचा झाल्यास आंबराईंत झाडांखालून पाचोळा पायाखालीं घालीत हिंडावें लागतें. कुठेंतरी दाटोळ्यांत ती बसलेली असते. सारजी किंवा मैना यांचे स्थायीभाव चारचौघींत उचंबळत नाहींत. ते जात्यावर पिंगा घालतात किंवा पाटाच्या पाण्यावर हेलावतात. जो प्रकार केळबनांत किंवा मोटेवर तोच प्रकार झरी झोपळ्यावर—!

\+ + +

चार बाया एका ठिकाणीं जमल्यावर निर्माण होणारीं लोकगीतेंहि आहेत. नाहीं असें नाहीं.

शेजी आली गाऱ्हाण्याशी, तिला बैसाबया पाट
अन्याव केला कोठें, बाळ राजानें ॥

अशासारख्या "शेजी आली गाऱ्हाण्याशी" ला धरून किंवा अशाच शब्दाशब्दाला धरून केलेल्या ओव्या देखील यांत बऱ्याच आहेत. ह्यावरून एक गोष्ट ध्यानीं येण्यासारखी आहे, कीं ह्या ओव्या करणाऱ्या अनेक स्त्रिया असाव्यात. एकीनें एक ओवी म्हटल्यास दुसरीनें लागलीच दुसरी ओवी म्हणून दाखवायची. असा प्रकार सहज चारचौघी एके ठिकाणीं जमल्यावर होत असावा. परंतु अशा लोकगीतांचें स्वरूप तितकेंसें सुंदर नसतें. कारण एकदां तयार झालेल्या गाण्यावरच त्यांची उभारणी असते. त्यामुळें संख्येंत भर घालण्यापलिकडे त्यांची फारशी महती नसते. अस्तु !

(ब) **स्वरूप**

लोकगीतांच्या स्वरूपाबद्दल सांगावयाचें झाल्यास नैसर्गिकपणा हें त्यांचें प्रमुख लक्षण सांगतां येईल. यासंबंधीं मी 'सारजा' या माझ्या परिचय-लेखांत ओझरतें दिग्दर्शन केलेंच आहे. तेव्हां आतां त्याबद्दल जास्त सांगण्यासारखें कांहीं राहिलें असें मला वाटत नाहीं. लोकगीतांकडे पहातांना

निवळ काव्यदृष्टीच पुढें ठेविली तर मग इतर बाबींकडे लक्ष देणें म्हणजे देवळांत जाऊन खांब आणि भिंतीच पहाणें होय. पण देवळाविषयीं बोलतांना जशा ह्या गोष्टीहि आपण वगळीत नाहीं तसेंच लोकगीतांवरून निघणारीं स्थूल अनुमानें विचारांत घेणें अयोग्य नाहीं.

खेड्यांतील लोकवस्ती दोन प्रकारची असते—(१) सुखवस्तु कास्तकार वर्ग याला आपण उच्च वर्ग म्हणूं (२) आणि गरीब किंवा कामकरी वर्ग. याला कनिष्टवर्ग म्हणूं या.

(१) पहिल्या वर्गाकडून निर्माण होणारीं लोकगीतें प्रथम विचारांत घेऊं. ह्या वर्गांतील स्त्रियांना पुष्कळ वेळ असतो. शिवाय क्वचित् कथापुराण-कीर्तन वगैरेंच्या द्वारें त्यांना रामायण-महाभारतांची तोंडओळख होते. घरचें वातावरण सात्विक असल्यामुळें देवाभावाचीं गाणीं त्यांना सहज सुचतात.

संध्याकाळीं पाटलीण किंवा तिच्या मुली झोपाळ्यावर भराभर झोंके घेत असतात. त्यांच्या मांडीवर चिमुकले जीव इवले इवले डोळे किलकिलत मुठी चोखत आकाशाकडे पहात असतात. स्वतःचें मनोरंजन व्हावें आणि मुलांनाहि झोंप यावी या दुहेरी उद्देशानें त्या गाणीं म्हणतात. त्यांच्या संगीतप्रिय स्वभावाची यावेळीं नीट कल्पना येते.

शिवाय त्यांची परिस्थिती धकाधकीची नसल्यामुळें आयुष्यांतील कटु अनुभवांची त्यांना जाणीव नसते. त्यांचीं गाणीं घरगुतीच असतात. मुलाला उद्देशून आईनें गाइलेलीं गाणीं, बहिण-भावांचीं गाणीं, बहिणीबहिणींचीं गाणीं वगैरे सर्व या गोष्टींची उत्तम साक्ष देतात. अगदीं साध्यासुध्या गोष्टींची अभिनव रीतीनें आणि सोज्वळ कल्पनांनीं फुलवण करणें हेंच त्यांच्या लोकगीतांचें स्वरूप !

अशा प्रकारच्या लोकगीतांवरून त्यावेळच्या चालीरीति कशा होत्या; कोणत्या जीवनक्रमांत राहणें त्यावेळीं आवडत होतें; समाजांतील इतर पुरुषांची स्त्रियांशीं आणि स्त्रियांची पुरुषांशीं कशी वागणूक होती; या गोष्टींवर

चांगला प्रकाश पडतो. व हीच गोष्ट स्पष्ट व्हावी म्हणून मी कथानकें निवडून लोकगीतांचा परिचय करून दिला. तेव्हां आतां त्याबद्दल विशेष असें काय सांगावयाचें ?

पुष्कळदां असेंहि होतें कीं जो जीवनक्रम आपल्या वाट्यास आला त्यापेक्षां सुखाचा, सुंदर असा जीवनक्रम अतृप्त जीव कल्पनेनें रंगवीत असतो, आणि तें चित्र रंगविण्यांतच त्याला एक प्रकारचा आनंद वाटतो. एकाद्या बाईला मुलगा असला म्हणजे ती कांहीं तरी म्हणेल आणि त्याचें कोडकौतुक करण्यांत तिचा भावविकास होईल हें खरें; पण मूल नसलेल्या स्त्रीला स्वतःची भूक कल्पनेवर शमवावी लागल्यामुळें आणि कल्पना ही आकाशासारखी उंच आणि रत्नखचित असल्यामुळें त्या स्त्रीनें गाइलेलीं गाणीं सरस असतील यांत संशय नाहीं. आणि म्हणून—

अंगणीं खेळते, बोबडं बोलते
आजा तुझा लाडविते—राजस बाळा ॥
शेजारणी बाई, राख आपुला मोगरा
अन्यायी माझा हिरा—राजस बाळ ॥
शेजारणी बाई, अंगण झाडूं लाग
तुझी मैना माझा राघो, खेळतील दोघं ॥

अशा गाण्याचें कर्तृत्व गर्भवती स्त्री किंवा निपुत्रिका यांना देणें जास्त चांगलें, असें मला वाटतें. निपुत्रिकेला दुसऱ्याचे मुलाबद्दल हेवा वाटेल, ही आजची विचारसरणी झाली. उलट मी अशा कित्येक स्त्रिया पाहिल्या आहेत कीं, त्यांनीं दुसऱ्याच्या मुलांवर प्रेम करून आपली तहान भागविली आहे. त्यांना दुसऱ्यांच्या सुखाबद्दल हेवा वाटत नाहीं. त्या स्वतःच्याच दैवाला बोल देतात. अशा सात्त्विक मनोवृत्तीच्या स्त्रिया थोड्या असतात म्हणून बिघडलें कुठें ? त्यांचें अंतःकरण ओलें असतें, आणि त्यांच्या हृदयांत काव्य असतें. शिवाय जिला दुसऱ्याबद्दल हेवा वाटतो त्या स्त्रीच्या अंतःकरणांतील धगीनेंच

प्रतिभा जळून जाते तें वेगळें ! पांढरपेशावर्गांतील लोकगीतांच्या निर्मितीसच हें साधारणतः लागू असल्यानें निर्मितीसंबंधीं साकल्यानें विवेचन करितांना मी हा मुद्दा गाळला होता.

(२) आतां दुसऱ्या म्हणजे श्रमजीवि वर्गाकडून जीं लोकगीतें निर्माण होतात तीं विविध प्रकारचीं असतात. दुर्दैवानें मला ह्या वर्गांतील लोकगीतें हवीं तेवढीं मिळालीं नाहींत. जेवढीं मला मिळालीं त्यांवरूनच लिहिणें चांगलें. हीं लोकगीतें सुंदर आणि हृदयस्पर्शी असतात. त्यांत नाविन्य असतें. तीं ठराविक चाकोरींतील नसतात. आणि याला कारणहि आहे. जीवनाच्या धकाधकींत रात्रंदिवस शिंपले पोटाशीं धरून कडेकपारींतून खळबळावें लागल्यामुळें त्यांच्या जीवनांत विविधता आलेली असते. सारे प्रसंग त्यांच्या डोळ्यांसमोरून जातात. कित्येक अंगाशीं घांसूनहि जातात. बऱ्यावाईट आठवणी जीवाच्या शेजारीं घुटमळत असतात; आणि मग शांत निवांत वेळीं त्या जाग्या होतात.

तोंडामध्यें तोंड, घाले पांखरावाणी
रागाचं केलं पाणी—जीवन प्राणसई ॥

वगैरे सारखीं कितीतरी सुंदर गाणीं या स्त्रियांच्या संग्रहीं असतील. श्री. बेंडे यांच्या लेखांत[1] अशा प्रकारच्या एकदोन ओव्या आहेत. त्या इथें उतरून घेतल्यास हरकत नाहीं.

वाटच्या वाटसरा, वाटनं जाय उगा
पाडाला आला आंबा—नाहीं तुझ्या हाताजोगा ॥
वाटच्या वाटसरा, केतकीला भुलूं नको
बुडीचा भुजंग, त्याच्या दिठी [2]पडूं नको ॥
देशीच्या देशमुखा, कांरे उभा तुझा घोडा ?
कंथ माझा जंगलांत, वाघिणीच्या मोजी दाढा ॥

१ "सईच्या ओव्या" हा लेख "प्रतिभा" २४ एप्रिल १९३३ अंक ९ वा. २ दृष्टीला.

परंतु नुसत्या तोंडओळखीवरून एकाद्याशीं मोकळेपणानें बोलणें बरें नव्हे आणि हाच विचार करून आटोपतें घेतों.

पांढरपेशा वर्गांतील आणि कामकरी स्त्रिया यांच्या ओव्यांचें स्वरूप कांहीं कांहीं ठिकाणीं चटकन् ध्यानांत येतें. एकाच वस्तूबद्दल दोन स्त्रियांना कोणत्या कल्पना सुचतात हें खालील उदाहरणावरून दिसेल. वस्तु एकच—सुंदर डोळे ! पण त्याबद्दल कल्पना मात्र निराळ्या :—

मोठे मोठे डोळे, भिवंया चंद्रज्योती
साजीरा म्हणूं किती—॥
मोठे मोठे डोळे, हरिणीच्या पाडसाचे
तैसे माझ्या राजसाचे—॥

हें एका उच्चवर्णीय स्त्रीचें स्पष्टीकरण ! तिला सुंदर वस्तू पाहून चंद्रज्योतीची आठवण होते. कामकरी स्त्रीला मात्र चंद्राच्या मनोहर कला पहात राहाण्यापेक्षां त्याच्या प्रकाशांत नवऱ्याची भाकर शेतांत पोंचविणेंच परवडतें. तिच्या डोळ्यांसमोर एकदम चंद्रकोर उभी रहात नाहीं. तसेंच हरिणीचे डोळे ! गव्हाच्या शेतांत हरिणांचा कळप आला तर शेताची नासाडी होऊं नये म्हणून शेतकरीदादा त्याला हांकून देतो. त्यांपैकीं एकादें पाडस हातीं लागलें तर तें पाटलाच्या घरीं नेऊन देतो. त्यामुळें एकाद्या पाटलीणबाईनें आपल्या मुलाचे डोळे पोसणीच्या हरिणासारखे आहेत असें म्हणणें जास्त संभवतें. शेतकऱ्याची बायको कशाला हरिणाच्या डोळ्यांची पर्वा करिते ? ती चटकन् म्हणते—

मोठे मोठे डोळे, आंबियाच्या फोडी
चालतां डोळे मोडी—॥

आंब्यांच्या फोडींसारखे मोठे टपोर आणि सतेज डोळे सुंदर असतात तसेच चंद्रकोरी भुवयांच्या कमानीखालीं हरिणाच्या पाडसासारखे डोळेहि लोभस वाटतात. पण त्यांचें प्रकटीकरण भिन्न व्यक्तींकडून झाल्यामुळें त्यांत

भिन्नता आली आहे. रुचिवैचित्र्याचा हा प्रश्न आहे असें मला वाटत नाहीं. सहज डोळ्यांसमोर दिसणाऱ्या वस्तूच साम्य दाखविण्याकरितां उपयोजिल्या जातात.

मला पुण्या-मुंबईकडील किंवा कोंकण वगैरे प्रांतांतील लोकगीतें वाचावयास मिळालीं नाहींत. मी जमविलेलीं लोकगीतें त्यांच्या स्वरूपावरून बरींच जुनीं आणि अस्सल वऱ्हाडी वाटतात. कांहीं उदाहरणें दिल्यास हें जास्त स्पष्ट होईल.

शाल पांघरली, दारवंठा उभी राहे
कोण्या पंडिताची माय—मायबाई ॥

ह्या ओवींतील "दारवंठा" हा शब्द उंबरा या अर्थी असून तो ज्ञानेश्वरींतील आहे आणि तो नागपूर-वऱ्हाडांत प्रचारांत आहे. दुसरें "मायबाई" हा शब्द इतर ठिकाणीं फारसा रूढ नाहीं. आईला इतर ठिकाणीं "आई" म्हणून हांक मारितात पण ह्या भागांत 'माय' हा शब्द बऱ्याच ठिकाणीं प्रचारांत आहे.

भ्रतार आळवे, "काहून" कोमेजली
याद माहेरची आली—मालनबाई—॥

यांतील "काहून" (कां म्हणून) हा शब्द व—

दारवंठा उभी राहे; चिऱ्यापाल्याची नागीण
कंथ म्हणे भाग्यवान—गोरेबाई—॥
जन्म घेतला पोटी, कशी म्हणूं मी वंगळ
तूं कां केळी मी कंबळ—मायबाई—॥
मायेचा एकला, बहिणीचा लहू
किती खालीवर पाहूं-जीवनप्राणसख्या ॥

या ओव्यांतील "कंथ" ("कान्त" या शब्दापासून), "कंबळ" (केळफूल), "लहू" ("लहासू" पासून. पण याची नीटशी उत्पत्ती

मला माहित नाहीं. नेत्राची बाहुली या अर्थी हा शब्द वापरतात) ह्या उदाहरणादाखल घेतलेल्या शब्दांवरून त्या ओव्यांचें वऱ्हाडी वळण सिद्ध होतें.

दिवाळी दसरा, आला कार्तिक महिना
कंथ धाडीजो पाहुणा-गोरेबाई ॥
दहाचा पालनवाला, बैसला हत्त्यावरी
धनरेषा माथ्यावरी-मायबाई माझे ॥

यांतील "धाडीजो" (पाठव) हा प्रयोग इतर ठिकाणीं प्रचारांत नाहीं. करजो (कर); देजो (दे) वगैरे वाक्प्रयोग इथेंच वापरण्यांत येतात. तसेंच "हत्त्यावरी" या प्रयोगाबद्दल आपण "हत्तीवर" असें म्हणतों. यावरून हा मुद्दा आणखी स्पष्ट होईल.

पण येथें एक गोष्ट प्रामुख्यानें सुचवून द्यावीशी वाटते. प्रस्तुत लेखांतील विधानें करितांना माझें मन बरेंच साशंक आहे. इतरांकडून योग्य तें शंकानिरसन होईल अशी आशा आहे.

किती साधीं आणि सुटसुटीत असतात हीं गाणीं ?

पण या साधेपणामुळें भावनाविष्करणांत किंवा काव्यगुणांत वैगुण्य येतें असें मुळींच नाहीं.

लोकाच्या लेकराला, नाहीं निवलं माझं मन
तुझ्यापाशीं पंचप्राण—राजस बाळा ॥

या दोन ओळींत जो करुणरम्य भाव उठविला आहे तो खात्रीनें कवी यशवंतांच्या—"मज विफल गमे ग जीवित माझें सखे—" या कवितेपेक्षां सरस आहे हें कुणीहि नाकबूल करणार नाहीं.

स्त्रियांची ही कामगिरी खरोखर विस्मयकारक आणि भूषणावह आहे. पुरुषांपेक्षां स्त्रिया या बाबतींत खात्रीनें कमी नाहींत हें अगदीं स्पष्ट दिसून येतें.

त्यांनीं "काव्यादर्श" वाचला नसेल, "साहित्य-दर्पण" चाळलें नसेल, पण त्यामुळें त्यांच्या प्रतिभेच्या विलोभनीय स्वरूपास बाध आला नाहीं. शकुंतलेला फुलांचाच शृंगार शोभत होता !

***धरतरीची गादी, पाषाणाची उशी**
तुला झोंप आली कशी, मायबाई सीते ॥
मेरूची समयी, चंद्राची काडवात
सिताबाई अरण्यांत—वाळंतीण ॥

अशा प्रकारच्या सुंदर फुलांनीं व अलंकारांनीं स्त्रियादेखील आपल्या प्रतिभेचें प्रसाधन करूं शकतात. नाहीं असें नाहीं.

लोकगीतांचा संग्रह होणें जरूर आहे. नाहींतर स्त्रियांनीं बजाविलेली ही बहुमोल कामगिरी बदलत्या परिस्थितींत अशीच एकदम नाहींशी होऊन जाईल; आणि काव्याच्या एका सुंदर विभागास मराठी वाचक कायमचे मुकतील.

हिंदीमध्यें श्री. रामनरेश त्रिपाठी यांनीं ग्रामगीतांचा संग्रह करून एक मोठी स्तुत्य कामगिरी बजाविली आहे. त्यावरून लोकगीतांच्या सौंदर्याची चांगली कल्पना येते. उदाहरणच घ्यावयाचें म्हणजे त्यांतील हरिणीवरून रचलेलें गाणें इतकें सुंदर आहे कीं तशा प्रकारचा करुणरम्य भावनाविलास आधुनिक कवितेंतही क्वचितच दिसतो.

* धरित्री.

३. लोकगीत

१. साहित्याची गंगोत्री—

लोकगीतें हीं साहित्याच्या मूळधनांत मोडतात. लोककथांमधून ज्याप्रमाणें इतिहास, पुराणें, नवलकथा इत्यादि अभिजात साहित्य निर्माण होतें तद्वत् लोकगीतांमधून देखील खंडकाव्य, महाकाव्य, वीणाकाव्य, चारणकाव्य, नाटक आणि चंपू इत्यादि रसात्मक कृतींना रस मिळतो. चारणकाव्यें वीरांसाठीं निर्माण होतात. महाकाव्यें पंडितांसाठीं असतात. परंतु हीं लोकगाणीं मात्र भोळ्याभाबड्या जनतेसाठीं, त्यांच्याच रंजनासाठीं उत्पन्न झालेलीं असतात. लोकगीतांचें माधुर्य वनलतेच्या शोभेप्रमाणें असतें; जणुं कांहीं हविष्य अन्नांतील साधेपणा व अकृत्रिम गोडीच ! त्यांत कृत्रिमता, रचनाचमत्कृति कुठली आढळणार ?

लोकगीतांत समाजाची बाल्यावस्था दिसते. ही बाल्यावस्था कालगणनेच्या दृष्टीनें नव्हे तर समाजाच्या मनोभूमिकेच्या दृष्टीनें ! बाळपणांतील भोळेपणा आणि खेळकरपणाही लोकगीतांत आढळून येतो. मनुष्य एकदां मोठा झाला कीं त्याला कृत्रिम उपाधि लागल्याच ! समाजाची अजमावणी बिनचूक करावयाची असेल तर ती लोकगीतांमधूनच स्पष्ट दिसेल. लोककथा देखील हें काम तितकें चांगलें करूं शकत नाहींत. लोककथा एकप्रकारें लोकगीतांच्या पाठच्या बहिणी ! त्यांच्यांत अद्भुत रस असतो. लोकगीतांत करुणरसाला पहिलें स्थान आहे. जीवनांतील साध्यासुध्या प्रसंगांत जें अपूर्व काव्य साठविलें

असतें त्याच्या सौंदर्याकडे लक्ष वेधून त्यांतील रसास्वाद मिळवून देण्याची अद्भुत शक्ति लोकगीतांत आहे.

२. एक सुंदर उदाहरण—

एका लोकगीताचें उदाहरण घेऊं. एक अजाण कुलवधू घरच्या गरीबीमुळें कोदो (कोद्रा) नांवाच्या धान्याची पेज मातीच्या हंडींत रांधून भरदुपारच्या उन्हांत तें रांधण नवऱ्याला नेऊन द्यावयाला शेतांत जाते. दुपारच्या जळत्या जाळांत हिनें हें असलें कदान्न आणून वाढलेलें पाहून नवऱ्याचें पित्त उसळतें. तो गाड्याची उभारी काढून तिला खूप झोडपतो. ती प्रेमळ कुणवीण कसलाही राग, तिरस्कार, आळस न करितां घरीं जाते. गहूं भरडून त्याचा शिरा करते. तो घेऊन शेतांत येते व अशोकाच्या सावलींत ती नवऱ्याला वाढते. नवरा तें खाऊन संतुष्ट होतो; कारण भर उन्हांत उपाशी शिदोरी घेऊन आलेल्या बायकोवद्दल त्याला अगोदरच पश्चात्ताप झालेला असतो. किती साधें आणि निर्व्याज जीवन ! ती नवरी हा साधासुधा प्रसंग तितक्याच साधेसुधेपणानें शेजारणीला सांगते. तें गीत असें :

– कोठीमधून कोदो काढला	– सखे तूं झेलून घे *
– ओंजळ कोठीमध्यें खोल खुपसली	– सखे तूं झेलून घे.
– शेर पावशेर कोदो काढला	– ,, ,, ,, ,,
– जाडा भरडा भरडला	– ,, ,, ,, ,,
– कुंभारवाडा गेली	– ,, ,, ,, ,,
– कवड्या दिल्या, हांडी आणली	– ,, ,, ,, ,,
– हांडीमध्यें पेज केली	– ,, ,, ,, ,,
– वेळणीत ओतली	– ,, ,, ,, ,,
– डोक्यावर घेतली	– ,, ,, ,, ,,

* हें गुजराती पालुपद जसेंच्या तसेंच दिलें आहे.

– नवऱ्यानें डोळे वटारले – सखे तूं झेलून घे
– रांधा उघडून पाहिला – ,, ,, ,, ,,
– बंडीची उभारी काढली – ,, ,, ,, ,,
– आंगभर झोडपलें – ,, ,, ,, ,,
– रडत रडत घरी आल्यें – ,, ,, ,, ,,
– शेरपावशेर गहूं घेतले – ,, ,, ,, ,,
– कासारा घरीं गेली – ,, ,, ,, ,,
– तवा आणि ताटली आणली – ,, ,, ,, ,,
– रांधा डोक्यावर घेतला – ,, ,, ,, ,,
– अशोकाची सावली – ,, ,, ,, ,,
– त्याखालीं बसलों – ,, ,, ,, ,,
– एकमेकां पाहिलें – ,, ,, ,, ,,
– राजी होऊन घरीं आलों – ,, ,, ,, ,,

३. लोकगीतांतील एक वैशिष्ट्य—

लोकगीतांत सर्वांत प्रिय झालेला विषय म्हणजे बलिदान होय. एखादें देऊळ किंवा किल्ला बांधावा, पण त्याची भिंतच टिकूं नये ! तलावाचीं आणि विहिरीचीं बांधकामें काढावींत, पण त्यांत पाणीच येऊं नये. अशा वेळीं गांवांतील सर्व लोक एके ठिकाणीं जमतात व निर्णय देतात कीं बळी दिला पाहिजे. स्वतः होऊन बळी जावें कुणी ? एक उदाहरण आहे. अशीच एक तरुण पोर बळी जाते. त्याअगोदर ती सगळ्यांना भेटते व निरोप घेते. सर्वजण तिला मोठ्या आदरानें सुंदर सुंदर वस्तू भेट देतात. ती उत्फुल्ल मनानें परत येते. आणि काय आश्चर्य ! ज्याक्षणीं ती स्वतःचें जीवन अर्पण करते त्याच क्षणीं विहिरींतलें जीवन काठापर्यंत भरून ओसंडूं लागतें. समाजसेवा किंवा देशभक्ति यांचा असा उच्च आदर्श कां असूं नये ? सेवेबद्दल राजाकडून जाहगीर मिळविण्यापेक्षां असल्या लोकगीतांत अमर व्हावें असें कुणाला वाटणार नाहीं ?

लहानपणीं मी शेतांत जात असें. त्यावेळीं असेंच प्राणार्पण करणाऱ्या उमाईचें गाणें ऐकल्याचें आठवतें. सायंकाळचे ४ वाजल्यानंतर कामकरी विसाव्याकरितां म्हणून तें गाणें म्हणत. सूर्य बुडाला कीं काम थांबे आणि गाणेंही बंद होई. दुसऱ्या दिवशीं पुनः दुपारचे चार वाजत. पुनः गाणें सुरू होई. अशा रीतीनें आठ दहा दिवस एक गाणें चालत असे. तें गाणें आतां मी विसरलों. त्यांतले सगळे शब्दही मला आठवत नाहींत. पण कांहीं ओळी मात्र माझ्या तोंडीं बसल्या आहेत. त्यांतली भाषा बेळगांवकडील खेड्यांतली आहे. तें गाणें असे :—

– गावड्यान् गाऊस बाधीलं – गुरुवान् तळस खाणीलं –
– यवढं तळं खणल्यावरी – तळ्या पाणी कां लागेना ?

* * *

– बोलवा गांवीचे तळवारु – बोलवा गांवीचे कोलकारु
– बोलवा नगरीचे भट्ट – बसू घाला चंदनपाट
– त्याणे पोथी गे काढीली – त्याणे नक्षत्रं गिणीलीं

गुजरातीमध्येंदेखील असेंच एक सुंदर लोकगीत आहे.

– बार बार वरसे नावणी खोदावी ।
– नावणीया नीर ना आव्या जीरे ।

इत्यादि. ह्या गीताचें भाषांतर मराठींत देत आहें. तें असें :—

बारा बारा वर्षें विहीर खोदावी
पण विहिरीला पाणीच येऊं नये
आतां जाणत्याला बोलवा
आतां जोशाला बोलवा
जोशी जाणते म्हणाले
मुलाला बळी द्या
सुनेला बळी द्या

मुलगा तर तयार होता; परंतु पितें मूल आंगावर असलेली दुसऱ्याची पोरगी कशी तयार होणार ? एवढी मोठी करतीसवरती सासू पण ती सुद्धां भीतभीतच विचारते. तथापि सून कांहीं सामान्य घरची नव्हती. ती म्हणते "हे माझ्या समर्थ सासू, तूं अशी कां विचारतेस ? मागवा, साडीचोळी मागवा ! विहिरीवर पलंगडी ठेवा. पाटपिढे आणा." सर्व तयारी झाली. पुत्र आणि सून बलिदान द्यावयाला एक एक पाऊल पुढें टाकूं लागले.

पाहिल्या पायरीवर दिला पाय
तळांत पाणी चमकलें !

होय ! खरोखरच पाणी चमकलें. बारा बारा वर्षें खणलेल्या विहिरींत पाणी आलेलें पाहून अवघ्या गांवकऱ्यांच्या डोळ्यांत देखील आनंदाश्रु चमकले असतील ! दुसरी पायरी झाली. तिसरी उतरली. चवथी संपली. अवघें पाणीच पाणी ! सहावीवर ठेवला पाय. माथा पाण्यांत बुडाला ! नंतर काय झालें ? पण, छे ! असा प्रश्न कुणी विचारतो काय ? हें अलौकिक वीरकर्म पाहून लोक दंग झाले. त्यांतून एकानें एक खोल खोल आवाज ऐकला, " माझ्या प्रियकरा ! माझे प्राण चालले ! "

४. मानवी स्वभाव—

जिथें धर्म आहे त्याठिकाणीं दंभ देखील असावयाचाच. दिव्याखालीं अंधार, आत्म्याखालीं अहंकार, तद्वत् धर्मापोटीं दंभ हाही एक सनातनी नियमच आहे. बाह्य नियम आले कीं त्याबरोबरच फसवाफसवी देखील येते. जेव्हां शिष्टमान्य रीतरिवाज मनुष्यस्वभावावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करितात, तेव्हां एक प्रकट व दुसरा सुप्त असे दोन भावभेद मनुष्यांत निर्माण होतात. आजच्या शिष्टसमाजाच्या भाषेंत व आचारविचारांत जी शुद्धता आपल्याला दिसून येते ती जर खरी असती, तर आजचें युग हें सत्ययुग आहे असें मानावयाला प्रत्यवाय राहिला नसता. आपल्या शरीराचीं व्यंगें जशीं आपण पोषाखानें झाकून टाकतों, तद्वत् मनोमालिन्य शिष्टभाषेच्या पांघ-

रुणाखालीं आपण लपवितों. अमुक संप्रदायांत किंवा त्या संप्रदायाच्या लोकांत एखादी गोष्ट करावयाची नाहीं असें जेव्हां ठरतें, तेव्हां त्या संप्रदायांत जें अवडंबर आणि जो दंभ निर्माण होतो, तो जर ठराव करणारानें पाहिला तर त्याला खात्रीनें हसूं येईल. असें सांगतात कीं, जहांगीर बादशहाचे वेळीं बादशहाबरोबर जे मित्र आदल्या रात्रीं आकंठ मद्यपान करीत असत, तेच दुसऱ्या दिवशीं दरबारांत दारूचें नांव काढणाऱ्याला धर्मलंड ठरवून कडक शिक्षा देत.

परंतु शिष्टाचाराची ही जाचणी मनुष्य अहोरात्र सहन करूं शकत नाहीं. मनुष्याच्या कुवतीला बरदास्त होईल त्यापेक्षां अधिक शिष्टाचार जर समाजांत बोकाळले तर दंभ आणि प्रच्छन्न विषयलोलुपता समाजांत जोरावल्याशिवाय राहणार नाहीं.

आद्यकवी हे असल्या दंभाचे फार मोठे शत्रु असतात. लहान मुलांना तीं उघडींनागडीं असतां आंघोळ घालण्यांत आपल्याला ज्याप्रमाणें कसलाही संकोच वाटत नाहीं, त्याप्रमाणें आद्यकवींना देखील मनुष्यस्वभावाचें वर्णन करतांना कसलीही अमंगल कल्पना शिवली नव्हती. शिष्टसंम्मत साहित्यानें सडून गेलेल्या मेंदूला पूर्वील मोकळ्या साहित्याच्या वाऱ्यानें किती हायसें वाटतें ह्याचें वर्णन अनेकांनीं केलें आहे. साधुपुरुषांत श्लील व अश्लील असा भेद नसतो. लोकगीतांचेंही असेंच आहे. लोकगीतांत शिष्टाचार असतो, पण तो समाजाच्या रोमरोमांत भिनला असेल तेवढाच ! दंभानें आणलेला शिष्टाचार त्यांत नाहीं. लोकगीतांत संयम देखील आहे. पण तो लोकस्वभावांत विलीन झाला असेल तेवढाच. ईश्वरानें निर्माण केलेली सृष्टि जर साधी, सुंदर व हितकर असेल तर लोकगीतें देखील साधीं, सुंदर व कल्याणप्रद मानणें भाग आहे.

५. लोकगीतें व नीति : डार्विनचें तत्त्व—

सर्वांत मजा अशी कीं लोकगीतांना विशेष रीतीनें जपून ठेवण्याचा कुणीही प्रयत्न केलेला नाहीं. पुष्कळ लोकगीतें आपोआप मरून जातात. डार्विनचें

" Survival of the fittest " हें तत्त्व तंतोतंत जर कशाला लागू होत असेल तर तें लोकगीतांनाच होय. समाजांत ज्यावेळीं नीतीचा आग्रह वाढतो तेव्हां नीतिबाह्य व धर्मबाह्य लोकगीतें आपल्या मरणानें मरून जातात. मोकळ्या हवेंत जसे डांस मच्छर टिकूं शकत नाहींत त्याप्रमाणें शुद्ध समाजांत अशुद्ध गीतें राहूं शकत नाहींत. तुमचें म्हणणें असें कीं, समाजांत जें निंद्य आहे, कुजकें आहे, तें तसेंच असूं द्यावें, पण लोकगीतांत मात्र दोष काढावेत. घाणेरडी वस्तु खावी आणि ढेकराची मात्र निंदा करावी, यांतलाच हा प्रकार! ज्याप्रमाणें माशांचे थवे नक्की घाण कुठें आहे हें दाखवून आपली सेवा करितात, त्याप्रमाणें वाईट लोकगीतेंदेखील समाज कोणत्या गर्तेंत लोळतो आहे हें दाखवितात. इतिहासकारांना लोकगीतांचें जें एवढें महत्त्व वाटतें तें यामुळेंच! ड्रायडनच्या कवितेवरून इंग्लंडची तत्कालीन स्थिति जितक्या स्पष्ट रीतीनें कळून येते, तितक्या स्पष्ट रीतीनें इतिहासाच्या पाठ्यपुस्तकावरून ती कळून येत नाहीं. समाजांतून वाईट लोकगीतें सक्तीनें काढून टाकावींत असें कांहीं सुचवितात. हें शक्य असलें तरी रामबाण उपाय मात्र हा नव्हे. समाजस्थिति सूचित करणारा हा थर्मामिटर तुम्ही फेकून द्या. पण त्यायोगें सामाजिक ज्वर कसा नाहींसा होणार? समाज सुधारूं द्या म्हणजे वाईट लोकगीतें दिवा लावला असतांना अंधार नाहींसा होतो तद्वत् नाहींशीं होतील. महाभारत आणि रामायणादि ग्रंथांतून लोकस्थिति निर्भयपणें वर्णिलेली आहे. पण त्या कारणानें त्या वेळची लोकनीति बिघडून गेली असें कुणी म्हणत नाहीं. पुराणकालीन किंवा वेदकालीन भारतवर्षांत जेवढी नीतिमत्ता होती त्यापेक्षां मानवी समाज एक रेसभरही पुढें गेला नाहीं असें विकासवादी बॅलेस सांगून गेला. रामायणमहाभारतांत शिष्ट आणि अशिष्ट हा भेद पाळला गेला नाहीं. यावरून हेंच उघड होतें कीं समाजस्थितीचें वर्णन केल्यामुळें समाज बिघडत नाहीं. उलट समाजस्थितीचें यथार्थ ज्ञान झाल्यास समाजसुधारणेविषयीं एका प्रकारानें प्रचोदना मिळते.

६. पाश्चात्य आणि पौर्वात्य—

मनुष्य जसजसा बिघडत जातो तसतसा तो हिंसा आणि अभिमान ह्यांच्या भक्ष्यस्थानीं पडतो आणि जसजसा तो सुधारतो तसतसा तो सदय आणि विनयशील होत जातो. तुलसीदासानें म्हटलेंच आहे—

"दया धरमका मूल है। पाप मूल अभिमान"

परदेशच्या लोकगीतांत जसें शिकारीचें वर्णन आढळतें तसें आपल्याकडील लोकगीतांत आढळत नाहीं. आपण निसर्गाबरोबर लढण्याऐवजीं निसर्गाशीं तन्मय होऊन जाण्यांत सार्थक मानतों. नदी, जंगल, झाडें, झुडुपें, फुलें, पशू, पक्षी हे सारे आपले सगेसोयरे आहेत. रामायणांत आर्य, अनार्य, गूहक आणि राक्षस ह्यांच्यांत मैत्री होती असें आढळतें. एवढेंच काय, पण गिधाड, अस्वल, वानर, सर्प, हरिणें इत्यादिकांबरोबर आपल्या हिंदुसंस्कृतींत प्रेमभाव आणि आत्मैक्य आढळून येतें. आपण गाईला पूजनीय ठरवून आपला आत्मैक्यभाव जास्त व्यापक आहे हें दाखवून दिलें आहे. मनुष्यानें गाय, बैल, घोडा, कुत्रा ह्यांच्यापासून सेवा घेण्यास सुरुवात केली तेव्हांपासून त्यांच्याबद्दल दया वाढविण्याची प्रवृत्ति माणसांत उत्पन्न झाली आणि म्हणून त्यांच्या विषयीं एक प्रकारच्या विश्वासानें व समभावनेनें लिहिलेलीं गीतें आढळून येतात. बैल हांकणारा खेडूत ऐन उन्हांत जीवाची काहिली होत असतांना तळमळतो तेव्हां त्याला त्याच्याबरोबरच राबणाऱ्या बैलाचीही दया येते. केव्हां केव्हां हा शेतकरी परिस्थितीनें घायाळ होतो आणि स्वतःची जमीन स्वतःच गहाण टाकून त्या जमिनीवरच बैलासारखे काबाडकष्ट करतो त्यावेळीं तो त्यांच्याबरोबर समदुःखीसुद्धां होतो.

७. आपलें वैशिष्ट्य—

आतां एक गोष्ट सांगतों. तिचें नांव "जीवनमय साडी." ही गोष्ट गुजराती लोकगीतांतील आहे. आजच्या चरखाखादीच्या युगांत कांतण्या-पिंजण्याच्या लोकगीतांवर आपलें लक्ष वेधलें जाणें स्वाभाविक आहे. परंतु कलादृष्टीनें

देखील हें गाणें आपलें लक्ष वेधून घेतें. गिरणीमध्यें बनलेला माल कितीही भपकेदार असो आणि तो वापरणारा कोंबड्याप्रमाणें मोठी ऐटही दाखवो, पण त्यांत जीवनकला कुठें असते ? एक सासुरवाशीण होती. मोठी हौशी. तिनें आपल्या हातानें बारीक बारीक सूत कांतलें. शेजारच्या विणकऱ्यानें तें विणून दिलें. रंगाऱ्यानें रंगवून दिलें. मामानें खडी काढली. खडीचा रंग पसंत करतांना घरांत सासू, सून, नणंद ह्यांच्यांत चर्चा झाली. नणंदेला साडी फार फार आवडली.

भावजईनें इतके दिवसांची मेहनत, आशा, श्रम, मनावर न घेतां नणंदेला साडी दिली व खुश केलें आणि पुन्हां तीनचार महिने तिनें कष्ट केले. विणणारा कोष्टी, रंगविणारा रंगारी ह्यांना सुनेची दया आली आणि ह्या खेपेस सर्वांनीं खूप मेहनत घेतली. मामानें त्यावर कलाकुसरीचें काम फार कौशल्यानें केलें. साडी पहिल्या साडीपेक्षां फार चांगली झाली आणि नणंदेच्या हृदयाचें पाणी पाणी झालें !!

असल्या ह्या प्रसंगांत किती किती काव्य सांठविलें असतें ! हातानें कातलेल्या सुतासुतांत प्रेम, श्रम व ध्यास हे भाव साठविलेले असतात व साडीवर काढलेल्या खडीच्या चांदणीचांदणींतून कलेचे विशुद्ध सात्विक भाव चमकतात. मुसाफरींत जितके कष्ट जास्त तितकेंच यात्रेचें पुण्यही जास्त. तद्वत् उत्साह, आशा-निराशा, खंत आणि सदभिरुचि यांचा समन्वय जेव्हां एकेका सुतांत सामावतो तेव्हां ती साडी जीवनमय होते असेंच म्हणावें लागेल. पूर्वी प्रत्येक साडीचें वैशिष्ट्य वेगवेगळें असे, आणि तें टिकविण्याची जबाबदारी त्या त्या गांवच्या सुंदर ललनांच्या शिरावर असे. कुळाची किंवा जातीची अब्रू सांभाळावी त्याप्रमाणें ही कला स्त्रिया सांभाळीत. स्त्रिया एकत्र जमल्या म्हणजे ह्या फॅशनच्या गोष्टी निघत. पाटण्याची साडी माझ्या नखांत मावेल एवढी. ती राजकन्येनेंच नेसावी. पावागडची साडी त्याच्या उलट. ती नेसल्यावर कमरेनें हेलकावे खावेत. ती धुतली तर समुद्र रंगविला जावा. वसून वाळविली तर सारी पृथ्वी झांकली जावी.

८. लोकसाहित्य व भाषा —

लोकसाहित्य आणि भाषा ह्यांचा संबंध कोणता ? त्यामुळें भाषा समृद्ध होते कीं काय ?

जीवन जसजसें सर्वंकष होत जाईल तसतशी भाषा देखील सर्वगामी, विपुलार्थवाहिनी आणि ओजस्विनी झाली पाहिजे. पण हा उद्देश सफल होणार कसा ? इंग्रजी वाक्यरचनांचा अनुवाद करून ? कीं संस्कृतांतले अवजड समास भाषेंत कोंबून ? जुन्या स्वाभाविक आणि सरस भाषेंत हव्या त्या सूक्ष्म भावांना तंतोतंत अशा शब्दांची मुळींच उणीव नाहीं. एवढेंच काय, पण कित्येक प्रत्ययांच्या योगानें असे कांहीं सुंदर पैलूदार शब्द बनतात कीं अशा दोनचार शब्दांच्या योगानें कित्येक लांबलांब वाक्यें किंवा कंडिका (Paragraphs) सहजच स्पष्ट होतात. भाषाशैलीला असलें इष्ट वळण देण्यांत आणखी एक मोठा फायदा आहे. लोकसाहित्याची भाषा जीवंत असते. त्या भाषेंत लिहिलेले विचार लोकांच्या हृदयांत अगदीं आंत आंत जाऊन भिडतात. हें वळण लावल्यास सुशिक्षित आणि अशिक्षित हा भेद नाहींसा होईल.

९. स्वाभाविकता—

आजचें युग अत्यंत कृत्रिम आहे. म्हणून लोकगीतांचा जो एक मोठा फायदा आहे त्याकडे अजून कोणाचें लक्ष गेलें नाहीं. आपली भाषा, आपले रिवाज, आपलीं ध्येयें, आपली बुद्धिमत्ता म्हणजे पर्यायानें आपलें सर्व जीवनच कृत्रिम बनलें आहे. मोकळ्या हवेंत शरीर उघडें करतांना आपल्याला एक प्रकारें जशी लाज वाटते, खंत वाटते, त्याचप्रमाणें सामाजिक, राजकीय आणि कौटुंबिक व्यवहारांत सहज स्वाभाविकता निर्माण करण्याची आपणांस भीति वाटते. आपल्यांत तितकी कुवत नसते. जणुं कांहीं स्वाभाविकतेमध्यें मरण आणि सत्यानाशच आहे. लोकसाहित्याचें अध्ययन केल्यानें, त्यांचा पुनरुद्धार केल्यानें आपण हें कृत्रिमतेचें कवच फोडूं शकूं. मोकळ्या हवेंत सहल करण्याइतकी शक्ति मिळवूं शकूं. स्वाभाविकतेंतच आत्मशुद्धि होऊं शकते. कृत्रिमतेंत

ठाणे जिल्हा ग्रंथ संग्रहालय

दंभ, पाखंड, आणि अधर्म राहतो. कृत्रिमता आशेची भुलावण पाडते पण आशापूर्तीच्या नांवानें मात्र शून्य !

१०. आमचें संशोधन व संग्रह—

मी लहान असतांना कारवारचा जेल पहावयास गेलों होतों. तिथला जेलर खिस्ती असून भला माणूस होता. त्याच्या घरच्या भिंतीवर फुलपांखरांचीं प्रेतें टांचणीनें टोंचून ठेविलीं होतीं. आकाशांतील बापानें जर हें पाहिलें असतें तर त्याच्या डोळ्याला खचित पाणी आलें असतें. मी त्या अधिकाऱ्याला विचारलें—"काय हो, फुलपांखरांना बिचाऱ्यांना ही शिक्षा काय म्हणून ?" त्यांनीं उत्तर दिलें, "आमच्या घरच्या बगीच्यांत हीं सुंदर फुलपांखरें नेहमीं येत व फुलांफुलांवर नाचून बागेची शोभा वाढवीत. परंतु मागच्या वर्षी आम्हांला आमचें घर मोठें करावें लागलें व म्हणून आमची फुलबाग आम्ही नाहींशी केली. फुलझाडें नाहींशीं झाल्यावर हीं चंचल पांखरें कशाला येतील ? म्हणून आम्ही सांपडतील तेवढीं आणलीं आणि त्यांना भिंतीवर टांचून ठेवलें. पहा ! यांचा रंग किती सुंदर आहे ! ह्यांच्या पंखांवरचे ठिपके किती छान आहेत !"

जेलरनें सांगितलेली गोष्ट मला कुठल्याकुठें घेऊन गेली. पण माझ्या मनःक्षोभाचें पृथक्करण त्यावेळीं मी करूं शकलों नाहीं. तो सद्गृहस्थ कलारसिक होता यांत संशय नाहीं. त्यानें हें सौंदर्य–हें उडून जाणारें सौंदर्य–आपल्या दिवाणखान्यांत स्थिर करून ठेवण्याचा महाप्रयास केला; पण—पण काय ?—कांहीं नाहीं ! फुलबाग गेल्यावर दुसरें काय करावयाचें ! जेवढीं राखणें शक्य होतें तेवढीं फुलपांखरें त्यानें राखलीं !!

हल्लींच्या काळीं युरोपमध्यें लोकगीतांचा संग्रह खूप झालेला आहे. त्या बाबतींत जेवढे प्रयत्न करणें शक्य होतें तेवढे त्यांनीं केलेले आहेत. लोकगीतांची रागदारी ध्वनियंत्राच्या तबकडीवर खिळवून ठेवण्यांत आली. परंतु वरच्याप्रमाणेंच शवांना–प्रेतांना–सांभाळून ठेवण्याची ही कला होय. आधुनिक

साहित्याचें मूलधन

सुधारणेचें बर्फ पडून समाज स्थगित व्हावयाच्या अगोदर लोकगीतांचा काल दिवसांमासांनीं, ऋतुऋतूंनीं वाढत आला होता. त्यांचा संग्रह करण्याचा प्रयत्न मुळींच करावा लागत नसे. हीं लोकगीतें हजार हजार दोन दोन हजार वर्षांपूर्वींचीं असतील. देशकालानुरूप स्वतःचे कपडे त्यांनीं बदललें, पण स्वत्व, आत्मस्वरूप तसेंच टिकविलें. प्रत्येक धर्मांत जसा ईश्वर असतो तद्वत् प्रत्येक देशांत सर्वसाधारण असलेलीं लोकगीतें आहेत. शहरची राहणी, रेल्वेची मुसाफरी आणि छापखान्याची सोय या त्रिविध मोहिमांनीं ग्रासलों गेल्यामुळें आपण आपल्या जीवनांतील मोठ्यांतमोठें काव्य आणि संस्कृति घालवून बसलों आहोंत. इतकीं वर्षें टिकून राहिलेलीं लोकगीतें या आधुनिक सुधारणेच्या विषारी हवेंत मृगाच्या किड्याप्रमाणें पहिल्या पावसांतच पटापट मरून गेलीं आणि आम्ही देखील संशोधनाच्या नांवाखालीं आमच्या साहित्यसंग्रहालयाकरितां लोकगीतांची ' ममी ' (Mummy) करून संतुष्ट झालों. कोसभर असलेल्या शेतांतील विहिरीवर, गवळ्यांच्या पोरांच्या टोळक्यांत, बालबालिकांच्या खेळक्रीडांत, गृहिणींच्या घरकामांत, प्रभातकाळच्या मंजुळ घंटारवांत, लहान मुलांच्या 'गाई' 'गाईं'त, कुलवधूंच्या हविष्यव्रतांत, हरताळिकेंत, नवरात्रींच्या उत्सवांत, देवीच्या देवळांत, महादेवाच्या यात्रेंत, पंढरीच्या मेळ्यांत किंवा असल्याच काव्यमय ठिकाणीं लोकगीतांचा खरा संग्रह होऊं शकतो.

४. लोकजीवन

१. आजची शिक्षणप्रणालि—

आजच्या शिक्षणप्रणालीनें आपण सुतकी प्रॉटेस्टंट बनलों आहोंत. जीवनांतील आनंद लुटतांना आम्हांला लाज वाटते. ज्या सामाजिक संस्था लोकगीतांना जन्म देतात त्यांच्याबरोबर तर आम्ही झुंजच मांडली आहे आणि त्यावरही कडी करण्याकरितां कीं काय, आमचीं लोकगीतें टिकून रहावींत अशी आम्ही इच्छा करितों ! त्या जेलरनें भिंतीवर फुलपांखरें टांचलीं आणि तीं जशीं जगलीं (?) तशींच दोन पृष्ठांच्या चिमटींत हीं लोकगीतें जगतील; पण त्यांत साहित्याचा प्राण राहणार नाहीं. तीं सडणार नाहींत हें खरें; पण त्यांत सडण्यासारखें तरी काय असणार !

२. स्वतःच्या सामर्थ्याची ओळख—

शहरच्या लोकांना वनभोजनाची फार हौस. ते शहरच्या बाहेर जातात; एखाद्या बागेंत जमतात; चुलीकरितां तीन धोंडे मांडतात; इंधनासाठीं आजुबाजूच्या काटक्याकुटक्या गोळा करितात; पानांच्या पत्रावळी व द्रोण करून अर्धें अन्न मातींत घालतात आणि मोठ्या प्रयासानें केलेला कच्चा स्वयंपाक मोठ्या समाधानानें फस्त करितात.

त्या दिवसाचा सारा आनंद असल्या सहजरम्य खटपटींतच असतो. कांहीं काळ भोंवतालचें अस्वाभाविक वातावरण नाहींसें होऊन नैसर्गिक सृष्टीशीं आपला मिलाप होतो हेंच त्या दिवसाचें उद्दिष्ट असतें. हजारों वर्षांपासूनच्या प्रयत्नानें जीं साधनें माणसानें निर्माण केलीं त्यावांचून आपण आपला निभाव करूं शकतों किंवा नाहीं याचें प्रत्यंतर त्या वनचर्येंत पहावयाचें असतें.

कृत्रिमतेची कांत उडून जाऊन माणसाला आपल्या सामर्थ्याची तिथें ओळख पटते.

कुस्तींत देखील अशाच स्वरूपाचा आनंद असतो. शस्त्रयुद्ध, वाग्यूद्ध, कोर्टबाजी हीं सर्व सुधारलेलीं युद्धें होत. कुस्तींत स्वाभाविकता असते. शरीराबरोबर शरीर झुंजतें.

३. वाङ्मयाचा अवखळ प्रवाह—

साहित्यांत देखील असलाच स्वाभाविक आनंद भोगण्याची **लोकजीवनाची** एक प्रमुख प्रवृत्ति आहे व ती तशीच वाढत आहे. शिष्टाचार, नीतिशास्त्र, साहित्यशास्त्र आणि भाषाशास्त्र यांचे अंकुश ज्यांत नाहींत व मानव्याचा अनिर्बंध, नैसर्गिक अवखळ प्रवाह ज्यांत आहे असलें वाङ्मय जगाला हवें आहे. शिष्टसाहित्यांत मोठी कला असेल, सुंदर, चकचकीत झिलई असेल, पण या अवखळ साहित्यांत जी सजीवता असते ती त्यांत कुठें सांपडेल ? राजाच्या महालांतील जिन्यांच्या कठड्यांवर लाखेची किंवा वारनिशची चकाकी दिलेली असते. देवळांतील जिन्यांच्या कठड्यांवर असंख्य लोकांनीं हात घासल्यामुळें गुळगुळीतपणा आणि एक प्रकारचें तेज त्या कठड्यावर आलेलें दिसतें. पहिल्याला काय दुसऱ्याची सर कधीं येईल ? साहित्यशास्त्राच्या नियमांना अनुसरून निर्माण झालेल्या सालंकृत वाङ्मयांत आणि अठरापगड जातींच्या मनोरंजनाची कुवत असलेल्या लोकवाङ्मयांत वरील प्रकारचाच नि महत्त्वाचा भेद असतो. या लोकवाङ्मयाची गोडी अवीट असते.

४. हें वाङ्मय कुणी निर्मिलें—

खरें राष्ट्रीय शिक्षण तेंच कीं ज्यांत असलें लोकसाहित्य आधारभूत समजलें जातें. आपल्या देशांत ज्यावेळीं राजकवि दरबारांमध्यें शब्दालंकारांची व अर्थालंकारांची कसरत करून दाखवीत होते, त्यावेळीं हा अशिक्षित पण संस्कारी जनसमुदाय एका वेगळ्याच साहित्यावर आपली गुजराण करीत होता. लोकजीवनाचें हें गंगोदक कुणी निर्माण केलें ?

ज्या गोष्टींनीं राष्ट्राचा स्वभाव बनविला त्याच गोष्टींनीं हें साहित्य निर्माण केलें. समाजाचें जीवनसर्वस्व बहरलें आणि त्यावर हीं लोकसाहित्याचीं फुलें फुलून आलीं. फुलांनीं बहरलेला हा चाफा निष्पाप बालकांच्या हातीं द्याल तर त्यांचें जीवन सुगंधित होईल; त्यांना लोकजीवनाची ओळख पटेल आणि ते समाजाचे गुरुही ठरतील आणि सेवक पण बनतील.

५. लोकेतिहासांत स्थान—

लोकजीवनाचा इतिहास लिहिला जातो तेव्हां ह्या वाङ्मयाचा उपयोग होतो काय ? होय, उपयोग होतो नि फार मोठा उपयोग होतो. जें साहित्य स्वाभाविक आहे तेंच प्राण पुरविणारें–जीव ओतणारें असतें. प्राचीन राजांची आणि राजवंशांची हकीगत यांच्यावरूनच नाहीं का आपण लिहिली ? आपण आपल्या हल्लींच्या इतिहासाची उभारणी देखील ह्याच्यावरच केलेली आहे. अभिजात साहित्य, स्थापत्य आणि कला यांचाही इतिहास यांच्या आधारेंच लिहिला. ज्यावेळीं राजांचा इतिहास लिहिला गेला, त्यावेळीं त्यांत प्रभावशाली शिष्ट लोकांनाच ठाव मिळाला. राजांचा वर्ग हा जसा थोडा आहे तसाच हा इतिहास पण संकुचित आहे. अफाट जनसमुदायासमोर ह्या मूठभर प्रभावशाली शिष्ट लोकांची संख्या म्हणजे समुद्रांतल्या कांहीं शिंपल्या. सागराचेंच रूपक घेतलें तर असें म्हणतां येईल कीं राजे म्हणजे या लोकजीवनोदधीचे तरंग, प्रभावशाली लोक हे वरवरचे जलथर; पण लोकसमुदाय हा तर प्रत्यक्ष सागरच ! ह्या सागराच्या भरतीचा इतिहास म्हणजेच लोकेतिहास !

६. इतिहासाची विपर्यस्त व्याख्या ! लोकजीवनाचा विशेष !!

परंतु ह्या सागराच्या भरतीकडे कधीं आपलें लक्ष गेलें काय ? त्यांचा इतिहास लिहिण्याकरितां आपल्याजवळ कांहीं प्रभावी साधनें आहेत हें देखील आपल्याल ठाऊक नाहीं. इतिहास म्हणजे देश व काल यांच्यावरील मुलायम पापुद्रा अशीच जोंपर्यंत आपली कल्पना होती, तोंपर्यंत आपल्याला लोकेतिहासाचीं साधनें मिळणें शक्य नव्हतें.

एखाद्या खेडवळ माणसाला विचारा–तुझें वय काय रे? तो सांगूं शकत नाहीं. फार झालें तर तो म्हणतो, ह्या बनांतील बांबूंना फुलें आलीं होतीं ना? त्याच वर्षी माझें लग्न झालें. त्याच्यापेक्षां अधिक तंतोतंत अशी कालगणना त्याच्याजवळ नसते; आणि त्याची त्याला जरूर लागत नाहीं. जी स्थिति कालगणनेची तीच भूगोलांची, देशांची! नवतीचा वारा हा सातासमुद्राच्या पलीकडून येतो हें त्याचें भूगोलाचें ज्ञान! ज्यामध्यें इतिहासाचा पत्ता नाहीं असले विचार आणि अनुभव लोकजीवनांत समावूं शकतात. लोकजीवन इतिहासाशीं फटकून वागलें नाहीं; पण त्याविना त्याचें कधीं अडलेंहि नाहीं. देश आणि काळ यांच्यामध्येंच जोंपर्यंत इतिहास घोटाळत राहील तोंपर्यंत त्याला लोकजीवनांत–लोकहृदयांत–ठाव मिळणार नाहीं. हृदयांत देशकाल नसतो!

७. अनुभवाविषयीं अनुभव—

माणसाला मोठ्यांत मोठा रोग म्हणजे अपचन! मनुष्य जेवढें खातो तेवढें तो पचवूं शकत नाहीं. अनुभवाविषयीं असाच अनुभव आहे. मनुष्यानें जेवढें अनुभविलें तेवढें पचविलें नाहीं. जें पचलें तें लोकजीवनांत आणि लोकवाङ्मयांत प्रकट झालें आहे. बाकीचा भाग म्हणजे समाजाच्या वरचा थर व दडपण! इतिहासांत आणि बखरींत, धर्मशास्त्रांत आणि समाजशास्त्रांत मनुष्याची जी प्रगति दिसून येते ती प्रगति म्हणजे वरवरची होय. आज वेगवेगळे देश सभ्यतेची व संस्कारितेची बढाई मारतात ती केवळ त्या वरच्या पापुद्र्यावरच. ज्यावेळीं राष्ट्रहृदयाचा इतिहास लिहिला जाईल आणि लोकेतिहासाचा मनु सुरू होईल त्यावेळीं त्या देशाची कदर फार वेगळी राहील.

शिष्ट लोकांनीं स्वतःच्याच कल्पनेप्रमाणें जीवनाचे आदर्श चोखाळले, अजमाविले, शिष्टाचाराचे नियम बनविले, औचित्य आणि कला यांच्यांत मर्यादा निर्माण केली. परंतु त्यांतून लोकांनीं किती घेतलें व लोकजीवनांत किती पचलें हें दिसतेंच आहे. कित्येक वस्तू तर शिष्टलोकांचा केवळ विरोध आहे म्हणून लोकांनीं स्वतःच पोसल्या आणि स्वतःच टिकविल्या!

८. लोकजीवनाची स्मृति—

लोकसाहित्याकडे पहातांना लोकजीवनाच्या आजपर्यंतच्या प्रवृत्ती लक्षांत घ्यायला हव्यात! लोकजीवन व्यवहार पहात आलें आहे. व्यवहारांत सौजन्यापेक्षां चातुर्याला अधिक किंमत असते. साधुपुरुष दुरूनच पूज्य ! परंतु चतुर पुरुष अनुकरणीय ठरतो. जो मनुष्य स्वतः बिलकुल फसत नाहीं, उलट दुसऱ्यालाच ठगवितो, आणि कसाही प्रसंग आला तरी जो स्वकीयांचाच फायदा करून घेतो अशा माणसाचे गोडवे लोककथांत गाईले असतात. धर्मस्मृति वेगळी आणि ही लोकजीवनाची स्मृति वेगळी ! सज्जनता, वीरता, शौर्य, धैर्य इत्यादि आर्यसद्गुणांची लोकहृदयांत कमी नसते. लोकहृदयाचा आदर्श स्वच्छ, शुद्ध परंतु थोडा अशिष्ट असतो. कलेचा सोंवळेपणा लोकहृदय पाळीत नाहीं; आणि म्हणूनच लोकसाहित्याकडे पहातांना आपल्याला वरील गोष्टी वगळून चालणार नाहींत !



५. लोकसाहित्याची मीमांसा

१. सगळ्यांत गहन विषय —

मनुष्याच्या शिक्षणप्रणालींत सर्वांत गहन विषय जर कोणता असेल तर तो स्वतः मनुष्यच ! सर्व शास्त्रें, सगळ्या कला, अवघा इतिहास, तसेंच समाजशास्त्र, धर्मशास्त्र, विज्ञानशास्त्र इत्यादि झाडून सारे विषय मनुष्याकरतांच आहेत. मानवाला मानवाविषयीं सर्व प्रकारचें ज्ञान मिळवून घेण्याची मोठी हौस वाटते; आणि म्हणून संस्कारिक विषयांत इतिहासाला इतकें वरचें स्थान मिळालें आहे व धर्मशास्त्रालाहि इतकी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

अथवा असेंच म्हणावें कीं जगांत जीं जीं शास्त्रें, जे जे विषय निर्माण झाले आहेत, त्यांच्या मुळांशीं मनुष्याला मनुष्यांविषयीं किंवा परिस्थितीविषयीं वाटलेली जिज्ञासा तृप्त करण्याची उत्कंठाच आहे. मनुष्य सामाजिक जीवनाविषयीं जी आस्था आणि आवड दाखवितो ती तरी ह्याच जिज्ञासेनें. समाजांतील विविध व्यक्तींचे विविध स्वभाव, त्यांच्या भावना, आकांक्षा व अभिरुचि हीं जो मनुष्य जितक्या विस्तृत प्रमाणावर जाणतो, त्या मानानें तो त्या व्यक्तींवर स्वामित्व मिळवितो आणि तोच लोकाग्रणी होतो.

२. ज्ञानदानाची वांटणी —

जुन्या काळीं चतुर राजकारणी पुरुष आपल्या मुलांना इतिहास शिकवीत आणि लोकस्वभावाचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची त्यांना संधी देत ती याच कारणामुळें ! राजपुत्रांना जुन्या काळच्या गोष्टी सांगण्याकरितां मोठमोठे विद्वान

पंडित दरबारांत असत. भाट, चारण इत्यादिकांकडून आपला वंश, आपल्या पूर्वजांचा पराक्रम आणि आपल्या देशांतील लोकांचे स्वभाव ओळखण्याची संधि राजपुत्रांना देण्यांत येई. कोणतें ज्ञान कुणी द्यावें हें देखील ठरलेलें! ही सृष्टि कोणत्याप्रकारें निर्माण झाली, तिचा नियंता कोण, जगाची रहाटी कशी चालते; समाजाच्या व्यवस्थेकरितां व्यक्तिव्यक्तींनें काय करणें योग्य आहे याची तपशीलवार माहिती ब्राम्हणांकडून मिळत असे. उलटपक्षीं, दरबारांतील खुषमस्करे आणि विदूषक यांचेकडून ठग लोकांच्या युक्त्या, चतुर वार्तालाप, स्त्रियांचे स्वभाव, यांचें ज्ञान होई. एका जुन्या विख्यात पुस्तकांत अशी कथा आहे कीं एका राजाचीं पांचही मुलें अगदीं मठ्ठ होतीं. त्यांना लोककथा देखील आवडत व कळत नसत. हें पाहून विष्णुगुप्त नांवाच्या महापंडितानें त्यांना लांडगा, कोल्हा, कावळा, बैल यांसारख्या पशुपक्ष्यांच्या बाळबोध गोष्टी सांगून राजकारणासारखा गहन विषय त्यांना शिकविला.

३. चिरंतन हव्यास —

लोककथा ऐकण्याचा हव्यास जगांतील सर्व देशांत सर्व लोकांना अखंड आणि अव्याहत लागून राहिला आहे. बालपणच्या उत्सुकतेमुळें मुलें, रसिकतेमुळें तरुण आणि उतरत्या वयांत निवृत्तीचा आनंद मिळत असल्यानें म्हातारे, हजारों वर्षांपासून असल्या गोष्टी सांगत व ऐकत आले आहेत. मनुष्यस्वभावांतील या विशिष्ट अंशाचें विद्वान लोकांनीं मोठें सूक्ष्म आकलन केलें व त्याचाच उपयोग करून कथांच्या द्वारें स्वतःचा उपदेश लोकांचे गळीं उतरविला. एका बाजूनें स्वाभाविक जिज्ञासा आणि जगांतील प्रत्येक रहस्य आपल्या मगदुराप्रमाणें उकलण्याची हौस या दोन कारणांनीं मनुष्य प्रत्येक गोष्टींची कांहींना कांहीं उपपत्ति लावीत असतो; म्हणूनच नैसर्गिक घटना, विविध चमत्कार, ताऱ्यांची गती, जन्ममरणाचें गूढ, प्रजोत्पत्तीचें रहस्य, याविषयीं मनुष्यानें आपल्या कल्पनेप्रमाणें कारणमीमांसा केली आहे. सुधारलेल्या देशांतील लोकांनींच हें केलें असें नव्हे तर रानटी लोकही त्यांत भागीदार आहेत.

४. जुने लोकाग्रणी —

या अशाच रीतीनें मानवी हृदयाचें समाधान होतें, कल्पनाशक्तीला वाव मिळतो आणि काव्यगुणांची जोपासना होते. आज कवी मनोविनोदन करण्याकरितां स्वतःभोंवतीं एक जाळें निर्माण करितात व त्यांतच गुंग असतात. काव्य म्हणजे असत्य सृष्टि अशीच कल्पना आज प्रसृत झालेली दिसते. मानव्याच्या सुरवातीच्या अवस्थेंत असें नव्हतें. संस्कृत भाषेंत आणि वेदांत देखील अशी कल्पना आहे कीं कवी म्हणजे गूढ उकलणारे, अज्ञाताचें रहस्य सांगणारे, द्रष्टे ! आणि म्हणून कवी म्हणजे समाजाचे अग्रणी ! समाजधुरीणानें समाजाला वळविण्याची कला आत्मसात केली पाहिजे. जुने अग्रणी हा लोकशिक्षणाचा प्रमुख सिद्धांत फार चांगल्या रीतीनें जाणत होते. जडांतून चैतन्य, ज्ञातांतून अज्ञात, अपरोक्षांतून परोक्ष, अंतर्भावांतून बहिर्भाव; निकटांतून दूरवर्ति हीं आणि असलीं सिद्धांतसूत्रें त्यांनीं जाणलीं होतीं. म्हणून प्राचीन विचार, कल्पना व इतिहास, आणि लोकरूढ रूपकें घेऊन त्यांच्या द्वारें त्यांनीं समाजशिक्षण दिलें व प्रत्येक नवीन गोष्ट समाजांत प्रचलित केली. त्यांच्यापुरतें बोलायचें झालें तर ध्यानस्थ बसूनही जगांत रमणारे, चिच्छक्तीबरोबर एकरूप झालेले असे ते होते. भाषेशिवाय, वाणीशिवाय एवढेंच काय, मनालाहि मध्यस्थी करूं न देतां त्यांनीं दुनियेचें रहस्य जाणलें.

५. मनोविनोदन व तत्त्वचर्चा —

पण समाजानें तें कसें जाणावें ? आणि समाजाला त्यांनीं हें रहस्य सांगितलें, तें तरी कोणत्या रीतीनें ? ज्या वस्तूंचा लोकांना दृष्टांत नाहीं त्या वस्तूंचा परिचय कसा करून द्यायचा ! आणि प्राचीन ऋषींनीं हें जें केलें तें कशाचे द्वारें ?

आपले ऋषी मोठे चित्रकार होते. वाटेल त्या गूढ प्रमेयाचें शब्दचित्र आपल्या अमोघ शक्तीनें ते निर्माण करूं शकत. त्यांच्या वेळेला देखील अतिप्राचीन समजल्या जाणाऱ्या लोककथा अस्तित्वांत होत्या. त्या त्यांनीं हातीं घेतल्या व त्यांत अवश्य तो फेरफार करून स्वतःला स्फुरलेल्या तत्त्वांचें चित्र

त्यांनीं लोकांसमोर उभें केलें. सामान्य जनांना त्यांत मनोविनोदन सांपडलें आणि त्यांतूनच ज्ञानपरायण जिज्ञासूंना रहस्याचा, तत्त्वचर्चेचा बोध झाला.

कोणतीहि गोष्ट सरळपणें सांगायचीच नाहीं हा जणुं कांहीं ऋषींचा स्वभावच ! आणि म्हणून त्यांनीं म्हटलें आहे—'परोक्ष प्रिया इवहि देवाः प्रत्यक्षद्विषः' हीच प्रथा अशाच रीतीनें पुढें चाललली. ऋषींनीं परम गूढ असें ज्ञान लोककथांमधूनच पेरलें. ज्योतिर्विदांनीं आपले सिद्धांत लोकवार्तांत ओविले. समाजशास्त्रकारांनीं आपल्या व्यापक सिद्धांतांचें आणि सामाजिक नियमनांचें समर्थन या कथांच्या द्वारेंच केलें. इतकेंच काय पण निरुक्तकारांनीं देखील या लोकवार्तांचाच आश्रय घेतला. पुराणकारांनीं मोठ्या निष्ठेनें हीच प्रथा पुढें चालविली. धर्माचीं तत्त्वें व समाजाचें नियंत्रण लोकरूढ करण्यास प्रचलित साहित्य व लोककथा त्यानीं हातीं घेतल्या. त्यांना असें वाटलें कीं या कथांत हवा तो फेरफार करण्याचा अधिकार त्यांचा आहे. कारण लोकांच्या अंतःकरणाशीं ते एकरूप झालेले ! तेव्हां त्यांनीं आपल्या प्रचारकार्यास अनुकूल होईल अशा रीतीनें लोककथांचा ओघ वळविला. त्यांच्यावर आपण असत्यवादित्वाचा आरोप करूं शकत नाहीं. कारण त्यांनीं असें स्पष्टच सांगून टाकलें आहे कीं आम्हीं जें काय म्हणतों त्याचा अर्थ तुम्हीं लक्षांत घ्या. केवळ तुम्हांला समजावून देण्याकरितां आम्हीं ही युक्ति योजीत आहोंत. वाल्मीकि-रामायण, अध्यात्म-रामायण, आनंद-रामायण, अद्भूत-रामायण, तुलसी-रामायण अथवा भावार्थ-रामायण या सर्वांतून राम आणि सीता एकच असून त्यांची कहाणी मात्र अनेक रीतीनें वर्णन केलेली आपल्याला आढळते ती देखील याच कारणामुळें ! आणि म्हणूनच पुराणकारांचें म्हणणें आपल्याला एकदम पटतें !

६. लोकसाहित्य

१. पूर्वपीठिका : सुरुवात यूरपपासूनच—

अमेरिकेंतील एकाद्या प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र उघडा. आरंभींच तुम्हांला असें आढळून येईल कीं त्या पुरुषाचे आईबाप, वाडवडील इंग्लंडांत किंवा स्कॉटलंडांत रहात होते आणि मग तिथून ती मंडळी अमेरिकेंत आली. अमेरिकेच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासाचें मूळ यूरपच्या सामाजिक आणि राजकीय धारणेंत सांपडतें. हें अस्वभाविक नाहीं; कारण अमेरिकेची महाप्रजा (race) यूरपमधूनच तिकडे गेलेली आहे. परंतु आपल्याकडे एक मोठी विचित्र गोष्ट दिसून येते. ज्यांना इंग्रजी येतें असल्या लोकांनीं कांहींहि लिहिलें तरी त्याची सुरुवात ते यूरपपासूनच करितात. जणुं कांहीं आपल्या संस्कृतीची पूर्वपीठिका यूरपचीच आहे !

ही प्रथा मोठी घातकी असून एका अस्वाभाविक अशा शिक्षणप्रणालींतून उत्पन्न झाली आहे. ही शिक्षणप्रणाली म्हणजे काय याचें वर्णन पुढें येईलच. इंग्रज या देशांत नव्हते त्यावेळीं काय आम्ही रानटी होतों ? आमच्या समाजाचा विकासच झाला नव्हता ?

२. यूरपची कुळकथा—

आमच्या लोकसाहित्याची पूर्वपीठिका डेन्मार्कमध्यें शोधायला नको. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल याचीं वचनें पुढें मांडून लोकशिक्षणांत लोकसाहित्याचें महत्त्व किती हें देखील सिद्ध करायला नको. आपलें लोकजीवन आणि युरो-

पियन लोकांची मनोभूमिका सर्वस्वी भिन्न आहेत. जिला आपण यूरोपीय संस्कृति म्हणून म्हणतों ती खरें पाहूं जातां ग्रीक व रोमन संस्कृति होय, आणि याच संस्कृतीला अभिजात संस्कृति (Classical culture) म्हणून तेथें संबोधितात. हे ग्रीक व रोमन लोक मोठे अभिमानी होते. ते म्हणत, जे ग्रीक आणि लॅटिन नव्हत ते बार्बेरियन म्हणजे रानटीच असले पाहिजेत. यूरपच्या मध्य व उत्तर भागांत या संस्कृतीचें साम्राज्य प्रस्थापित झालें आणि त्या लोकांनीं देखील तिचा स्वीकार करून आपलें 'रानटीपण' धुऊन काढलें !

अशी परिस्थिती दोन हजार वर्षेपर्यंत चालली. शिक्षण म्हणजे तेंच कीं जें "अभिजात" होय, असा अर्थ रूढ झाला. हल्लीं जर्मन, इटाली, फ्रान्स आणि इंग्लंडमधील रहिवाश्यांच्या ज्ञानांत आणि विचारांत जी प्रगति झाली तिचें बीज या "अभिजात" साहित्यांतच आहे. त्यांची नवी नव्हाळी म्हणजे फक्त भौतिकशास्त्रें !

३. सहजरम्य, काव्यमय साहित्य—

पण या दोन हजार वर्षांनंतर यूरपमध्यें आत्मानात्मविवेक जागृत झाला. त्यांचा स्वाभिमानहि जागला. फारा दिवसांनीं कां होईना पण त्यांना हें उमजलें कीं त्यांचे पूर्वज ग्रीक आणि लॅटिन नव्हते; आणि ग्रीक व लॅटिन लोक म्हणतात म्हणून ते रानटी पण नव्हते: ज्यावेळीं ग्रीक व लॅटिन सत्ता नव्हती त्यावेळीं किंबहुना त्याच्याहि पूर्वी आपल्या पूर्वजांनीं एक असें साहित्य निर्माण केलें कीं जें स्वाभाविक होतें, मोठें सुंदर होतें : अतिशय काव्यमय होतें; दोन हजार वर्षें त्याची आपण उपेक्षा केली तरी देखील ज्यांना आपण अडाणी म्हणतों अशा लोकांमध्यें तें टिकून राहिलें. अर्थात् तें मोठें सकस व सत्वपूर्ण असलें पाहिजे.

४. अभिजात संस्कृति विरुद्ध बण्ड—

पूर्वजांकडून आलेल्या या वारसदारीची आपण कदर केली नाहीं याबद्दल

त्यांना फार पश्चात्ताप झाला, व पुढें त्यांनीं असा निश्चय केला कीं पुढच्या पिढींत स्कँडिनेव्हियन अथवा नार्स संस्कृतीबद्दल जाणीव उत्पन्न व्हावी यासाठीं शिक्षणक्रमांत सुरुवातीलाच "नार्स-सगा" म्हणजे पौराणिक कथा आल्या पाहिजेत. लोकसाहित्याचा शोध व त्याची सेवा करण्याची प्रवृत्ति म्हणजे एकप्रकारें या क्लासिकल संस्कृतीविरुद्ध उभारलेलें बंडच ! ही संस्कृति परकीय आहे, आपली नव्हे, तिचें जूं फेंकून दिलें पाहिजे ही वृत्ति त्यांच्यांत उद्भवली. क्लासिकल साहित्य क्लासेस करितां आहे, मासेसकरितां नाहीं: म्हणजे, तें शिष्ट-साहित्य आहे, सामान्य जनतेला उपयोगी नाहीं: असले विचार एकदम पसरले. ह्याचा परिणाम शिक्षणप्रणालीवर फार झाला. ह्या सर्व चळवळीचा अर्थ हा नव्हता कीं त्यांनीं सर्व अभिजात साहित्य असंमत ठरविलें, परंतु क्लासिकल संस्कृतीला लोकसंस्कृति ही प्रतिस्पर्धिनी झाली येवढें मात्र खरें !

५. आमच्या साहित्याची धारणा—

आपल्या देशांतील लोकसाहित्याची धारणा व स्थिती अगदीं वेगळ्या प्रकारची आहे. आपले लोक राजकारणप्रधान नव्हते. आपल्यांत त्यावेळीं खास (classes) व आम (masses) असले भेद पडले नव्हते. श्रीमंतांनीं गरिबांची तशी उपेक्षा केली नव्हती. आर्यसंस्कृतींत लोकसंग्रहाला फार महत्त्व आहे व तत्कालीन विद्वानांना त्याची जाणीव होती. वेदांमध्यें पहा. अतिशय सूक्ष्म आणि गहन सिद्धांत अगदीं सोपे आणि सुगम केलेले तुम्हांस आढळतील. ते सुगम करितांना आद्यऋषींनीं लोककथांचें उपजीवन केलें. पुराणांत तरी तेंच दिसेल. एका दृष्टीनें पाहिलें तर असेंच म्हणणें प्राप्त आहे कीं **आमचीं पुराणें म्हणजे लोकशिक्षणाचीं पाठ्य पुस्तकेंच !** जे जे विषय लोकांना महत्त्वाचे वाटले, ज्या ज्या विषयांची लोकांनीं जिज्ञासा दाखविली ते सारे विषय पुराणांत आढळतात; आणि सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर असें दिसून येईल कीं पुराणांची रचना शिक्षणशास्त्राला धरून आहे. संगीतांत

रामायणकालीं शास्त्रीय संगीत आणि लौकिक संगीत यांची सारखीच प्रतिष्ठा होती. वाल्मीकिनें लवकुशांना मार्गीं संगीताप्रमाणें देशी संगीतांतही निपुण बनविलें होतें. बौद्धधर्मांतील जातककथा घ्या. त्यांचें स्थान जगांत बरेंच उच्च आहे. ह्या जातककथा निर्विवादपणें लोकसाहित्यांत मोडतात. धार्मिक ग्रंथांत जें साहित्य येऊं शकलें नाहीं तें कथासरित्सागर, पंचतंत्र, हितोपदेश, इत्यादि ग्रंथांत आलें आहे. आपल्या साधुसंतांनींहि असल्या लोकसाहित्याचा मोठा सुंदर उपयोग करून घेतला व नवें लोकसाहित्य निर्माण केलें. वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी, शुकबहात्तरी, बिरबल बादशहाच्या गोष्टी, इत्यादि ग्रंथ तर समाजाच्या खालावलेल्या आणि एक प्रकारें पतितकाळांतील लोकसाहित्य होय ! भोज व कालिदासाच्या गोष्टी, किंवा असेच दुसरे ग्रंथ यांनीं लोकसाहित्याची परंपरा आधुनिक काळापर्यंत आणून पोंचविली आहे. ही परंपरा वेदकालापासून अखंड सुरू आहे व साधारण जनता देखील तिचें महत्त्व ओळखून आहे.

६. आपलीं पुराणें—

मोठमोठे विद्वान सांगतात कीं मानवजातीचा विकास ज्या क्रमानें झाला त्या क्रमानेंच शिक्षण दिलें जावें. विषय शिकविण्याचा क्रम देखील असाच नैसर्गिक असावयास पाहिजे. जीं शास्त्रें आधीं निर्माण झालीं तीं प्रथम व ज्या शास्त्रांचा नंतर विकास झाला तीं नंतर शिकविलीं जावींत हें त्यांतील तत्त्व. प्रत्येक शास्त्राच्या प्रगतीच्या दृष्टीनेंच तें शास्त्र शिकविलें पाहिजे. आपलीं पुराणें ह्याच क्रमानें लिहिलीं गेलीं, हें वर सांगितलेंच आहे. आपल्या शिक्षणाचा मक्ता इंग्रजांकडे गेला तेव्हांपासूनच ही परंपरा बंद पडली आहे. पण हें सुदैव कीं आपल्याला या पांचपन्नास वर्षांतलीच चूक सुधारावयाची आहे. अशिक्षित आणि सुशिक्षित असले तट ह्या पांचपन्नास वर्षांतलेच.

७. हें साहित्य जगेल कसें—

सुशिक्षित अशिक्षितांत मिसळत नाहींत. सुशिक्षितांना खेड्यांचा विटाळ वाटतो. ह्या आणि असल्या कारणांनीं आपलें लोकसाहित्य आपल्यापासून दूरदूर

जात आहे. आपल्या कुलकुलाचारांत, व्रतोद्यापनांत, उत्सवांत ज्या लोककथा आणि लोककला समाविष्ट झाल्या आहेत त्या देखील सुधारणेच्या व धर्मसंशोधनाच्या चुकीच्या आदर्शामुळें आपल्या सुधारकांनीं मरूं दिल्या आहेत. आज आपण जर वेळींच सावध झालों नाहीं तर हें एवढें मोठें साहित्य, एवढी मोठी रसिकता, अगदीं देखल्या डोळां नाश पावेल !

तेव्हां आतां याचा उपाय काय ? हें साहित्य विस्मरणाच्या गर्तेंतून उपसून काढून पुस्तकाच्या कपट्यांत दडपून ठेवणें ?—

—नव्हे, हा त्याचा उपाय नव्हे ! त्यासाठीं फार वेगळ्या गोष्टी केल्या पाहिजेत. त्याला जिवंत राखण्यास जीवनांत त्याला जगविलें पाहिजे; शिक्षणांत त्याला स्थान मिळवून दिलें पाहिजेः तरच आपलें लोकसाहित्य टिकेल, फुलेल, फळेल आणि त्यायोगें लोकजीवन समृद्ध होईल !

७. सार्वभौमकथा

१. नवा देश : नवा वेष—

उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंतच्या सर्व देशांत, मोठमोठ्या खंडांत किंवा इवल्या इवल्या बेटांत, रानटी लोकांत किंवा शिकलेल्यांत, म्हाताऱ्यांना, संन्याशांना त्याचप्रमाणें गृहस्थाश्रमी संसारी माणसांना जर सर्वसामान्य कोणतें व्यसन असेल तर तें गोष्टींचें होय ! संध्याकाळ होते आणि गोष्टी सांगण्यांत येतात. हा रिवाज जेथें नाहीं असलें ठिकाण विरळा !

आधुनिक कालीं आगगाड्या, आगबोटी, वेताळ यंत्रें (wireless), वर्तमानपत्रें यांची वाढ झाल्यामुळें सर्व गोष्टी सहजसाध्य झाल्या आहेत. परंतु जेव्हां अशा प्रकारची सोय नव्हती तेव्हां देखील कितीतरी गोष्टी तिन्ही खंडांत वाऱ्याप्रमाणें वावरत असत. एखादी लहान, साधी, सुंदर गोष्ट जेव्हां आपण आपल्या खेड्यांत ऐकतों तेव्हां आपल्याला वाटतें कीं फार तर ही कथा बारा कोसांत माहित असेल, पण शोध केला तर असें आढळतें कीं तीच कथा निरनिराळ्या देशांत त्या त्या देशाच्या रिवाजांत नवे कपडे घालून मिरवीत असते. अरबस्थानच्या तंबूंत, सहाराच्या वाळवंटांत, मध्य आशियांतील अत्यंत प्राचीन शहरांत किंवा रशियाच्या झोपड्यांत तीच कथा लहान लहान मुलें आजीच्या मांडीवर बसून ऐकतात.

२. जितकी अशक्य वाटते तितकीच खरी—

आज अवघें जग हें एक शहर बनलें आहे. प्रत्येक देश हा एका आळीच्या

ठिकाणीं आहे आणि हल्लींचीं शहरें हीं जणुं त्यांतील घरें बनलीं आहेत. आजचें हें विधान जुन्या काळाला देखील लागू पडतें. देशादेशांतील लोकांना इतर देशादेशांतील रिवाज चांगल्या रीतीनें ठाऊक होते, ही गोष्ट आपल्याला जितकी अशक्य वाटते तितकीच ती खरी आहे. केवळ देशाटन करण्यांत आयुष्याचीं ३०–४० वर्षें घालविणारे मार्कोपोलो, इब्नबटुटा, किंवा हुएन्त्संग आज कुठें आहेत? जुन्या काळीं व्यापारी, संन्याशी, यात्रेकरू जगभर फिरत आणि नाना देशांच्या अजब वस्तू, नवे नवे विचार, आणि सुंदर सुंदर गोष्टींचीहि देवघेव करीत. स्पेन्सरचे "फेअरी क्वीन," बोक्याशियोचें 'डेकॅमॅरॉन' अरेबीयन नाईटस् इत्यादि ग्रंथांत जुन्या चालीरीतींची नोंद आहे. खेड्यांत रहाणारी म्हातारी चारही धाम करून आली असें जर म्हटलें तर जसें आपणांस खरें वाटत नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या घरोब्याच्या ह्या गोष्टी चार खंड फिरून आल्या हें विधान आपल्याला पटत नाहीं. एकादी गोष्ट नाईल नदीच्या कांठीं जन्म घेते तर दुसरी शट्अल्अरबच्या खोऱ्यांतून इकडे येते. एकादी दुसरी समरकंदांतून मांजरीच्या पावलानें प्रवेश करिते आणि आपलीं अर्भकें तिच्याबरोबर विश्वासानें खेळतात! या कथांमधून अशा कित्येक दिसतील कीं ज्या देशांतर करून जर्मनींत घर करून राहिल्या; तर कित्येक केस वाढवून आणि आंखूड बूट घालून चिनी बनून गेल्या! अहो, यांच्यामागें धांवाल तरी कुठपर्यंत? एवढ्याशा फरकानें या गोष्टी बहुरुप्यासारख्या चटकन् नवें स्वरूप घेतात आणि स्त्रियांसारख्या कोठेंहि खेळीमेळीनें राहतात! काश्मीरमध्यें असतांना मीं अशा कित्येक गोष्टी ऐकल्या. बंगाली मुलांच्या तोंडून एखादी गोष्ट ऐकावी आणि आपण म्हणावें, अरे, ही तर आपल्याकडलीच गोष्ट आहे!

हिंदुस्थानांत देखील यात्रेकरितां निघालेले ऋषी, मुनी धार्मिक सत्रांच्या ठिकाणीं जाऊन थोडे दिवस विश्रांति घेत आणि अत्यंत उत्साहानें धार्मिक गोष्टींचा विनिमय करीत. प्रत्यक्ष बुद्ध भगवान देखील रोज संध्याकाळीं श्रमण भिक्षूंना एकत्र करून गोष्टी सांगत. येशू ख्रिस्तानें देखील गोष्टींच्या द्वारेंच लोकांच्या मनावर उपदेश ठसविला. गोष्टींपायीं वेडे झालेले आणि न संपणाऱ्या गोष्टी-

साठीं सारें राज्य सोडून देणारे राजे आपल्याला ऐकून ठाऊक आहेत. ज्याला उत्कृष्ट गोष्ट सांगतां येई त्याचे अधम आणि अक्षम्य अपराध देखील माफ होत.

३. प्रवाशांच्या शिक्षणशाळा—

ज्या ज्या ठिकाणीं व्यापाराची पेठ असे त्या त्या ठिकाणीं निरनिराळ्या देशांचे व्यापारी गोळा होत, व त्यांच्या त्या पडावांत, सराईंत किंवा धर्मशाळेंत ठगबाजीच्या, आषुकमाषुकांच्या, कुत्र्यामांजरांच्या, राजाराणीच्या, साधुसंतांच्या, ईश्वरी क्षोभाच्या, दैवी चमत्काराच्या, जादुटोण्याच्या आणि असल्या कित्येक गोष्टींना नुसता ऊत येत असे. अजूनहि, ज्या ठिकाणीं आगगाडी पोंचली नाहीं त्या ठिकाणीं हेंच वातावरण दिसून येतें. काश्मिरांत व नेपाळांत व्यापारांनीं गजबजलेल्या धर्मशाळांमधून मीं असल्या गोष्टी ऐकल्या आहेत.

प्रवासी लोकांची ही शिक्षणशाळाच होय ! त्यांना उत्कृष्ट ज्ञान देणाऱ्या ज्ञानगंगा म्हणजे ह्या कथा. मानवी स्वभाव सगळीकडे सारखाच आहे. सुख-दुःखांचीं कारणेंहि सारखीं आहेत. सुखानें सगळ्यांचें हृदय फुलतें, दयेनें द्रवतें, दुःखानें पाझरतें–आणि असल्या भावनांचा साक्षात्कार लोककथांच्या द्वारें होतो. धर्मग्रंथ वाचल्यानें आपल्याला जें समाधान मिळतें, हृदय निवल्या-सारखें जें वाटतें तेंच समाधान, तीच नीव अमेरिकेच्या निग्रो गुलामांना त्यांच्या वाडवडिलांनीं आफ्रिकेंतून आणलेल्या गोष्टींनीं किंवा गायनानें मिळते !

४. व्यापक जीवनरहस्य—

हिंदु लोकांना गोष्टींचा जितका नाद आहे तितकाच किंबहुना त्यापेक्षांहि जास्त मुसलमानांना आहे. हल्लींच्या पाश्चात्य साहित्यांत आपल्या भावड्या हृदयाला आपलेंसें वाटेल असें कांहींच दिसत नाहीं; पण यूरपच्या व त्यांतल्या त्यांत दक्षिण यूरपच्या लोककथांतून आपण आपलें हृदयचित्र पहात असतों. यूरेशियन संस्कृतीपासून अगदीं अलग असलेल्या आईसलँडच्या लोकांच्या 'सागा' मध्यें देखील आपल्याला मानवी स्वभावाचें व्यापक दिग्दर्शन होतें.

हें कथावाङ्मय वाचून आपल्याला असें वाटतें कीं आजही आपला समाज बाल्यकाळांतच आहे. लोकसाहित्याची अभिरुचि सकस आणि साधी असते. त्यांत धर्मशास्त्राइतकी पापांची मोजदाद नाहीं. मानवी स्वभावाची घडण ध्यानीं धरून त्याला काय शक्य आहे आणि अशक्य काय हें त्यांत विशद केलेलें असतें. धर्मतत्त्वाचा उगीचच कीस पाडणाऱ्या व्यक्तीविषयीं लोकसाहित्याला सहानुभूति नाहीं. धर्मांची कठोरता त्याला पसंत नाहीं. लोकवाङ्मयाचा पीनल कोड तुमच्या न्याय व अन्यायाच्या कसोटीला उतरणार नाहीं. तेथें जी शिक्षा लुटारूला तीच शिक्षा कंजूष माणसाला मिळते. कारण दोघांचाहि समाजद्रोह सारखाच. जे बलवान आहेत, जे योजक आहेत, जे चतुर आहेत तेच या दुनियेंत टिकतात व टिकतील ही भौतिकशास्त्राची शिकवण लोकसाहित्यांत नाहीं. निष्कपट मुलांची, नाडलेल्या गरीब बिचाऱ्यांची किंवा असमर्थ माणसांची **राखणी करावी हा लोकसाहित्याचा पहिला धर्म होय.** अशा लोकांना सहानुभूति मिळवून देण्याकरितां लोकसाहित्य फार झटतें. नैसर्गिक शक्तीचे नियम देखील याकरितां तें पाळीत नाहीं. लोकसाहित्यांत **हृदयाचें समाधान हा मुख्य नियम** होय; सार्वजनिक सहानुभूति हा मुख्य आदर्श होय; स्वभावाचें निरीक्षण हें मुख्य सामर्थ्य होय; म्हणूनच जाणून किंवा अजाणतां लोकसाहित्यांत आदर्श जगच रंगविलें आहे. यथार्थ वर्णन करतांना आदर्शाचा खोज घ्यावयाचा ही लोकसाहित्याची खुबी होय. लाखों लोक याच आदर्शाप्रमाणें वागतात; याच कसोटीवर व्यक्तींची, वस्तूंची, घटनांची किंमत पडताळून पहातात.

८. एका नवीन संस्कृतीचा ब्रह्मा, मनु, सखा !

टीका करण्यापेक्षां कार्य करून दाखविणें अधिक चांगलें. लोकस्थिति चांगली वाटत नसेल तर आपली राहणी आदर्श ठेवून लोकस्थिति सुधारावी. असें होणें शक्य नसेल तर आपल्या आदर्शाची कल्पना करून देणारी चटकदार कथा निर्माण करावी. अर्धामुर्धा कां होईना पण ह्याचा परिणाम समाजावर अवश्य होतो. कित्येक लोक म्हणतात, आदिकवींचें रामायण ही याच

प्रकारची गोष्ट आहे. ब्रह्म्याच्या सृष्टीशीं स्पर्धा करावयास विश्वामित्रानें जशी नवी सृष्टि निर्मिली, तद्वत् कवीदेखील अशा ह्या गोष्टींमधून एक नवी संस्कृति निर्माण करतात आणि लोकांना त्या सृष्टींत घेऊन जाऊन तिथले नागरिक बनवितात. आपल्या राज्यांत ते रुचतील तेवढेच धर्मसिद्धांत घेतात. स्वतःच्या मर्जीप्रमाणें त्यांची निवड करितात. काय घ्यावें, काय टाकावें हें ठरवितात आणि आश्चर्य असें कीं तो निर्णय वाचकांकडून कबूलही करून घेतात. म्हणून कथा लिहिणारा कवी, हा ब्रह्मा आहे, मनु आहे, राजा आहे, समाजनेता आहे आणि सखाही पण आहेच !

—: * :—

८. लोककथांची भाषाशैली

१. दूरीकृता खलु गुणै—

जगांत कथासाहित्य भरपूर असूनहि लोककथा त्यांतून वेगळ्या वाटतात. लोककथांचे विषय, त्यांची भाषाशैली अगदीं निराळी भासते. मानवी हृदयाचा ज्यानें संपूर्ण खोज घेतलेला आहे, जो लोकांच्या अभिरुचीशीं अगदीं एकजीव झालेला आहे असा लोकांवर व लोकजीवनावर श्रद्धा असलेला मनुष्य असें म्हणेल कीं " दूरीकृता खलु गुणैः उद्यानलता वनलताभिः "—!

२. इतिहाससंशोधक साहित्यशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ—

अशा या वेगळ्या भासणाऱ्या लोककथांच्या भाषेचा प्रश्न निकडीचा म्हणून समजला गेला तर त्यांत कांहीं वावगें नाहीं. इतिहाससंशोधक लोककथांवरून कालविशिष्ट लोकाचार आणि लोकवृत्ति ठरवितात. संस्कृतीचे अभ्यासक ज्या स्वरूपांत लोककथा हातीं येईल त्या स्वरूपांत ती ठेवण्याचा अट्टाहास धरितात. वेदोक्त ब्राह्मणांप्रमाणें ते देखील लोककथेंतील अक्षरन् अक्षर पवित्र मानतात. संस्कृतिसंस्कृतीमधील साम्य आणि विकास कळावयास लोककथा फार उपयोगी पडतात. लोककथांचे निरनिराळे पाठ आपणांस अवगत झाले तर आपल्याला पुष्कळ प्राचीन इतिहास उपलब्ध होईल. इतिहाससंशोधक लोककथांचें जुन्यांतलें जुनें स्वरूप मोठ्या प्रयासानें जे एवढें मिळवूं पहातात तें याच कारणांसाठीं !

साहित्यशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ यांचे उद्देश कितीहि भिन्न असले तरीहि तेदेखील अखेर याच निर्णयावर आलेले आहेत. मानसशास्त्रज्ञांना

लोकसामर्थ्याची अजमावणी करावयाची असते. म्हणून ते निष्पापवृत्तीच्या लोकरूढ कथा पसंत करितात आणि त्यांना त्यांच्या शैलींत बदल करण्याची गरज वाटत नाहीं. वर उल्लेखिलेले तिन्ही शास्त्रज्ञ लोककथांचा अशा तऱ्हेनें संग्रह करितात. हें सर्व आवश्यक आहे, उपयुक्त आहे पण यानें लोकजीवनाचें वातावरण सजीव होणार नाहीं.

अशा तऱ्हेचा संग्रह हेंच दाखवितो कीं या कथांच्या मूळ उद्देशाची त्यांना ओळख नाहीं. त्यांच्यामध्यें इजिप्तमधील 'ममी' (mummy) संग्रहित करण्याची वृत्ति आहे. यूरपमध्यें इजिप्टॉलॉजिस्ट व इंडॉलॉजिस्ट या नांवानें ओळखले जाणारे कित्येक पुरातत्त्ववेत्ते असतात. मिसर आणि हिंदुस्थानमधील प्राचीन सांस्कृतिक अवशेष ऐतिहासिक अध्ययनासाठीं जपून ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो! त्यांना हिंदुस्थान किंवा मिसरमधील वस्तूंची आवड आहे, पण हिंदुस्थानची किंवा मिसरची नाहीं. They are lovers of things Indian but they are not necessarily lovers of India हेंच खरें! अशा तत्त्ववेत्त्यांचा आदर्श जर पुढें ठेवला तर अवघा देशच मुडदा बनेल–निःसत्व होईल! त्यांचा या सांस्कृतिक अवशेषांवर एक प्रकारचा मोह असतो पण मोह म्हणजे प्रेम किंवा वात्सल्य नव्हे!

३. वेद थरथर कांपतो!

ग्रंथांतर्गत वाङ्मय व लोकसाहित्य यांमधील भाषाभेद महत्त्वाचा आहे. जंगलांतील कित्येक वनस्पती बागेंतील घातल्या पाण्यानें मुळीं जगूंच शकत नाहींत. लहान मुलांचे जर जास्त लाड केले तर त्यांची स्वाभाविकता मरून जाते व आपण मुलांत फाजील शिष्टपणा आला म्हणून दुःखी होतों. तसेंच लोककथांचेंहि कधींकधीं होतें. अल्पश्रुत माणसाच्या हातीं वेद थरथर कांपतो. अरसिकांच्या हातीं गेलेली कविता भीतीनें अर्धमेली होते. पंडितांच्या हातीं लोककथा गेल्या तर त्यांची गत अशीच होईल. अमेरिकन संस्कृतींत ज्याप्रमाणें रक्तवर्ण लोक नाहींसे झाले, त्याप्रमाणें साहित्यपंडितांच्या हातून लोक-

कथा मरून जातील. संगीतज्ञांच्या हातीं गेलेलीं लोकगीतें आणि ग्रांथिक लोकांच्या हातीं गेलेल्या लोककथा किती दुर्दशेला पोचतील याची कल्पना करणें बरें !

४. वृक्षाची उपमा —

लोककथा एका विशिष्ट वृत्तीच्या द्योतक आहेत. झाड ज्याप्रमाणें असंख्य फळें निर्माण करितें आणि त्या फळांपैकीं एकाचाहि संग्रह करीत नाहीं, त्याच-प्रमाणें जर लोककथांविषयीं आपली वृत्ति असली व आपण निर्मितीचा आनंद लुटूं शकलों तरच त्या टिकूं शकतील आणि नवीन निर्माण पण होतील !

ज्यांना सांस्कारिक शिक्षण मिळालें अशांची निसर्गनिर्व्याजवृत्ति नाहींशी होण्याचा संभव असतो. लोकांचें समाधान नष्ट झालें कीं अस्वस्थता वाढते; आणि अस्वस्थता म्हणजे विप्लवाचें बीज ! या संकटापासून बचाव म्हणून लोककथांच्या द्वारा सहजरम्य लोकवृत्ति जागृत करणें हा उपाय ? कीं सामा-जिक स्थित्यंतर म्हणून जें जग नाहींसें झालें त्याचें श्राद्ध करणें ही तोड ? श्राद्ध तर एक दोन पिढ्यांपर्यंतच चालतें, शिवाय पुढें पुढें त्यावरची श्रद्धा देखील उडून जाते. इतर अनेक महत्त्वाच्या गोष्टींच्या भाऊगर्दीत लोककथांची पत्रास कोण बाळगतो ?

५. तूं आपल्या मनानें लिहून काढ —

मी एकदां लोककथा गोळा करावयास खेड्यांत गेलों होतों. लोककथांची भाषा अक्षरन् अक्षर संभाळली जावी असा माझा सिद्धान्त असल्यामुळें लोकां-कडून मी अशीच काटेकोर अपेक्षा करीत होतों. गांवांतील लोक माझ्याकडे पाहून हंसावयास लागले. कॉलेजमध्यें शिकणारा एवढा शहाणा मुलगा पण हा आमची भाषादेखील समजूं शकत नाहीं हें पाहून त्यांच्या विस्मयाला व तिरस्काराला सीमा उरली नाहीं. शिक्षणामुळेंच मी या लोकभाषेला पारखा झालों हें मी त्यांना कसें समजावून देऊं ? त्यांनीं एक गोष्ट सांगण्यास सुरवात केली. ती अर्धीमुर्धी पुरी केली आणि नंतर कंटाळून बाकी राहिलेल्या गोष्टीचा

सारांश सांगितला व म्हणाले:—"आतां बाकीचें आपल्या मनानें लिहून काढतां येईल"—

मागें उल्लेखिलेली "उमाईची गोष्ट" मला वाटतें त्या भागांत शेकडों वर्षांपासून प्रचलित आहे. भाषेंत फेरफार जरूर झाले आहेत. लोकवृत्तीचे वारसदार असल्यामुळें त्या लोकांना असे फेरफार करण्याचा हक्क आहे. लोककथांचा आत्मा म्हणजे लोकवृत्ति ! हीच त्यांच्यांत वसत असल्यानें ते इतिहासक (Historists) नव्हते. ते मूलगामी होते. पूर्वजांचें प्रेत ते ठेवूं इच्छित नव्हते. पूर्वजांच्या प्राणानें ते प्राणित होऊं पहात होते. इतिहास ज्यांच्या नसानसांत आहे, ज्यांनीं इतिहासांतून लोणी काढून आपल्या जीवनांत आत्मसात् केलें त्यांनीं इतिहासाचें ताकवणी कां संभाळावें ?

९. लोककथांवरील आक्षेप

१. ग्राम्यता म्हणजे अनीति नव्हे—

लोककथांवर ग्राम्यतेचा आरोप केला जातो. ग्राम्यतेचा त्याग केल्याशिवाय संस्कारिता येऊं शकत नाहीं हें खरें, त्याचप्रमाणें शिक्षणाचा हेतु ग्राम्यतेचा प्रतिकार करण्याचा असावा हेंदेखील सयुक्तिक आहे.

परंतु असें करतांना एक गोष्ट ध्यानीं धरावयास हवी कीं ग्राम्यता म्हणजे अनीति नव्हे ! कित्येक वेळां ग्राम्यता नाहींशी झाली असतां समाजांत दंभ पसरतो. नीतियुक्त संस्कारिता आणि दांभिक संस्कारिता यांमधील भेद आपण ओळखला पाहिजे ! अत्यंत पतितदशेंत देखील दंभांतील संस्कारिता समाज टिकवूं शकतो.

२. समाजसेवकांची भूमिका—

ज्यावेळीं दंभ खूप वाढतो त्यावेळीं त्याचें खरें स्वरूप उघडें करण्याकरितां खरे समाजसेवक पुष्कळदां ग्राम्य भाषेचा उपयोग करितात. दाम्पत्यप्रधान कथा आणि ग्राम्य गोष्टी या बालशिक्षणांतून काढून टाकल्या तरी लोकशिक्षणांत त्यांचा उपयोग आहे; आणि म्हणून एवढ्याचकरितां कां होईना असल्या गोष्टींचा संग्रह होणें जरूर आहे !

३. भाऊ व बहीण यांचें लग्न—

एका गुजराती कथासंग्रहांत भावाबहिणीच्या चुकून घडून आलेल्या लग्नाच्या एक दोन गोष्टी आहेत, याचा अर्थ काय ? जें कृत्य महापापाहूनही हीन आणि निंद्य गणलें जातें, त्या कृत्याचा उल्लेख या गोष्टींत कां यावा ? हे प्रसंग ह्या

गोष्टींत सांगितल्याप्रसाणें खरोखर चुकीनेंच घडले, कीं त्यांत एकाद्या तत्कालीन गंभीर सामाजिक रोगाची सूचना आहे ? सिंधच्या इतिहासांत भवितव्यता टाळण्यासाठीं एका *राजानें आपल्या बहिणीशीं लग्न केल्याचा दाखला मिळतो. बौद्ध साहित्यांत व इराणी इतिहासांत असा उल्लेख मिळतो कीं सर्वोंच कुटुंबामध्यें आपल्याहून हलक्या खानदानीशीं शरीरसंबंध करण्याची तयारी नसल्यामुळें वरील प्रकारचा वेडेपणा शिरला होता. अरेबियन नाईट्स्मध्यें —जर त्या सुरस गोष्टी लोककथांसारख्याच कथा मानल्या तर—अशाच प्रकारचा एका निंद्य प्रसंगाचा उल्लेख करून पापी माणसाला तेथें जोड्याचा अहेर केला आहे. पुष्कळशा गोष्टी तर समाजावर कडक टीका करण्याकरितांच लिहिल्या असतात !

* त्या राजाला कुणी असें सांगितलें कीं त्याच्या बहिणीच्या मुलाकडून त्याला मृत्यु येईल व त्याचें राज्य जाईल.

१०. बालसाहित्य–शिशुकथा

१. मुलांचें जग —

हल्लींच्या लोकांना शिशुकथा लिहितांच येत नाहींत. लहान मुलांविषयींच्या कथा म्हणजे कांहीं शिशुकथा नव्हत. खूप आणि भरपूर बोध मुलांना चारतां येईल म्हणून वडील माणसांनीं लिहिलेल्या स्फुट गोष्टी म्हणजेहि शिशुकथा नव्हत; पोरकट कल्पनांना गोष्टींत वाव दिला कीं त्या शिशुकथा झाल्या असेंहि नव्हे. कांहीं लोकांना तसें वाटतें पण तें वाटणें चुकीचें आहे.

मोठ्या लोकांना स्वतःचें जीवन जसें महत्त्वाचें वाटतें तसेंच मुलांनाहि आपलें बालजीवन वाटत असतें; व तसें तें वाटलेंहि पाहिजे. मॅझिनीला इटालीच्या स्वातंत्र्याचा जेवढा ध्यास होता, मिकादोकरितां प्राणार्पण करणाऱ्या जपानी वीरांना स्वदेशाविषयीं जी लागणी होती; तीच लागणी आणि तेंच महत्त्व मुलांना स्वतःच्या दुनियेचें असतें. लहान मुलें जेव्हां आपापसांत भांडतात, पक्ष पाडतात आणि सूड उगवितात तेव्हां त्यांना नेपोलियन, हॅनिबॉल, हिटलर किंवा मुसोलिनी यांच्या इतकाच त्वेष चढतो. शेजारच्या आळींतील मुलांनीं पळविलेलें आपलें मांजर परत मिळविण्यासाठीं आळींतील मुलें जेव्हां व्यूह रचतात किंवा युद्धमंत्रणा करितात, तेव्हां राणी हेलनला परत मिळविण्यासाठीं ट्रोजेन युद्ध करणाऱ्या ग्रीक लोकांइतकीच त्यांची ईर्षा आणि तयारी असते. मानपान, निष्ठाप्रतिष्ठा, ह्या गोष्टी जशा मोठमोठ्या राष्ट्रपुरुषांना आणि धर्मवीरांना महत्त्वाच्या वाटतात, त्याचप्रमाणें लहान मुलांनाहि त्यांच्या जीवनांत त्या त्या क्षणीं त्या त्या गोष्टी महत्त्वाच्या वाटत असतात.

२. बालदुनियेचें महत्त्व —

बालदुनियेचें ज्यांना प्रत्यक्ष दर्शन झालें असेल आणि ज्यांचें बालपण त्यांच्या स्मृतिजीवनांतून नष्ट झालें नसेल, अशांनाच बालकथा लिहितां येतील. रवीन्द्रनाथ ठाकुरांनीं 'शिशु' (Crescent Moon) काव्य लिहून बालदुनियेचें उत्कृष्ट चित्र आपल्या पुढें रेखाटलें आहे. लहान मुलांना कसें वाटतें, जगाकडे तीं कोणत्या दृष्टीनें पहातात, त्यांच्या सुखदुःखाचीं स्थानें कोणतीं, वगैरे गोष्टी त्यांनीं अगदीं तंतोतंत ओळखून बालहृदयाचें हुबेहुब आविष्करण करून दाखविलें आहे.

या शिशुविश्वाला दुसऱ्या एका दृष्टीनें फार मोठें महत्त्व आहे. प्रत्येक मनुष्याचें बालपण म्हणजे मनुष्यजातीच्या इतिहासांतील बालकांडाची घाईघाईनें थोडक्यांत आटपावयाची लहानशी आवृत्ति असते. शाळेच्या अभ्यासक्रमांत इतिहास शिकविला जावो अथवा न जावो, निसर्गानें त्यावर विसंबून न राहतां आपली स्वतंत्र व्यवस्था केलीच आहे. थोडक्या वर्षांच्या बालपणांत लहान मुलें मनुष्यजातीच्या विकासक्रमाची उजळणी संक्षिप्त परंतु सांगोपांग करून मोकळीं होतात. या उजळणीला बालसाहित्याची फारच मोठी मदत होत असते.

आज देखील आपल्या देशांत भिल्ल, कातुडी, संथाल, खसी वगैरे ज्या बालजाती आहेत त्यांचीं लोकगीतें तपासलीं असतां मनुष्यजातीचें बालपण कशा प्रकारचें होतें याची कल्पना आपल्याला करितां येईल; त्यांतील व बालदुनियेंतील साम्य पाहून मोठेंच आश्चर्य वाटतें ! शास्त्रशुद्ध तर्क करून अनुमानें काढण्याची कला जेव्हां माणसाला साधली नव्हती, तेव्हां तर्काचें काम कल्पनेलाच करावें लागे. कल्पनेनें चालविलेली अनुमानप्रणाली कशा प्रकारची असते हें जर पहावयाचें असेल तर प्राचीन लोकसाहित्यांत तें जसें सांपडतें तसेंच सर्वकालीन बालसाहित्यांत देखील सांपडतें.

३. शिक्षणकलेचा शाप—

लोककथा म्हणा किंवा शिशुकथा घ्या, ह्या कांहीं शिक्षणासाठीं लिहिलेल्या नसतात, पण त्यांतून आपोआप उत्कृष्ट शिक्षण मिळत असतें. मुद्दाम शिक्षणाच्या दृष्टीनें रचलेल्या लोककथा किंवा बालकथा शेंकडा ७५ हिश्शांनीं–७५ हिश्शांनींच काय ९० हिश्शांनीं म्हणतां येईल—असफलच ठरतात. गांवांतील भजनीमंडळीच्या सहवासांत लहान मुलें जें संगीत शिकतात तें ऐका आणि शाळेंत मास्तराच्या देखरेखीखालीं मुलें ज्या कविता सुरावर गाण्याचा आव आणतात त्या ऐका म्हणजे वरील भेद सहज ध्यानांत येईल. ह्याचें कारण असें आहे कीं हल्लींच्या शिक्षणपद्धतींत स्वाभाविकताच पार मारली जाते आणि शिशुकथांमध्यें जर कांहीं अधिक आकर्षक असेल तर ती त्यांची स्वाभाविकता होय ! शिक्षणकला ही जेव्हां जीवनद्रोही होते, तेव्हां तिचा शाप कमींतकमी तीन पिढ्यांपर्यंत पोंचतो. आधुनिक निर्जीव किंवा वेंठीस धरून आणलेलें शिक्षणशास्त्र जसें शिशुकथांना बाधतें, त्याचप्रमाणें नीति अनीतीच्या रूढ कल्पना देखील त्या क्षेत्राला मारक ठरतात. कांहीं गोष्टी अश्लील असतात पण अनीतिकारक नसतात. बालविश्वांत जेव्हां सर्व प्रकारचा प्राथमिक अनुभव उत्कटतेनें घ्यावयाचा असतो तेव्हां अश्लीलतेची कल्पना शिथिल करावी लागते हें पुष्कळांना ठाऊक नसतें.

४. शिशुविश्वाला आकर्षक वाटणाऱ्या गोष्टी—

मनुष्य जातीच्या बाळपणीं जीवनसंग्राम बराच कठीण असतो व म्हणून नीतिमत्तेपेक्षां बुद्धिमत्तेला अधिक महत्व दिलें जातें. कर्तव्यपरायणतेच्या गोष्टींपेक्षां चातुर्याच्या, ठगबाजीच्या आणि हिंमतीच्या गोष्टींना अधिक मागणी असते. मुलांच्या जगांत आदर आणि तिरस्कार, गौरव आणि निंदा महाभारतकालाइतक्याच उत्कट व तीव्र असतात आणि म्हणूनच अलौकिक बलिदानाच्या गोष्टी शिशुविश्वालाहि आकर्षक वाटतात; परंतु त्याबरोबरच अलौकिक त्यागाचें फळ ह्या लोकांत किंवा परलोकांत ताबडतोब मिळालेलें दाखवावें लागतें. शिबिराणा असो किंवा हरिश्चंद्र असो, त्यांनीं सर्वस्वार्थ अर्पण केल्याबरोबर त्यांना

विमानांत बसवून स्वर्गांत नेण्यासाठीं शंखचक्रगदापद्मधारी श्रीविष्णु प्रत्यक्ष आलेच पाहिजेत ! परंतु...

—"मुलाचा खरेपणा पाहून साहेब फार खुष झाला व आपल्या खर्चानें त्यानें त्याला शिकण्यासाठीं शाळेंत घातलें."—अशी ज्यांची फलश्रुति आहे अशा गोष्टी पाठ्यपुस्तकांत घातल्यानें बालकांची भूक कशी निवावी ? शाळेंत घातलें जाणें हा वर आहे कीं शाप ? बक्षिस आहे कीं शिक्षा ?–हेंच ज्यांचें अजून ठरलेलें नाहीं, त्यांच्यासाठीं असल्या गोष्टी लिहून काय फायदा ? ज्यांचें बाल्य मरून गेलें आहे त्यांनीं बालदुनियेसाठीं लिहिण्याचा प्रयत्न करूं नये हें बरें ! असो. विषय होता बलिदानाच्या गोष्टींचा. त्या गोष्टी शिशुविश्वाला आकर्षक वाटतात हा होता मुद्दा ! असल्या गोष्टी शूरांनाहि आवडतात आणि भ्याडांनाहि आवडतात. शूरांना अनुकरण करण्यासाठीं एक नमुना मिळतो म्हणून, आणि भ्याडांना आपल्या रक्षणपोषणाची कोठें तरी, कांहीं तरी व्यवस्था आहे असें आश्वासन मिळतें म्हणून ! या दुहेरी आकर्षणांमुळें बलिदानाचीं गीतें व कथा समाजांत अधिकाधिक काल टिकतात. एकाद्या मानवी शत्रूशीं लढण्यांत जें शौर्य दाखवावें लागतें त्यापेक्षां 'सर्वेषामुपकाराय'–आपलें प्राणार्पण करणें हें नेहमीं लोकोत्तर गणलें जातें. राम आणि रावण दोघेही शौर्यानें लढले पण एकाचा जयजयकार होतो व दुसऱ्याची 'शाश्वतीः समाः' अप्रतिष्ठा बोलली जाते. पण दधिचीचें किंवा शिबिराजाचें तसें नाहीं. अजातशत्रु बलिदानाचे पोवाडे सर्व जगभर गाइले जातात !

५. बालहृदयाचे कौतुकविषय :—

जगामध्यें थोरपणा नेहमींच कामी पडत नसतो; दुष्ट लोकांशीं गांठ पडली असतां त्यांच्याशीं कापट्यप्रयोगानेंच भागविलें पाहिजे; असा आदर्श जगांत सर्वत्र रूढ झालेला दिसतो. मदोन्मत्त लोक जर जुलूम करूं लागतील तर दुर्बळांनीं त्यांच्याशीं लबाडी करण्यांत वाईट काय आहे ? असाच प्रश्न सामान्य जनहृदय विचारीत असतें. लबाडी ही ज्याला आपण फसवितों त्याला जितकी बाधते, त्याहून लबाडी करणाऱ्याला अधिक बाधते; म्हणून निव्वळ स्वार्थाच्या

दृष्टीनेंही लबाडीचा त्याग केला पाहिजे; एवढें आर्यतत्त्वज्ञान समाजाला पटावयाला कितीतरी काळ लागतो. चोरी करणें वाईट पण चोराचे घरीं चोरी करावयास हरकत नाहीं अशा प्रकारचें तत्त्वज्ञान ' चोरावर मोर ' ह्या म्हणींत सांपडतें. कोल्हा म्हातारीला खावयास आला व तिनें त्याच्या हातांवर तुरी दिल्या, या प्रसंगाची गोष्ट ऐकून बालहृदयाला म्हातारीसंबंधानें केवढें तरी कौतुक वाटतें! कोल्ह्यानें म्हातारीला गांठलें व म्हटलें—' आतां तुला खातों. ' आजचें मरण उद्यांवर ढकलल्याखेरीज म्हातारीला गत्यंतर नव्हतें. तिनें सांगितलें—" लेकीच्या गांवाला जात्यें, तूपरोटी खात्यें, घाटीमोठी होत्यें–मग मला खा!!—" कोल्ह्याला ही गोष्ट पटली. [धूर्त कोल्हा असा कसा फसला कोण जाणें ! त्यानें जर म्हटलें असतें–" यो ध्रुवाणि परित्यज्य अध्रुवाणि निशेवते, ध्रुवाणि तस्य नश्यन्ति, अध्रुवं नष्टमेवहि ! " आणि तूर्तदान महापुण्याचा कायदा त्यानें पाळला असता तर आपली गोष्ट प्रारंभ होण्यापूर्वीच संपली असती–असो.] म्हातारी लेकीच्या गांवाला गेली. तेथें तिनें तूपरोटी खाल्लीच, पण पावटे, वाल वगैरे वातुळ पदार्थांच्या उसळीवरही ताव मारण्यास कांहीं कमी केलें नाहीं. हे पदार्थ बालवार्तांची गोडी बरीच वाढवितात. लेकीच्या घरून परत जातांना म्हातारी बसली एका भोपळ्यांत आणि भोपळा रस्त्यानें गडगडत चालला. [म्हातारी जर अमेरिकन बाई असती तर तिनें या नव्या वहानाचें पेटंटच घेतलें असतें.]

म्हातारीची वाट पाहून थकलेला कोल्हा विचारतो, " भोपळ्या, भोपळ्या, म्हातारी दिसली कारे ? " म्हातारी आंतून भोपळ्याच्या वतीनें जबाब देते—

– " म्हातारी कुठली ? कुतारी कुठली ?–
– चलरे भोपळ्या गुडुम् गुडुम् ... "

भोपळा चालला, पण कोल्ह्याला शंका आली. त्यानें भोपळा फोडला. म्हातारी पकडली गेली. आतां मात्र खरोखर जिवावर बेतली—

—गोष्ट पुरी करण्याची येथें आवश्यकता नाहीं. अशा वार्तांमधून सत्य-विजयाचें नाटक दाखवावयाचें नसून क्लृप्ति–विजयाचें नाटकच करावयाचें असतें !

६. 'ग्यानबाची मेख'—

वेदांताचें रहस्य गूढ असतें एवढें जनहृदयाला ठाऊक असतें आणि म्हणून तें व्यक्त करण्यासाठीं गूढ भाषा आणि ग्यानबाची मेख यांचाच उपयोग झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. खेडेगांवांतील म्हातारे लोक चावडींत किंवा गांवाच्या देवळांत जमले म्हणजे उखाणेवजा लोकगीतें हटकून काढावयाचे आणि मग त्यांचा अर्थ शोधून काढण्यांत आपली शक्कल लढवावयाचे :—

– मुंगी व्याली, शिंगी झाली, तिच दूध कीती –
– अठरा रांजण भरोनि उरले पीती बारा हत्ती ॥

असलीं वचनें विनोद उत्पन्न करितातच, पण यांतून ब्रह्मज्ञान काढावयाचें एकदां ठरविलें म्हणज डोक्याला गोडसा शीणही देतात. मायावादाची अतर्क्य लीला व्यक्त करण्यासाठीं आणि दुनिया म्हणजे केवळ कल्पना आहे हें जनतेच्या मनावर ठसविण्यासाठी कितीतरी गोष्टी पुराणकारांनीं आणि लोककवींनीं रचलेल्या आहेत !

ज्ञानोबालाहि वाटलें कीं आपण बालहृदयाला संतोषवावें. तेव्हां त्यांनीं खालील ओळी रचिल्या —

कांड्याच्या अणिवर वसति तिन गांव
दोन ओसाड, एक वसेचि ना, वसेचि ना ॥
वसेचि ना, तेथें आले तीन कुंभार ।
दोन थोटे, एक घडेचि ना, घडेचि ना ॥
घडेचिना, त्यानें घडलीं तीन मडकीं ।
दोन कच्चीं, एक भाजेचि ना, भाजेचि ना ॥

भाजेचि ना, त्यांत घातले तीन मुगे ।
दोन कच्चे, एक शिजेचि ना, शिजेचिना ॥
शिजेचि ना, तेथें आले तीन पाहुणे ।
दोन रुसले, एक जेवेचि ना, जेवेचिना ॥
जेवेचि ना, त्याला दिले तीन रुपये ।
दोन खोटे, एक वाजेचि ना, वाजेचि ना ॥
वाजेचि ना, तेथे आले तीन पारखी ।
दोन आंधळे, एका दिसेचि ना, दिसेचि ना ॥
दिसेचिना, त्याला दिल्या तीन बुक्या ॥
दोन हुकल्या, अेक लागेचिना, लागेचिना ॥
ज्ञानदेव म्हणे, याची ते खूण
सद्गुरुवांचुनी, कळेचि ना, कळेचि ना ॥ —

उपनिषत् कालीं ऋषींना देखील असल्या वाचनांची हौस असे :—

यो नस्तद्वेद तद्वेद नोनवेदेति वेदच ।

अथवा —

यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेदस : ।

असल्या प्रकारचीं वचनें देऊन ते लोकांना उपनिषद् विद्या ही गूढ विद्या आहे असें समजावून सांगत असत.

बालसाहित्य – शिक्षण

१. मुलें, आईबाप आणि शिक्षक —

बालकथांचें हें रहस्य खरेंच मी कुणासाठीं लिहीत आहें ? शिक्षकांसाठीं ? आईबापांसाठीं ? कीं मुलांसाठीं ?—

मुलांना त्याची गरज नाहीं. वासरूं जसें गाय येतांच तिच्याकडे धांवतें त्याप्रमाणें मुलें सरळ जाऊन कथांनाच चिकटतील. आईबापांनीं हें कशाला वाचावें ? हा काल श्रमविभागाचा आहे. या दिवसांत मुलांकरितां कांहीं वाचण्याची तसदी आईबाप कशाला घेतील ? एकदां आपलीं मुलें मास्तरकडे लाविलीं कीं त्यांच्या विषयींची त्यांची जबाबदारी संपली. त्यापुढें जाऊन मुलांची काळजी घ्यावी, त्यांच्या शिक्षणांत मन घालावें हा त्यांना परधर्म वाटत असल्यामुळें या भयावह गोष्टींचा त्यांनीं अगदीं निष्ठापूर्वक त्याग केला आहे !

आतां राहिले शिक्षक ! त्यांना काय सांगूं ? ते माझ्याच जातीचे. उत्तम शिक्षकांना सांगण्याजोगें माझ्याजवळ क्वचितच असणार व यांत्रिक शिक्षक तर माझ्यासारख्या बंडखोरावर एवढाले डोळे काढतात. नवे नवे थेर काढून त्यांच्या शांततेचा नाश करणारा माझ्यासारखा मनुष्य त्यांना कसा आवडेल ?

२. विकासवादी व जीवनवादी —

शिशुवार्ता म्हणजे लोकसाहित्याचें एक प्रधान अंग ! एका अतिशय काव्यमय असलेल्या विश्वाची त्या आपल्याला ओळख करून देतात. लहान मुलांच्या शिक्षणक्रमांत आपण बालकथांना व लोककथांना स्थान द्यावें कीं नाहीं आणि दिलें तर तें कां म्हणून द्यावें ? गतावशेषांना जपावयाचें म्हणून, कीं त्यांतला प्राण ग्रहण करावयाचा म्हणून ?

विकासवादी फार वेगळ्या दृष्टीनें शिशुशिक्षणांत त्यांचा समावेश करितात. कांहीं म्हणतात, मनुष्याला स्वतःच्या टीचभर जिन्दगींत लाखों वर्षांच्या विकासाची उजळणी करावी लागते; आणि म्हणून शिक्षणाचा क्रम, विकासाच्या क्रमानें आंखणें इष्ट आहे. या दृष्टीनें बालकथा मोठ्या मोलाच्या आहेत. परंतु हे विकासवादी देखील त्याचें स्वरूप आहे तसेंच ठेवूं इच्छितात. सामान्य इतिहासकारांच्या दृष्टीनें जुन्या गोष्टी आजच्या काळांत असत्य ठरतात; पण विकासवादी म्हणतात, व्यक्तीचा विकास हा समाजाच्या ऐतिहासिक विकासाला धरून असल्यामुळें विकासाची प्रत्येक पायरी सत्य असते; म्हणून मानवजातीचा शिशुकालांतील प्रतिनिधि म्हणून मानला गेलेला तत्कालीन इतिहास आणि लोकस्थिति बालशिक्षणांत येणें अवश्य आहे.

ह्या दोघांत तिसरा एक पक्ष आहे. त्याला आपण जीवनवादी म्हणूंया. ते म्हणतात, क्षणाक्षणाचें जीवन आपापल्यापरीनें संपूर्ण आहे. जीवनाच्या वेगवेगळ्या अवस्थांचे साधनदशा आणि उपभोगदशा असले भेद पाडण्याचें कांहीं-एक कारण नाहीं. परिणतकाल हा जितका सत्य आहे, तितकाच शैशवकाल देखील आहे. त्याला साधनरूप म्हणणें म्हणजे मुलांवर अन्याय आणि ईश्वराचा उपमर्द करणें होय ! मागें उल्लेखिलेला रवीन्द्रांचा 'शिशु' ह्याच वृत्तींतून निर्माण झाला आहे.

३. नीतिवाद्यांचें म्हणणें —

नीतिवादी लोक नीतीचा संभाळ करण्यासाठीं असा आग्रह धरितात कीं लहान लहान मुलांच्या कानांवर असभ्य शब्द मुळींच पडूं नयेत. अशांची स्थिति मोठी केविलवाणी असते. बिचाऱ्यांना प्रत्येक वस्तूंत नाविन्य दिसतें पण निर्दोषत्व दिसत नाहीं. त्यामुळें तें स्वतःला दुःखी करून घेतात. नीतिविषयक कल्पना कालपरत्वें भिन्न असतात. सभ्यतेच्या कल्पना देखील वेगवेगळ्या असतात. संस्कृत भाषेंतील कित्येक शिष्टसंमत आणि शुद्ध मानलेले वाक्प्रयोग आज उच्चारतांना आपल्याला लाज वाटते. इंग्रज सरकारला ज्याप्रमाणें

ग्रंथ संग्रहालय
नों. न.

प्रत्येक मुद्रित लिखाणांवर नियंत्रण घालण्याची संवय असते त्याचप्रमाणें हे नीतिनिष्ट वर्तन करितात. त्यांचा उद्देश इष्ट असतो, पण अतिरेक मात्र चुकीचा ठरतो. कितीतरी वेळां ह्या अत्याग्रहामुळेंच अनिष्ट परिणाम घडून येतात. जीवनवादी त्यांना म्हणतात कीं तुमच्या दृष्टीनें तुम्हीं निर्णय देऊं नका. बालपणच्या नीतिकल्पना वेगळ्या असतात. ज्या वस्तूंची तुमच्यावर अनिष्ट छाप पडते त्यांचा मुलांवर कांहींच परिणाम होत नाहीं. कित्येक गोष्टी वयस्क माणसांकरितां निर्दोष असूनहि तरुणांच्या दृष्टीनें त्या हानिप्रद असतात. जे सिद्धांत नीतीला लागूं तेच सभ्यता आणि ग्राम्यता यांना लागू आहेत. लहान मुलांच्या बोलण्यांत पादाचा उल्लेख हटकून येतो. आपण तो उल्लेख अशिष्ट समजतों.

आपला असा आग्रह आहे कीं लहान मुलांना कौटुंबिक जीवन आणि व्यावहारिक नीति याबद्दलची माहिती विशिष्ठ मर्यादेपर्यंतच दिली जावी. जुन्याकाळीं इतकी चोखंदळ वृत्ति पाळली जात नव्हती. मुलगा अखेर मनुष्य होणार, राजकन्या राणी व माता होणार आणि मातृपद स्वीकारणार, तेव्हां दाम्पत्यविषयक गोष्टी त्यांना जर थोड्या लवकर कळल्या तर त्यांत हानी कसली? असें जुन्या लोकांना वाटे, म्हणून असली नीतीनिष्ठ चिकित्सा बालवार्तांमधून आढळत नाहीं.

४. जीवनाचा उघडा प्रवाह —

रामायणादि ग्रंथांत असले कृत्रिम शिष्टाचार आढळत नाहींत. स्त्रीपुरुष, आबालवृद्ध जेव्हां ते ग्रंथ वाचतात तेव्हां त्यांच्यावर कोणतीहि अनिष्ट छाप पडत नाहीं. याचें कारण हेंच कीं या ग्रंथांतून जीवनाचा प्रवाह उघडा, मोकळा आणि खळखळीत असतो. तो प्रवाह इतका जोरदार आणि ओघवान् आहे कीं त्यांत तुम्हांला वाईट असें सांठलेलें सांपडूंच शकत नाहीं. जीवनांतील शक्तीवर आणि सामर्थ्यावर त्यांची जी श्रद्धा होती ती जर आपल्यांत आली तर आपण विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण देऊं शकूं; व असें करतांना कोणतेंहि असाधारण नियंत्रण घालावें लागणार नाहीं. असभ्य व ग्राम्य वस्तूंची विद्यार्थ्यांना यथार्थ कल्पना झाली तर त्यांना आपोआपच किळस उत्पन्न होईल व कसलीहि झांकदडप

करण्याचें कारण उरणार नाहीं. शिक्षणाचा नैतिक आदर्श अतिशय उच्च असावा असा आपला आग्रह आहे. पूर्वीच्या काळीं तसें नव्हतें. तथापि आपण असें म्हणूं शकत नाहीं कीं जुन्या लोकांची नीतिमत्ता आजच्यापेक्षां जास्त डागळलेली होती. आज आपण बाह्य देखावा व डामडौल राखण्याचा जास्त प्रयत्न केला एवढेंच !

चिमुकलें बालजीवन देखील सत्य आहे असें समजून बालशिक्षण हातीं घ्या म्हणजे बालशिक्षणाचे सर्व सिद्धांत तुम्हांला त्यांच्याकडूनच कळतील !

५. ते कुशल शिक्षक नव्हत —

शिशुकथांमध्यें दुधांतल्या लोण्याप्रमाणें सुप्त कला असते, सुप्त बोध असतो; लोकस्वभावाचें मूक वर्णन असतें, निष्पाप बालकांचा आशुतोष आनंद असतो; म्हणून बालकथा व साकल्यानें लोककथा देखील शिक्षकांना मित्रस्थानीं असतात. ज्या शिक्षकाला लहान मुलांचें जीवन सत्य आणि संपूर्ण वाटत नाहीं ते कुशल शिक्षक नव्हत. उत्साही शिक्षकांना एवढीच प्रार्थना आहे कीं ह्या कथांमध्यें तुम्ही फेरफार करूं नका. त्यांचें अध्ययन करा, मनन करा आणि तद्रूप झाल्यावर जें तुमच्या मनांत स्फुरेल तें मुलांना सांगा. या कथा तुमच्या शास्त्रांचा संयम पाळीत नसतील, पण त्यांत स्वभावाचा संयम आहे. पापी लोकांचा धिक्कार केल्याविनाच पापपुण्याचा भेद ह्या कथा स्पष्ट करतात आणि समाज-सेवेच्या उच्च आदर्शाची कल्पना देऊन विश्वव्यापी प्रेम उत्पन्न करतात. यात्रेकरूंसारख्या ह्या देशादेशांत फिरतात आणि ज्या ज्या ठिकाणीं जातात त्या त्या ठिकाणीं प्रेमधर्म स्थापन करितात. मुलांवर प्रेम करावयाचें असेल तर त्यांच्या बालदुनियेंत प्रवेश करा व फुलांबरोबरच त्यांच्या प्रसन्नतेचा मकरंदही लुटा.

REFBK-0005705